रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग | आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | वर्ष ८९ | अंक ९९ | पृष्ठे ८+४ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in

## फडणवीस मोठे आका : कडू

**नवी दिल्ली :** पंतप्रधान नरेंद्र मोदी हे हिंसाचाराच्या घटनेनंतर अडीच वर्षांनंतर मणिपूरला गेले आहेत. हा नेपाळचा परिणाम आहे. नरेंद्र मोदी यांना भीती वाटत आहे की आपलं घर जळू नये. स्वतःच्या घरावर वेळ आली तेव्हा मणिपूरची आठवण आली आहे, दुसरं काही नाही, असे म्हणत प्रहारचे प्रमुख बच्चू कडू यांनी टीका केली. त्याचबरोबर मंत्रिमंडातील अर्ध्याहून अधिक मंत्री आका आहेत, तर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे मोठे आका आहेत, अशी टीका त्यांनी केली. पीक विम्याचे निकष बदलले आहेत, या प्रश्नावर बच्चू कडू यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांचा चांगलाच समाचार घेतला.


# कृषीवल

रायगड, सोमवार, दि.१५ सप्टेंबर २०२५

किंमत ४ ₹







## वेधक

### पवारांचा सरकारवर जोरदार हल्लाबोल

**नाशिक :** शरद पवारांनी मराठा आणि ओबीसी आरक्षणाच्या मुद्द्यावरून सरकारला धारेवर धरले आहे. आरक्षणामुळे महाराष्ट्र अस्थिर झाल्याचे विधान पवारांनी केले. तसेच, आरक्षणाच्या मुद्द्यावर सरकारने स्थापन केलेल्या समितीवरही त्यांनी बोट ठेवले. आज केंद्र सरकार शेतकऱ्यांकडे दुर्लक्ष करत आहे. शेतीला भाव नाही. कांदा निर्यातीवर बंधने आहेत, असे म्हणत शरद पवार यांनी सरकारवर टीका केली. एवढा मोठा जिल्हा असतानादेखील या शेतकऱ्यांची नाशिक जिल्हा बँक आजारी आहे. प्रचंड थकबाकी झाली आहे. आज केंद्रातील सत्ता ज्यांच्या हातात आहे ते शेतकऱ्यांच्या प्रश्नावर गंभीर नाहीत, असेही पवार म्हणाले.

### बनावट कागदपत्रांच्या आधारे जमिनीची विक्री

**नवीन पनवेल :** बनावट कागदपत्रांच्या आधारे दुसरी व्यक्ती उभी करून खरेदीखत केले आणि जमीन स्वतःच्या नावे करून तिची विक्री करणाऱ्या दोघांना पनवेल तालुका पोलिसांनी १२ सप्टेंबर रोजी अटक केली. प्रभाकर बंडू नाईक (डेरवली) आणि अंबावी रणछोड पटेल अशी दोघांची नावे आहेत. संजय महागावकर (गुजरात) व त्यांच्या आईच्या नावे वाघाची वाडी आणि धोदाणी येथे जमीन आहे. ते घरपट्टी भरण्यासाठी गेले असता दोन्ही मिळकती त्यांच्या नावावर नसून, त्या दुसऱ्याच्या नावावर झाल्याचे त्यांना समजले. याबाबत त्यांनी माहिती घेतली असता प्रभाकर नाईक आणि अंबावी पटेल यांनी त्यांच्या जागा दुसऱ्या व्यक्तीला विकल्याचे त्यांना दिसून आले.

# शेतकऱ्यांसाठी आनंदवार्ता!

## आता शेतरस्त्यांना कायदेशीर मान्यता



**। मुंबई । प्रतिनिधी । 'मुख्यमंत्री बळीराजा पाणंद रस्ते' योजनेचा नुकताच श्रीगणेशा करुन सरकारने शेतकऱ्यांना दिलासा दिला आहे. आता ग्रामीण भागातील रस्त्यांना बळकटी देण्यासाठी आणि त्यांना कायदेशीर मान्यता देण्यासाठी राज्य सरकारने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. शिवरस्ते, पाणंद आणि वहिवाटेला आता कायदेशीर मान्यता मिळणार आहे. इतकेच नाही तर, या रस्त्यावरून भविष्यात वाद उद्भवू नये यासाठी त्याचे डिजिटल रेकॉर्डसुद्धा तयार करण्यात येत आहेत.**

**भविष्यातील वाद टाळण्यासाठी डिजिटल नोंद**

भौगोलिक माहिती प्रणालीची (Geographic Information Systems-GIS) मदत घेऊन या शिवरस्त्यांना एक भू-सांकेतिक क्रमांक देण्यात येईल. ग्रामसभेत मंजूर झालेल्या रस्त्यांची माहिती भूमिअभिलेख कार्यालयाकडे वर्ग करण्यात येईल. तर, एक किलोमीटरपेक्षा जास्त लांबीच्या रस्त्यांना व्हीआर नंबर देण्यासाठी प्रस्ताव पाठवला जाईल. •>पान २ वर

### कसा तयार करणार नकाशा?

यासाठी प्रथमतः सीमांकन करण्यात येईल. गावातील नागरिक, लोकप्रतिनिधी यांच्या माध्यमातून अतिदक्ष राहून सर्व पाणंद रस्ते नकाशावर आणण्यात येतील. नकाशा तयार झाल्यावर पुढील महिनाभरात गावामध्ये प्रसिद्ध करण्यात येईल. विविध १३ योजनांच्या माध्यमातून सध्या या रस्त्यांसाठी निधी उपलब्ध करुन देण्यात येईल.

### काय आहे योजना?

शेतरस्त्यांसाठी 'मुख्यमंत्री बळीराजा पाणंद रस्ते' योजना सुरू करण्याची घोषणा महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केली. शेतात जाण्यासाठी योग्य रस्ता व्हावा हा त्यामागील उद्देश आहे. या योजनेसाठी राज्य सरकार सीएसआर फंडातून निधी उपलब्ध करणार असल्याचे बावनकुळे यांनी जाहीर केले. योजनेसाठी आमदारांच्या अध्यक्षतेखाली मतदारसंघनिहाय समिती स्थापन होणार आहे.

# पाकचे 28 कंटेनर जप्त

- मुंबई महसूल गुप्तचर संचालनालयाची न्हावा शेवा बंदरात कारवाई
- सौंदर्य प्रसादने, ड्राय डेटचा ८०० मेट्रिक टन माल घेतला ताब्यात



**। मुंबई । प्रतिनिधी ।**

**मुंबईतील बंदरात पाकिस्तानातून येणाऱ्या मालाचा बेकायदेशीर प्रवेश रोखण्यासाठी मुंबई महसूल गुप्तचर संचालनालयाने (डीआरआय)'ऑपरेशन डीप मॅनिफेस्ट' अंतर्गत न्हावा शेवा बंदरात २८ पाकिस्तानी कंटेनर जप्त केलेत. हे कंटेनर सौंदर्यप्रसाधने आणि ड्राय डेट्सने भरलेले आहेत. त्यांचे एकूण वजन सुमारे ८०० मेट्रिक टन असून, अंदाजे किंमत १२ कोटी रुपये असल्याचे कारवाईतून समोर आले आहे.**

२ मे २०२५ रोजी पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर सरकारने पाकिस्तानातून थेट किंवा अप्रत्यक्षपणे येणाऱ्या सर्व वस्तूंच्या आयातीवर पूर्ण बंदी घातली होती. तेव्हापासून ही बंदी लागू करण्यासाठी आणि बेकायदेशीरपणे येणाऱ्या वस्तूंना पकडण्यासाठी डीआरआयचे ऑपरेशन डीप मॅनिफेस्ट सुरू होते.

दरम्यान, तपासात असे आढळून आले की, पाकिस्तानातून येणारा माल दुबईच्या जेबेल अली बंदरातून भारतात पाठवला जात होता. कागदपत्रांमध्ये या वस्तू संयुक्त अरब अमिराती (यूएई)च्या असल्याचे दाखवण्यात आले होते, तर प्रत्यक्षात त्या पाकिस्तानातून आल्या होत्या. हा संपूर्ण प्रकार भारत, पाकिस्तान आणि यूएईच्या नागरिकांमध्ये तयार झालेल्या एका जटिल नेटवर्कद्वारे चालवला जात होता. सुक्या खजुरांच्या बाबतीत दुबईतील एका भारतीय पुरवठादाराने पाकिस्तानमधून येणाऱ्या वस्तूंचे ट्रान्झिट करून बनावट पावत्या जारी केल्या. तपासयंत्रणेनेयापुरवठादाराला अटक केली आहे. तसेच सौंदर्य प्रसाधनांबाबत डीआरआयने एका कस्टम ब्रोकरला अटक केली आहे, ज्याने पाकिस्तानमधून येणाऱ्या वस्तू मूळच्या यूएईच्या असल्याचं खोटे सांगून भारतात प्रवेश करण्याचा प्रयत्न मिळवून दिला आहे.

### यापूर्वीही मोठी कारवाई

**जुलै २०२५ मध्ये डीआरआयने याच कारवाईंतर्गत ३९ कंटेनर जप्त केले होते, ज्यामध्ये सुमारे ९ कोटी रुपये किमतीचा १ हजार ११५ मेट्रिक टन माल होता. त्या प्रकरणात एका मोठ्या आयातदाराला अटक करण्यात आली होती. असे असूनही काही व्यापारी सरकारी बंदी टाळून मूळ देशाबद्दल कागदपत्रे आणि माहितीमध्ये फेरफार करून पाकिस्तानमधून वस्तू मिळविण्याचा प्रयत्न करीत आहेत.**

### देशाच्या सुरक्षेला धोका

**या आयातीमुळे केवळ आर्थिक नुकसान होत नाही तर त्यांचा संबंध पाकिस्तानच्या दुबईस्थित नेटवर्क आणि त्यांच्याशी जोडलेल्या दहशतवादाला पाठिंबा देणाऱ्या संघटनांशीदेखील असू शकतो. म्हणूनच यामुळे देशाच्या सुरक्षेला यातून गंभीर धोका होण्याची शक्यता आहे.**

### दोघांना अटक

**डीआयआरने केलेल्या कारवाईत आतापर्यंत पुरवठादार आणि एजंट अशा दोघांना बेड्या ठोकल्या आहेत. यामध्ये मोठी साखळी असण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. कंटेनरमधून वारंवार अवैध मार्गाने देशाबाहेरील मालाची तस्करी होत असल्याच्या घटना समोर येत असल्याने भीती व्यक्त करण्यात येत आहे.**



# सहयोग संस्थेचे कामकाज गतिमान

## जिल्हा बँकेचे चेअरमन जयंत पाटील यांचे गौरवोद्गार

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

रायगड जिल्ह्यात सहकार मोठ्या प्रमाणात फोफावला आहे. जिल्ह्यामध्ये सहकारात चांगली वाढ आहे. गोरगरीबांसाठी पतसंस्था, पतपेढी एक चांगले साधन आहे. सहयोग नागरी सहकारी संस्थेचे काम उत्तम आहे. सहकारासाठी पुढील काळ चांगला आहे. संस्थेचे कामकाज गतिमान आहे. पुढील काळात अर्थकारण बदलणार आहे. त्यानुसार अभ्यास केल्यास सहयोग संस्था अधिक वेगळ्या उंचीवर जाईल, असा विश्वास रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे चेअरमन जयंत पाटील यांनी केला.

सहयोग व्यापारी नागरी सहकारी पतसंस्थेची २५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा अलिबागमधील चेंढरे येथील चिंतामणराव •>पान २ वर

### सहयोग व्यापारी नागरी पतसंस्थेचा रौप्य महोत्सव

**अलिबागमधील सहयोग व्यापारी नागरी सहकारी पतसंस्था २००० मध्ये सुरु झाली. गोरगरीबांसह लघु उद्योग निर्माण करणाऱ्यांना आर्थिक बळ देण्याचे काम संस्थेने केले. २५ वर्षांत एक वेगळ्या उंचीवर संस्था पोहोचली आहे. संस्थेमध्ये सुमारे ५० कोटी ठेवी असून, या आर्थिक वर्षाच्या निव्वळ नफ्यातून १५ टक्के आणि मागील तीन वर्षांच्या रौप्य महोत्सव निधीतून अतिरिक्त प्रोत्साहनपर १० टक्के असा २५ टक्के लाभांश देणारी महाराष्ट्रातील पहिली पतसंस्था असल्याचा विश्वास व्यक्त करण्यात आला. या संस्थेचा रौप्य महोत्सव उत्साहात साजरा झाला.**

# संकुलाचे मैदान फुटबॉलसाठी अयोग्य



**आतापर्यंत तीसहून अधिक खेळाडूंना दुखापत**

**प्रमोद जाधव**

**। रायगड जिल्हा ।**

अलिबागमधील जिल्हा क्रीडा संकुलाच्या मैदानात जिल्हास्तरीय फुटबॉल स्पर्धा आयोजित केली आहे. परंतु, क्रीडा संकुलामधील मैदान फुटबॉल खेळण्यायोग्य नसल्याचा फटका खेळाडूंना बसत आहे. वाढलेले गवत पूर्ण कापले नसल्याने या मैदानात धावताना खेळाडूंना वारंवार दुखापत होत आहे. काही ठिकाणी दगडमाती असल्याने खेळताना अडचणी निर्माण होत आहेत. आतापर्यंत तीसहून अधिक खेळाडूंना दुखापत झाली असून, दोन खेळाडूंना गंभीर दुखापत झाल्याची माहिती समोर येत आहे.

करोडो रुपये खर्च करून दहा वर्षांपूर्वी जिल्हा क्रीडा संकुल उभारण्यात आले. धावपट्टीपासून वेगवेगळ्या सुविधा उपलब्ध करण्यात आल्या. परंतु, त्यांची वेळेवर देखभाल दुरुस्ती होत नसल्याने क्रीडा संकुलाची अवस्था बिकट झाली आहे. •>पान २ वर

> **गवत कापण्यापासून सर्व सुविधा उपलब्ध करण्यात आल्या आहेत. मैदानामुळे कोणाला त्रास झाल्याचे दिसून आले नाही. सहा महिन्यांपूर्वी जिल्हा क्रीडा अधिकारी म्हणून पदभार स्वीकारला आहे. खेळाडूंना चांगल्या सुविधा मिळाव्यात यासाठी प्रयत्नशील असून, आगामी काळात सुसज्ज अशी धावपट्टी व स्विमींग पूल तयार केला जाणार आहे.**
>
> **– प्रकाश वाघ,**
> जिल्हा क्रीडा अधिकारी

# मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी विश्वास पाटील

**। पुणे । प्रतिनिधी ।**

९९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ साहित्यिक आणि कादंबरीकार विश्वास पाटील यांची निवड करण्यात आली आहे. पुण्यात झालेल्या कार्यकारिणीच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. यावर्षीचे जानेवारीत संमेलन सातारा येथे होणार आहे. साताऱ्यामधे होणाऱ्या ९९ व्या अखिल भारतीय साहित्य संमेलनाचा अध्यक्ष निवडण्यासाठी पुण्यातील साहित्य परिषदेत आज सकाळी बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत पानिपतकार विश्वास पाटील यांच्या नावावर शिक्कामोर्तब झाले आहे.

विश्वास पाटील हे मराठी साहित्यातील एक प्रसिद्ध व लोकप्रिय कादंबरीकार आहेत. त्यांनी ऐतिहासिक, सामाजिक व राजकीय विषयांवर आधारित अनेक प्रभावी कादंबऱ्या लिहिल्या आहेत. 'पानिपत' ही त्यांची सर्वाधिक गाजलेली ऐतिहासिक कादंबरी असून, त्याची भुरळ आजही मराठी वाचकांवर आहे. पानिपतसारख्या ऐतिहासिक कादंबरीसाठी त्यांनी प्रचंड अभ्यास केला. विविध ऐतिहासिक ग्रंथ, दस्तऐवज, पत्रव्यवहार, तसेच तत्कालीन स्थलदर्शन यावर आधारित तपशील त्यांनी कथानकात गुंफले आहेत. यामुळे त्यांची लेखनशैली तथ्यपूर्ण, विश्वासार्ह आणि ऐतिहासिकदृष्ट्या बिनचूक वाटते. आगामी साहित्य संमेलन हे यावेळी •>पान २ वर

# विमानाचे उड्डाण होऊ देणार नाही

- भूमीपुत्रांचा निर्धार




**। पनवेल । विशेष प्रतिनिधी ।**

नवी मुंबई विमानतळ नामकरणाचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. एकीकडे सप्टेंबरअखेरपर्यंत विमानउड्डाणाच्या हालचाली सुरू असताना, दुसरीकडे मात्र नामकरणाबाबत सरकारकडून टाळाटाळ करण्यात येत आहे. जर विमानतळाला दि.बां.चे नाव देण्याचा निर्णय घेतला नाही, तर विमानतळावरुन एकाही विमानाचे उड्डाण होऊ देणार नाही, असा निर्धार भूमीपुत्रांनी केला आहे.

'विमानतळ दि.बा. पाटील यांच्या नावानेच हवा', अशा घोषणा देत रविवारी (दि. १४) भिवंडी लोकसभा मतदारसंघाचे खासदार सुरेश उर्फ बाळ्यामामा म्हात्रे यांच्या नेतृत्वाखाली भव्य कार रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. ही रॅली भिवंडीहून जासईपर्यंत मोठ्या उत्साहात पार पडली. यावेळी दि.बांच्या समर्थनार्थ रस्त्यावर उतरलेल्या समर्थकांनी गगनभेदी घोषणा देत आसमंत दुमदुमून सोडला होता. •>पान २ वर

### नेपाळसारखी क्रांती घडवू

**दि.बा. पाटील यांना अभिवादन करण्यासाठी ठाणे, पालघर, रायगड, नवी मुंबई, मुंबई येथून हजारोंच्या संख्येने आगरी, कोळी बांधव हे माणकोली येथे आले होते. कार रॅलीमध्ये मनसेचे माजी आमदार राजू पाटीलदेखील सहभागी झाले होते. ते म्हणाले की, दि.बा. पाटील यांचे नाव दिले नाही, तर नेपाळसारखी क्रांती नवी मुंबईत घडवून दाखवू.**

## महिला बचत गटांची दीड लाख गणेशमूर्तींची विक्री | व्यवसायातून सव्वा तेरा कोटींची उलाढाल

# रायगडातील स्त्रीशक्तीला बाप्पा पावला



**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

राज्य शासनाच्या उमेद अभियानांतर्गत गणेशमूर्ती विक्रीच्या व्यवसायात महिलांनी पाऊल ठेवले आहे. या व्यवसायातून महिलांना आर्थिक स्थैर्य प्राप्त झाले आहे. २५७ बचत गटाच्या महिलांना गणपती बाप्पा पावला असून, त्यांनी १ लाख ६६ हजार ८३३ गणपतीमूर्ती व्यवसायातून १३ कोटी १३ लाख ८७ हजार २०० रुपयांची उलाढाल केली आहे. रायगड जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांनी याबाबतची माहिती दिली. त्यांनी दिलेल्या प्रोत्साहन आणि मार्गदर्शनामुळेच जिल्ह्यातील महिलाशक्ती गणपती मूर्ती व्यवसायात गरुडझेप घेऊ शकल्या आहेत.

> **जास्तीत जास्त महिलांनी या व्यवसायात सहभागी होऊन या माध्यमातून उपजीविकेच्या नवनवीन संधी निर्माण होऊन महिला सक्षमीकरणाकडे वाटचाल करावी.**
>
> **– नेहा भोसले, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद**

रायगड जिल्ह्यातील पेण तालुका गणपती मूर्तींचे माहेरघर म्हणून ओळखले जाते. पेणमध्ये तयार केलेल्या गणपती मूर्तींना देश, विदेशात मोठी मागणी आहे. सुबक आखणी, नेटकी बैठक, सुंदर कोरीवकाम, रेखीव डोळ्यांची रचना आणि रंगकाम यामुळे पेणच्या गणपती मूर्तींना स्वतची खास ओळख प्राप्त झाली असून, गणपती मूर्तींना गणेशमूर्तींना भौगोलिक मानांकन मिळाले आहे. या व्यवसायात पेण तालुक्यातील महिला बचतगट उ तरले आहेत.

महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत पेण व जिल्ह्यातील इतर तालुक्यातील विविध बचत गटातील महिला या गणपती व्यवसायात सहभागी झाल्या आहेत. महिला बचत गटांनी १ लाख ६६ हजार ८३३ गणपती मूर्ती तयार केल्या असून, यामधील १ हजार ५०० गणपती मूर्ती परदेशात पाठविण्यात आल्या आहेत. •>पान २ वर

# चौघांविरूद्ध जादूटोणा प्रतिबंधक कायद्यानुसार गुन्हा दाखल

**। पेण । प्रतिनिधी ।**

पेण तालुक्यातील गौवळणवाडी गावातील फिर्यादी वामन दरोडा यांनी चौघांविरूद्ध फिर्याद नोंदविली आहे. हिरामण ठोंबरा, काशिनाथ ठोंबरा, परशुराम वाघ आणि भानुदास दरोडा यांनी फिर्यादीचे मेहुणे व सासरे गावात जादूटोणा करतात, त्यामुळे गावात बिमारी व मरणदाजी झाली आहे. अशाप्रकारे बोलून गावातील मिटींगमध्ये अंधश्रध्दा पसरवली तसेच फिर्यादीचा अपमान करून धमकी दिली आहे. म्हणून पेण पोलीस ठाण्यात महाराष्ट्र नरबळी आणि इतर अमानुष अनिष्ट प्रथा व जादुटोणा यांना प्रतिबंध करण्याकरिता व त्यांचे समूळ उच्चाटनाकरिता •>पान २ वर

# दोन दुचाकींची धडक

**। रोहा । प्रतिनिधी ।**

पहाटेच्या धुक्यात समोरून येणारी दुचाकी वाहन न दिसल्याने नागोठणे बाजूकडे आलेल्या मोटारसायकलस्वारने कुंडलिका पुलावर आल्यावेळी जोरदार धडक दिल्याने भीषण अपघात झाला. या अपघातात एकजण गंभीर जखमी झाला असून, त्याला पुढील उपचारासाठी मुंबई येथील हॉस्पिटलमध्ये हलविण्यात आले आहे. तर, दुसरा एकजण किरकोळ जखमी झाला आहे.



या घटनेतील आरोपी यज्ञेश संदीप सानप (रा. गोफण, ता. रोहा) हा शुक्रवारी पहाटे ४.४५ वा. च्या सुमारास आपल्यावर ताब्यातील हिरो स्प्लेंडर कंपनीची मोटारसायकल क्र. एमएच ०६ बी.टी. ३५२२ ही नागोठणे बाजूकडून रोहा बाजूकडे घेऊन जात असताना समोर येणाऱ्या दुसऱ्या मोटारसायकल क्र. एमएच ०६ एच ९३३९ हिस जोरदार ठोकर मारून भीषण अपघात झाला. या अपघातात शिवाजी नारायण शिट्यालकर (रा. वरसे, ता. रोहा) हा गंभीर जखमी झाला आहे. तर, आरोपी यज्ञेश सानप हा किरकोळ जखमी झाला आहे. या अपघाताविषयी मिताली शिवाजी शिट्यालकर यांनी फिर्याद दाखल केली आहे. पोलीस निरीक्षक मारुती पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली हवालदार टेमकर अधिक तपास करीत आहेत.

# ‘माझं कुंकू माझा देश’चा जाज्वल्य हुंकार

## • ठाकरेंच्या शिवसैनिकांचा पाकिस्तानविरुद्ध एल्गार

| अलिबाग | प्रतिनिधी |

**आशिया कप २०२५ मधील भारतपाकिस्तान क्रिकेट सामन्याचा उत्साह जगभरात असला, तरी महाराष्ट्रात संतापाचा ज्वालामुखी फुटला आहे. पहेलगाम येथील भ्याड दहशतवादी हल्ल्यानंतर पाकिस्तानचा हात उघड झाल्याने संपूर्ण देशभरातून संतापाची लाट उसळली असून, अशा रक्तरंजित पार्श्वभूमीवर भारताने पाकिस्तानशी क्रिकेट खेळणे हा शहिदांच्या बलिदानाचा अपमान असल्याचा ठाम सूर उमटू लागला आहे.**




या पार्श्वभूमीवर शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाने ‘माझं कुंकू माझा देश’ या राज्यव्यापी आंदोलनाचा जाज्वल्य हुंकार देत पाकिस्तानविरोधी एल्गार पुकारला आहे. अलिबाग येथे या आंदोलनाला महिलांचा उत्स्फूर्त सहभाग लाभला. महिला आघाडीच्या महिला अग्रभागी उभ्या राहून भाजप कार्यालयासमोर कडकडीत निदर्शने केली. यावेळी रायगड महिला संघटिका शिल्पा घरत, उपजिल्हा संघटिका दर्शना पाटील, विधानसभा तालुका संघटिका तनुजा पेरेकर, मुरुड तालुका संघटिका राजश्री मिसाळ, अलिबाग उपतालुका संघटिका लीना घरत, अलिबाग शहर संघटिका राखी खरवले, चौल ग्रामपंचायत माजी सरपंच रूपाली म्हात्रे, मुरुड विभाग प्रमुख मनाली पाटिल, ग्रामपंचायत सदस्य जागृती पिटकुर, संचिता भोईर आणि अलिबाग उपशहर प्रमुख सलोनी गिरी या सर्वजणींचा अग्रणी सहभाग होता.

रायगड जिल्हाप्रमुख सुरेंद्र म्हात्रे यांच्या मार्गदर्शनाखाली शिवसैनिकांनी अलिबाग येथील मध्यवर्ती कार्यालयातून भव्य मोर्चा काढला आणि थेट भाजप कार्यालयासमोर ‘‘भारत माता की जय’’, ‘‘पाकिस्तान मुर्दाबाद’’, ‘‘माझं कुंकू माझा देश’’ अशा प्रखर घोषणांनी संपूर्ण परिसर दणाणून गेला. आंदोलनाच्या ठिकाणी संतापाची लाट ओसंडून वाहत होती.

पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी ठामपणे सांगितले की, पाकिस्तान सतत भारताविरुद्ध दहशतवादी कारवाया करतो. अशा देशाशी क्रिकेट खेळणे हा शहिदांच्या रक्ताचा अपमान आहे. जोपर्यंत पाकिस्तान दहशतवादाला पाठिंबा देणं थांबवत नाही, तोपर्यंत भारतीय संघाने पाकिस्तानशी सामना खेळू नये. केंद्र सरकारने या संदर्भात ठोस भूमिका घेत देशाच्या जिव्हाळ्याचा प्रश्न मानून निर्णायक पावले उचलली पाहिजेत.

आज राज्यभर पेटलेलं ‘माझं कुंकू माझा देश’ आंदोलन हा केवळ क्रिकेट सामन्याला विरोध नसून, शहिदांच्या बलिदानाचा सन्मान राखण्यासाठी केलेला जाज्वल्य हुंकार आहे. रायगड जिल्ह्यातील अलिबागेत शिवसैनिकांचा लढाऊ उत्साह पाहून पाकिस्तानविरोधी भूमिकेचा ठाम संदेश देशभर पोहोचल्याचं स्पष्ट झालं आहे.

## उनपच्या प्रभाग, सदस्य संख्येत वाढ

| चिरनेर | प्रतिनिधी |

मागील तीन वर्षांपासून प्रशासकीय राजवट असलेल्या उरण नगरपरिषदेच्या प्रभागात वाढ झाली आहे. प्रभाग रचनेबाबत एकाही नागरिकाची हरकत, तक्रार दाखल झालेली नाही. यामुळे अंतिम प्रभाग रचनेचा प्रस्ताव मंजुरीसाठी गुरुवारी (दि. ११) शासनाकडे पाठविण्यात आला असल्याची माहिती मुख्याधिकारी समीर जाधव यांनी दिली.

उरण नगरपरिषदेचा कारभार मागील तीन वर्षांपासून प्रशासनाकडे सोपविण्यात आला आहे. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर उनपची अंतिम प्रभाग रचनेचा प्रारूप आराखडा तयार करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. याआधी १७ हजारांहून अधिक मतदारांची संख्या असलेल्या उनपमध्ये ९ प्रभागांतून १८ सदस्य व नगराध्यक्षपदासाठी निवड केली जात होती. आता नवीन प्रभाग रचनेनंतर प्रभागाची संख्या नऊवरुन दहा झाली आहे. तर, सदस्य संख्या नगराध्यक्ष वगळून तीनने वाढली असून, २१ पर्यंत पोहोचली आहे. ९ प्रभागांतून प्रत्येकी दोन, तर एका प्रभागातून एकूण तीन सदस्य अशी २१ सदस्य संख्या आहे. प्रभाग रचनेचा प्रारूप आराखडा तयार केल्यानंतर उनपने हरकती व तक्रारी दाखल करण्याच्या सूचना केल्या होत्या. मात्र, मुदतीत राजकीय पक्ष, पुढारी नेते, मतदार व एकाही नागरिकांकडून हरकत, तक्रारीची नोंद झालेली नाही. यामुळे उनपचा अंतिम प्रभाग रचनेचा प्रस्ताव मंजुरीसाठी शासनाकडे पाठविण्यात आला असल्याची माहिती मुख्याधिकारी समीर जाधव यांनी दिली. दरम्यान, प्रभाग रचनेबाबत कोणत्याही राजकीय पक्ष व एकाही नागरिकाची हरकत, तक्रार दाखल झालेली नाही. यामुळे रायगड जिल्ह्यातील उनप झिरो तक्रारी, हरकती नसलेली एकमेव नगरपरिषद ठरण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## पोक्सो कायद्याविषयक जनजागृती कार्यक्रम

| नवीन पनवेल | प्रतिनिधी |

आंतरराष्ट्रीय साक्षरता दिनानिमित्त तालुका विधी सेवा समिती, पनवेल यांच्या वतीने अमिटी युनिव्हर्सिटी येथे पोक्सो ॲक्टविषयक कायदेविषयक जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.




उमा बोराडे, न्यायाधीश, पनवेल यांनी न्याय हा प्रत्येक घटकाचा जन्मसिद्ध हक्क असल्याचे सांगितले आणि केवळ आर्थिक दुर्बलतेमुळे कोणीही न्यायापासून वंचित राहू नये, असे अधोरेखित केले. त्यांनी विद्यार्थ्यांना जीवनात महत्त्वाकांक्षी होण्यासाठी प्रोत्साहित केले. एम. वाय. राणे, न्यायाधीश, पनवेल यांनी कायद्याकडे सकारात्मक दृष्टिकोन ठेवण्याचे महत्त्व स्पष्ट केले व कायदेशीर जाण व्यक्तिमत्त्व घडविणारी असल्याचे सांगितले व आत्मविश्वासाने येणाऱ्या काळात उत्तुंग भरारी घेण्यास विद्यार्थ्यांना स्वअनुभवातून प्रेरणा देण्याचे काम केलं.

कार्यक्रमाच्या पूर्वार्धात ॲड. दिपाली बोहरा यांनी पोक्सो ॲक्टमधील महत्त्वपूर्ण तरतुदींबाबत मार्गदर्शन केले, तर ॲड. इंद्रजीत भोसले यांनी या कायद्याचे विविध पैलू सखोल विवेचनातून मांडले. समारोप करत पी.एल.व्ही. शैलेश कोंडसकर यांनी अमेठी युनिव्हर्सिटीच्या सर्व आयोजकांचे आभार मानले व विद्यार्थ्यांना या अश्या उपक्रमात जास्तीत जास्त सहभाग घेण्याचे आवाहन केले. ॲड. स्वाती सोनवणे, ॲड. सुयश कामेरकर, ॲड. मनीषा गावंडे तसेच वरिष्ठ लिपिक हेमंत आंबेतकर यांची उपस्थिती लाभली. या सर्वांच्या सहकार्यामुळे कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडला आणि विद्यार्थ्यांमध्ये कायदेविषयक जागरूकता वाढवून न्यायप्राप्ती प्रक्रियेवर विश्वास दृढ केला.

## गावातील जमीन गावाबाहेरील व्यक्तींना विकण्यास बंदी

| चिपळूण | प्रतिनिधी |

चिपळूण तालुक्यातील मोरवणे ग्रामपंचायतीच्या ग्रामसभेत गावकऱ्यांनी एक महत्त्वपूर्ण आणि ऐतिहासिक ठराव एकमुखाने मंजूर केला. या ठरावानुसार गावातील जमीन गावाबाहेरील अथवा परजिल्ह्यातील व्यक्तींना विकता येणार नाही. एखाद्या कुटुंबाला गरज भासल्यास ती जमीन फक्त गावातील नागरिकांनाच विकावी लागेल, असा या ठरावाचा स्पष्ट अटींचा उल्लेख आहे.

गेल्या काही वर्षांत कोकणातील निसर्गरम्य गावे परगावीय व परप्रांतीय लोकांचे आकर्षण बनली आहेत. हवामान, निसर्गरम्यता आणि परवडणाऱ्या दरात जमीन मिळत असल्याने बाहेरच्या लोकांनी मोठ्या प्रमाणावर कोकणात जमिनी खरेदी केल्या. या खरेदीमुळे स्थानिकांच्या भविष्यातील पिढ्यांसाठी जमीन उरणार नाही, अशी भीती सातत्याने व्यक्त केली जात होती. मोरवणे ग्रामसभेच्या निर्णयामुळे अशा अनियंत्रित व्यवहारांना आळा बसणार असल्याचे चित्र स्पष्ट होत आहे. ग्रामसभेत झालेल्या चर्चेत गावकऱ्यांनी ठाम भूमिका मांडली की जमिनी गावकऱ्यांच्या हक्कासाठी राखीव राहिल्या पाहिजेत. बाहेरचे लोक पैशाच्या जोरावर जमीन घेतात आणि गावाचा सामाजिक समतोल बिघडतो. स्थानिक तरुणांना शेतीसाठी किंवा घरे बांधण्यासाठी जागा उरत नाही. त्यामुळे हा ठराव अत्यावश्यक असल्याचे मत एकमुखाने मांडण्यात आले. अखेरीस सर्वानुमते हा ठराव मंजूर झाला.

## कळंब-वांगणी रस्त्याला तलावाचे स्वरूप

| नेरळ | प्रतिनिधी |



कर्जत तालुक्यातील कळंब-पाषाणे-वांगणी या रस्त्यावर आर्डे गावातून जाणाऱ्या रस्त्यावर गोरक्षनाथ मठाजवळ रस्त्यावर प्रचंड मोठे खड्डे पडले आहेत. त्याठिकाणी बांधकाम विभागाने रस्त्याचे काँक्रिटीकरण केलेले नाही. परिणामी, रस्त्यावर साचणारे पाणी पाहता तलावाचे स्वरूप रस्त्याला आलेले दिसून येत आहे. वाहनचालक यांच्याकडून त्या भागातील रस्त्याची सुधारणा करण्यात यावी, अशी मागणी करण्यात येत असून, त्या भागातील रस्त्याचे काम मंजूर असूनदेखील ठेकेदार यांच्याकडून केली जात नसल्याने स्थानिक संताप व्यक्त करीत आहेत.

कळंब-पाषाणे-वांगणी हा रस्ता बनविण्यासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याने आतापर्यंत किमान २० कोटी खर्च केले आहेत. मात्र, तरीदेखील हा रस्ता अद्यापपर्यंत एकदाही अखंडपणे डांबरीकरण करून तयार होऊ शकला नाही. ठेकेदारानाचे चोचले पुरविण्यासाठी कळंब पाषाणे रस्ता असल्याची तक्रार सातत्याने वाहनचालक आणि स्थानिकांच्या होत असते. मागील दोन वर्षांपूर्वी या रस्त्यावरील गावे असलेल्या ठिकाणी काँक्रिटीकरण आणि अन्य ठिकाणी रस्त्यावर डांबरीकरण पट्टे मारण्याचे नियोजन होते. त्यानुसार निधी मंजूरदेखील झाला होता. मात्र, रस्त्याचे काम करणाऱ्या ठेकेदाराने त्यातील अनेक कामे अर्धवट ठेवल्याने रस्त्याअभावी या रस्त्यावर गोरगरीब लोकांसाठी चालविली जाणारी राज्य परिवहन महामंडळाची एसटी गाडी बंद झाली आहे. एसटी गाड्या बंद झाल्याने शाळा-कॉलेजसाठी घरातून बाहेर पडणाऱ्या विद्यार्थ्यांना आणि नोकरी साठी बाहेर पडणाऱ्या रहिवाशांना खिशाला आर्थिक चाट देऊन खासगी वाहनातून प्रवास करावा लागत आहे.

या रस्त्यावर मंजूर असलेल्या कामांपैकी आर्डे गावाच्या हद्दीमधील काँक्रिटचे काम सार्वजनिक बांधकाम खात्याकडून पूर्ण झालेले नाही. त्याचा फटका या भागातून प्रवास करणाऱ्या वाहनचालक यांना होत असून, आर्डे गावातील प्रसिद्ध अशा मठाच्या समोरचा रस्ता काँक्रिटचा बनवला गेलेला नाही. त्यामुळे त्या ठिकाणी रस्त्यावर प्रचंड खड्डे पडले असून, रस्ता तयार केला नसल्याने आता पावसाळ्यात त्या भागातील रस्त्याला तलावाचे स्वरूप आले आहे. सार्वजनिक बांधकाम विभाग त्या खड्डेमय रस्त्याबद्दल आणि तेथून पुढे माले गावाच्या आजूबाजूला न झालेल्या रस्त्याबद्दल ठेकेदारांवर कारवाई करणार आहे काय, असा प्रश्न स्थानिकांकडून विचारला जात आहे.

## ओबीसी आरक्षणाच्या विवंचनेतून दुसरा बळी

| धाराशिव | प्रतिनिधी |

धाराशिव जिल्ह्यातील वाशी तालुक्यातील सारोळा मांडवा गावात ५५ वर्षीय शेतकऱ्याने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. मयत शेतकऱ्याचे नाव माणिकराव डोईफोडे असे असून, ओबीसी आरक्षण जाणार या विवंचनेतून त्यांनी आत्महत्या केली असल्याचा दावा त्यांच्या नातेवाईकांनी केला आहे.

राज्यात गेल्या काही दिवसांपासून मराठा आणि ओबीसी आरक्षणावरून वातावरण तापलेले असताना धाराशिवमध्ये ५५ वर्षीय व्यक्तीने आत्महत्या केल्याची घटना घडलीय. नुकतीच बीडमध्ये ओबीसी आरक्षणाच्या अनिश्चिततेमुळे एका हतबल बापाने आपल्या मुलीच्या नोकरीचे कसे? या विवंचनेतून आत्महत्या केल्याची घटना ताजी असतानाच धाराशिवमध्ये तशीच घटना घडल्याने खळबळ उडाली आहे. ओबीसी आरक्षणावरील घडामोडी पाहता मुलाला नोकरी कशी मिळेल? याबाबत ते सतत चिंताग्रस्त होते, अशी माहिती त्यांच्या कुटुंबियांनी दिली.

पान १ वरून

## संकुलाचे मैदान फुटबॉलसाठी अयोग्य

मैदानात ठिकठिकाणी गवत वाढले आहे. स्वच्छतागृहांची दुरवस्था झाली आहे. मंगळवार (दि.९) पासून अलिबागमधील जिल्हा क्रीडा संकुलाच्या मैदानात जिल्हास्तरीय फुटबॉल स्पर्धा आयोजित केल्या आहेत. या स्पर्धेमध्ये जिल्हाभरातून मोठ्या संख्येने खेळाडूंनी सहभाग घेतला आहे. फुटबॉल खेळण्यायोग्य मैदान नसल्याने या खेळाडूंचे प्रचंड हाल होत असल्याची माहिती समोर आली आहे.

मैदानातील गवत पूर्ण न काढल्याने गवतातून धावताना अनेकवेळा पायाला दुखापत होण्याच्या घटना घडत आहे. या तीन दिवसांमध्ये सुमारे आठहून अधिक जणांना किरकोळ दुखापत झाली आहे. यातील एकाला गंभीर दुखापत झाली असल्याने अलिबागमधील जिल्हा रुग्णालयात उपचारासाठी पाठविण्यात आले. पनवेल तालुक्यातील पळस्पे येथील हा खेळाडू असल्याची माहिती उपलब्ध झाली आहे. फुटबॉल खेळण्यासाठी लागणारे सुसज्ज मैदान नसल्याने येथील अनेक खेळाडूंना अन्य ठिकाणी जावे लागत आहे.

**तीसपेक्षा अधिक खेळाडूंवर उपचार**

अलिबागमधील नेहुली येथील जिल्हा क्रीडा संकुलामध्ये चार दिवसांपासून फुटबॉल स्पर्धा सुरु आहे. या स्पर्धेत दुखापत होणाऱ्या खेळाडूंवर तातडीने प्राथमिक उपचार करण्याचे काम आरोग्य यंत्रणेमार्फत केले जात आहे. आतापर्यंत तीसहून अधिक खेळाडूंवर उपचार केले आहेत. त्यात १५ व १९ वर्षाखालील अशा दोन खेळाडूंना गंभीर दुखापत झाली. त्यांना १०८ व १०२ रुग्णवाहिकेमार्फत अधिक उपचारासाठी जिल्हा सामान्य रुग्णालयात पाठविले असल्याची माहिती आरोग्य विभागाकडून देण्यात आली.

अलिबागमध्ये जिल्हा क्रीडा संकुल बांधले आहे. परंतु, या संकुलाची वेळेवर देखभाल दुरुस्ती होत नाही. त्यामुळे खेळाडूंना योग्य असे मैदान उपलब्ध होत नाही. क्रीडा संकुलामध्ये फुटबॉल खेळण्यायोग्य मैदान नाही. त्यामुळे खेळाडूंना दुखापत होण्याच्या घटना कायमच घडत असतात. खेळाडूंच्या सुरक्षेच्या दृष्टीने सुसज्ज असे मैदान असणे आवश्यक आहे.

## रायगडातील स्त्रीशक्तीला बाप्पा पावला

गणपती मूर्ती व्यवसायातून १३ कोटी १३ लाख ८७ हजार २०० रुपयांची उलाढाल केली आहे. व्यवसायासाठी उमेद अभियानमार्फत महिला बचत गटांना फिरता निधी तसेच ग्राम संघांना समुदाय गुंतवणूक निधी आणि बँकांमार्फत पतपुरवठा करण्यात आला असून, महिलांच्या या व्यवसायाला गती प्राप्त झाली आहे. या व्यवसायामुळे महिलांच्या हाताला काम मिळाल्यामुळे त्या अधिक सक्षम बनल्या आहेत.

अलिबाग तालुक्यातील विक्री केलेल्या मूर्तींची संख्या १ हजार २७७ असून, एकूण उलाढाल ८ लाख १५ हजार. कर्जत तालुक्यातील विक्री केलेल्या मूर्तींची संख्या ३ हजार ४५० असून, एकूण उलाढाल ३० लाख ५० हजार. खालापूर तालुक्यातील विक्री केलेल्या मूर्तींची संख्या १५० असून, एकूण उलाढाल २ लाख ३० हजार. महाड तालुक्यातील विक्री केलेल्या मूर्तींची संख्या ३२० असून, एकूण उलाढाल २ लाख ५० हजार. माणगाव तालुक्यातील विक्री केलेल्या मूर्तींची संख्या ४२० असून, एकूण उलाढाल ३ लाख ४५ हजार. म्हसळा तालुक्यातील विक्री केलेल्या मूर्तींची संख्या ३५८ असून एकूण उलाढाल २ लाख ९६ हजार ५००. मुरुड तालुक्यातील विक्री केलेल्या मूर्तींची संख्या ६५० असून एकूण उलाढाल १६ लाख २५ हजार. पनवेल तालुक्यातील विक्री केलेल्या मूर्तींची संख्या २२० असून एकूण उलाढाल ६ लाख ४५ हजार. पेण तालुक्यातील विक्री केलेल्या मूर्तींची संख्या १ लाख ५८ हजार १०२ असून एकूण उलाढाल १२ कोटी २१ लाख ९५ हजार ७००. पोलादपूर तालुक्यातील विक्री केलेल्या मूर्तींची संख्या १३५ असून एकूण उलाढाल १ लाख ६५ हजार. रोहा तालुक्यातील विक्री केलेल्या मूर्तींची संख्या ९८ असून एकूण उलाढाल ६० हजार. श्रीवर्धन तालुक्यातील विक्री केलेल्या मूर्तींची संख्या ४५० असून एकूण उलाढाल ६ लाख ६५ हजार. सुधागड तालुक्यातील विक्री केलेल्या मूर्तींची संख्या १०० असून एकूण उलाढाल ७० हजार. तळा तालुक्यातील विक्री केलेल्या मूर्तींची संख्या १३८ असून एकूण उलाढाल २ लाख ६० हजार. उरण तालुक्यातील विक्री केलेल्या मूर्तींची संख्या ९६५ असून एकूण उलाढाल ७ लाख १५ हजार. अशा एकूण १ लाख ६६ हजार ८३३ विक्री केलेल्या मूर्तींची संख्या असून एकूण उलाढाल १३ कोटी १३ लाख ८७ हजार २०० रुपयांची करण्यात आली आहे.

## शेतकऱ्यांसाठी आनंदवार्ता

रस्त्याची माहिती नकाशावर सत्यपित करून त्याचे डिजिटल रेकॉर्ड तयार करण्यात येईल.

**मतदारसंघनिहाय समिती**

या योजनेच्या कामकाजासाठी आमदारांच्या अध्यक्षतेखाली मतदारसंघनिहाय एक समिती स्थापन केली जाईल. समितीत प्रांताधिकारी सदस्य सचिव तर तहसीलदार, गटविकास अधिकारी, भूमि अभिलेख अधिकारी, तालुका कृषी अधिकारी आणि वन विभागाचे अधिकारी काम करतील.

**नोंद होणार डिजिटल**

नकाशावर रस्ते प्रपत्र १ आणि प्रपत्र २ वर नवीन आणि जुन्या रस्त्यांची माहिती असेल. तर प्रत्येक गावासाठी नव्या प्रकारची जमीन नोंदवही ज्याला फ नमुना म्हणतात तो तयार होईल. याची सर्व नोंद डिजिटल स्वरुपात करण्यात येईल.

## सहयोग संस्थेचे कामकाज गतिमान

केळकर विद्यालयाच्या सभागृहात रविवारी (दि. १४) आयोजित करण्यात आली. यावेळी जयंत पाटील बोलत होते. यावेळी संस्थेचे चेअरमन योगेश मगर, उपाध्यक्ष संजय पाटील, सर्व संचालक, सभासद, अधिकारी, कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. याप्रसंगी जयंत पाटील म्हणाले की, गेल्या अनेक वर्षांपासून सहकार क्षेत्रात काम करीत आहे. या क्षेत्रात काम करीत असताना कधीही राजकारण केले नाही. सर्वांना मदत करण्याचे काम ३५ वर्षांच्या कारकीर्दीत काम केले. त्यामुळे एक वेगळा विश्वास सहकार क्षेत्रात निर्माण केला आहे. जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या माध्यमातून राज्यात एक वेगळा दबदबा सहकारात निर्माण करण्यात यश आले आहे. सहकारातला पैसा सहकारातच राहिला पाहिजे. पतपेढी चालविणे सोपे नाही. मात्र, सहयोग संस्थेची वाटचाल चांगल्या पद्धतीने आहे. शून्यातून निर्माण केलेली संस्था एक वेगळ्या उंचीवर असल्याचा आनंद आहे. राजकारणाचे जोडे बाजूला ठेवून सहकार वाढविण्यावर भर द्या. पुढील काळात शंभर कोटींच्यावर संस्था होईल, असा विश्वास जयंत पाटील यांनी व्यक्त केला.

## मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी विश्वास पाटील

साताऱ्यात होणार आहे. त्यामुळे साताऱ्याच्या साहित्यप्रेमींसाठी मोठी पर्वणी असणार आहे. साताऱ्यातील शाहू स्टेडियम येथे साहित्य संमेलनाचं आयोजन करण्यात येणार आहे. विशेष म्हणजे सलग चार दिवस हे संमेलन चालणार आहे. मिळालेल्या माहितीनुसार, नववर्षाच्या सुरुवातीलाच म्हणजेच १, २, ३ आणि ४ जानेवारी २०२६ या दिवशी साहित्य संमेलनाचा कार्यक्रम पार पडणार आहे. याशिवाय संमेलनाच्या उद्घाटनाच्या आदल्या दिवशी ग्रंथदिंडी निघणार आहे.

## विमानाचे उड्डाण होऊ देणार नाही

रॅलीची सुरुवात सकाळी ९ वाजता मानकोली, भिवंडी येथून झाली. कळवा, ऐरोली, रबाळे, नेरुळ, सानपाडा, नवी मुंबई पालिका मुख्यालय, रेतीबंदर गेट अशा मार्गाने जात ही रॅली जासई गावात पोहोचली. जासई येथे आयोजित अभिवादन सभेत दि.बा. पाटील यांच्या जन्मशताब्दीनिमित्त श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. सुमारे दोन हजारांहून अधिक वाहनांचा या रॅलीत सहभाग होता. स्थानिक भूमीपुत्र, आगरी-कोळी समाज, विविध सामाजिक संघटना आणि स्थानिक नागरिकांनी मोठ्या संख्येने रॅलीला हजेरी लावली. रॅलीदरम्यान ‘विमानतळ दि.बा. पाटील यांच्या नावानेच हवा’, अशा घोषणा देण्यात आल्या. यावेळी खासदार सुरेश म्हात्रे म्हणाले, ‘‘स्थानिकांच्या भावना लक्षात घेऊन विमानतळाला दि.बा. पाटील यांचेच नाव दिले पाहिजे. न्याय मिळेपर्यंत हे आंदोलन सुरू राहील.’’ नवी मुंबई विमानतळ नामकरणाचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

**विमानतळाचे उद्घाटन होऊ देणार नाही**

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला लोकनेते दि.बा. पाटील यांचे नाव देण्यात येत नाही, तोपर्यंत या विमानतळाचे उद्घाटन होऊ देणार नाही, असा इशाराही खासदार सुरेश म्हात्रे यांनी थेट केंद्र सरकारला दिला. दि.बा. पाटील यांचे हे जन्मशताब्दी वर्ष आहे. यानिमित्ताने नवी मुंबई विमानतळाला त्यांचे नाव मिळाले पाहिजे, अशी मागणी त्यांनी केली

## चौघांविरूद्ध जादूटोणा प्रतिबंधक कायद्यानुसार गुन्हा दाखल

अधिनियम २०१३ चे कलम ३(२) नुसार गुन्हा दाखल झाला आहे. या प्रकरणात पोलीस निरीक्षक संदीप बागूल यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक नवरखेडे हे अधिकचा तपास करत आहेत. सदरील घटना पेण तालुक्यातील सावरसई ग्रामपंचायतीमधील गौवळणवाडी येथे घडली आहे.




## लोक अदालतमध्ये सात जोडप्यांच्या पुन्हा जुळल्या रेशीमगाठी

| खरोशी | प्रतिनिधी |

बेलापूर विभक्त होण्याच्या उंबरठ्यावर पोहोचलेल्या ०७ जोडप्यांनी शनिवार १३ सप्टेंबर रोजी कौटुंबिक न्यायालय, बेलापूर नवी मुंबई येथे पार पडलेल्या लोकअदालतीत पुन्हा सुखाने नांदण्याचा निर्णय घेतला. सदर लोकअदालतीत कौटुंबिक न्यायालयात एकूण ९८ दावे ठेवण्यात आले होते. या दाव्यांमधील ०७ जोडप्यांनी घटस्फोटाचा मार्ग सोडून पुन्हा संसार सुरू करण्याचा निर्णय घेतला, त्यांच्या रेशीमगाठी पुन्हा जुळल्याने त्यांचे परिवार व मुले आनंदी झाली आहेत. यावेळी न्यायाधीशांच्या हस्तेसोबत नांदायला गेलेल्या जोडप्यांना नवी मुंबई कोर्ट वकील संघटना यांच्यातर्फे ‘नांदा सौख्यभरे’चे प्रमाणपत्र व भेटवस्तू देऊन सन्मानित करण्यात आले.

प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा अध्यक्ष जिल्हा विधी सेवा प्राधिकरण एस.बी. अग्रवाल, बेलापूर तालुका विधी सेवा समितीचे अध्यक्ष जिल्हा न्यायाधीश-१ सी.व्ही. मराठे, कौटुंबिक न्यायालयाचे न्यायाधीश सुभाष रं. काफरे व प्राधिकरणाचे सचिव रवींद्र पाजणकर यांच्या मार्गदर्शनाखाली ही लोकअदालत पार पडली. सध्या न्यायालयात वैवाहिक वादाचे व पोटगीसाठीचे १७७२ दावे प्रलंबित आहेत. यापैकी ९८ दावे लोक अदालतीसमोर निकाली काढण्यासाठी ठेवले होते. पी. ए. साने, जिल्हा न्यायाधीश-३ तथा अतिरिक्त सत्र न्यायाधीश, बेलापूर, नवी मुंबई आणि डिंपल चांद्रा, विधीज्ञ वकिल संघटना नवी मुंबई यांनी पॅनल सदस्य म्हणून काम पाहिले. सदर लोकन्यायालयाच्या यशस्वीतेसाठी नवी मुंबई कोर्ट वकील संघाचे अध्यक्ष सुनिल मोकल, उपाध्यक्ष संदिप रामकर, सचिव विकास म्हात्रे, खजिनदार तुषार राऊत, सहसचिव संजय म्हात्रे व हेमांगी पाटील आणि कार्यकारिणी सदस्य समीत राऊत, दत्तात्रय जगताप, अजिंक्य गव्हाणे, निलेश पाटील आणि डिंपल चांद्रा यांनी सहकार्य केले. तसेच कौटुंबिक न्यायालयाचे प्रबंधक गणेश हिरवे, विवाह समुपदेशक भारत काळे, लघुलेखक विजय पोटे, सहा अधिक्षक राजेश म्हात्रे, वरिष्ठ लिपीक कांचन किर्वे, कनिष्ठ लिपीक श्रेया म्हात्रे, अक्षता कोळसुंदकर आणि सहाय्यक प्रिती नन्नावरे व राज निकम यांनी यशस्विरित्या सहकार्य केले.

अलिबाग गोंधळपाडा येथे ऑफीस कामासाठी अर्जंट कॉम्प्युटर ज्ञान असणारी मुलगी हवी आहे तसेच तिला मराठी/इंग्रजी टायपिंग येणे आवश्यक आणि हिंदी बोलता आले पाहिजे तसेच ग्राहकांचे कॉल रिसीव्ह करता आले पाहिजे. ऑफीस टाईम ९.३० ते ५.३० पगार ८ ते १० हजार पर्यंत मिळेल.
**ऑफीस पत्ता :** बेवूड गोंधळपाडा शॉप नं ५ स्वरीन अलिबाग **फोन नं ८४३३८७७४९**

# धसाखोशी येथे रानडुकरांचा हैदोस

## शेतातील भातपिकांचे अतोनात नुकसान



> बांधपाडा ग्रुप ग्रामपंचायत हद्दीतील धसाखोशी येथील भातशेतीत रान डुकरे नुकसान करीत आहेत. या शेतकऱ्यांच्या तक्रारी बाबत महसूल विभागाचा विषय असल्याने तातडीने उरणचे तहसीलदार आणि कोप्रोली मंडळ अधिकाऱ्यांना लेखी पत्राद्वारे कळविले आहे.
>
> – राजेंद्र सातंगे, ग्रामविकास अधिकारी, ग्रुप ग्रामपंचायत बांधपाडा

| चिरनेर | प्रतिनिधी |

उरण तालुक्यातील बांधपाडा ग्रुप ग्रामपंचायत हद्दीतील धसाखोशी येथील भातशेतीमध्ये रान डुकरांनी मोठ्या प्रमाणात हैदोस घातला आहे. त्यामुळे हातातोंडाशी आलेल्या पिकांचे मोठे नुकसान होत आहे. याबाबत धसाखोसी येथील शेतकऱ्यांनी उरण पंचायत समितीचे विस्तार अधिकारी तथा बांधपाडा ग्रुप ग्रामपंचायतीचे प्रशासक विनोद मिंडे व ग्रामविकास अधिकारी राजेंद्र सातंगे यांची भेट घेतली. त्यांच्यासमोर भात शेतीच्या नुकसानी बाबत कैफियत मांडून या रान डुकरांचा बंदोबस्त करण्याबाबत निवेदन दिले आहे.

सध्या बियाणे, रासायनिक खते व मजुरीच्या संख्येत नियमित न परवडणारी होत असलेली वाढ आणि पावसाचा भरोसा लक्षात घेता भातशेतीचे पिक घेणे अतिशय जिकरीचे झाले आहे. त्यामुळे शेतकरी कमालीचा हैराण झाले आहेत. मात्र, आपल्या पूर्वजांनी आजतागायत शाबूत ठेवलेली काळी आई तथाकथीत भांडवलदाराच्या घशात न घालता त्याची दरवर्षी मशागत करून भातशेतीचे पिक घेतले जाते. मात्र, या आता रान डुकरांचा हैदोस वाढला असून हातातोंडांशी आलेल्या भातपिकाच्या होणाऱ्या नुकसानीमुळे येथील शेतकरी अक्षरशः हैराण झाले आहेत.

काही वर्षांपूर्वीपासून विकासाच्या नावाखाली येथील डोंगर पोखरल्यामुळे जंगलात आदीवास करणाऱ्या वन्य प्राण्यांना आता आश्रय व संरक्षण राहिलेले नाही. जंगल परिसरात दरवर्षी बेसूमारपणे आगीचे वणवे लावण्याचे कारस्थान समाज कंटकांकडून केले जात आहे. त्यामुळे जंगलातील पशु-पक्ष्यांच्या जिवाला धोका निर्माण झाला आहे. त्यांचे जनजीवन उद्ध्वस्त होत असल्याने जंगलातील रानडुकरांनी खाडीकिनारी आपला मोर्चा वळविला आहे. अगदी पेण तालुक्यातील रावे, दादर, उर्णोलीसह उरण तालुक्यातील केळवणे, पुनाडे वशेणी, आवरे, कडापे गोवठणे, खोपटे येथील खाडीकिनारी असलेल्या तिवरांच्या वृक्षांची पाने व खाडीतील खेकडे आणि मासळी खाण्यासाठी त्यांनी तेथेच वास्तव्य करून राहणे निश्चित केले आहे. त्यामुळे धसाखोशी येथील खाडीत असलेली रानडुकरे रात्रीच्या काळोखात कळपाने वावरून अनेकांच्या शेतातील भातपिकांचे नुकसान करीत आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांच्या हातातोंडांशी आलेल्या पिकांचे प्रचंड प्रमाणात नुकसान होत आहे.त्यामुळे या रान डुकरांचा वेळीच बंदोबस्त करून येथील शेतकऱ्यांना पिकांची नुकसान भरपाई मिळावी, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

# रोहा पोलिसांची धडक कारवाई

## अडीच लाखांची गावठी दारू नष्ट

| रोहा | प्रतिनिधी |

रोह्यातील जंगल भागात गावठी दारू निर्मितीचे अड्डे सुरु असल्याची माहिती रोहा पोलिसांना मिळाली होती. त्यानंतर पोलिसांच्या एका पथकाने जंगल भागात १ किलोमीटर अंतर पायपीट करत घटनास्थळी पोहोचले. त्यांनी त्याठिकाणी असलेली सुमारे अडीच लाख रुपये किंमतीची गावठी दारू तयार करण्यासाठी लागणारे रसायन व अन्य साहित्य जाळून नष्ट केले. तसेच, चार गावठी दारू माफियांविरोधात कायदेशीर कारवाई केली आहे. रोहा पोलिसांच्या या धडक कारवाईमुळे गावठी माफियांचे धाबे दणाणले आहेत.

रोहा पोलीस ठाणे हद्दीतील करविणे जवळील टिटवी गावातील घनदाट जंगल भागात नदीच्या ओहळमध्ये गावठी दारू हातभट्टी सुरू होती. याठिकाणी दारू तयार करुन ती मुरूड परिसरात विक्री केली जात असल्याची माहिती रोहा पोलिसांना मिळाली होती. पोलीस निरीक्षक मारुती पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली एक विशेष पथक नेमण्यात आले. त्यांनी शनिवारी (दि.१३) दुपारच्या सुमारास टिटवी येथे धडक दिली. या गावापासून साधारण १ किलो मीटर अंतरावर जंगल भागात पायी चालत जाऊन नदीच्या ओहळात तीन झोपड्या



दिसल्या. या ठिकाणी गावठी दारू पाडण्यासाठी लागणारे रसायन, लाकडे, भांडी व प्लास्टिकचे १६ पिंप आढळले. त्यामध्ये सुमारे २ लाख ४० हजार रुपये किंमतीची ४ हजार लिटर गावठी दारू मिळून आली. त्यातील काही रसायन रासायनिक विश्लेषण करिता पोलिसांनी पंच समक्ष ई-साक्ष नुसार पंचनामा केला. या कारवाईच्या दरम्यान घटनास्थळी योगेश साहू झोरे (२६) याला ताब्यात घेतले. पोलिसांनी अधिक चौकशी केली असता ही दारूभट्टी योगेश झारे याच्याह मिलिंद दामू झोरे, काशिनाथ बाबू ढेबे व बाळाराम कोंडू होगडे यांची असल्याचे समजले. यादरम्यान गावठी दारू माफियांविरोधात पोलिसांनी कायदेशीर कारवाई केली आहे.

# मोकाट गुरांचा रास्ता रोको सुरूच



| सुधागड-पाली | प्रतिनिधी |

सुधागड तालुक्यात मोकाट गुरांचा प्रश्न गंभीर बनत असताना वर्दळीच्या वाकण-खोपोली महामार्गावर भर रस्त्यात ही गुरे ठिय्या मारून बसत आहेत. त्यातून वाट काढताना वाहन चालकांना कसरत करावी लागत आहे. अनेकदा वाहनांची धडक लागल्याने गुरांना प्राण गमवावे लागत असल्याच्या घटनाही घडत आहे. गुरांच्या या अघोषित 'रास्ता रोको' बाबत प्रसारमाध्यमांनी वारंवार लक्ष वेधूनही कोणतीच कारवाई होत नसल्याने सखेद आश्चर्य व्यक्त होत आहे. औद्योगिकीकरण झालेल्या सुधागड तालुक्यात शेतीचे प्रमाण कमी आहे. घराजवळ असलेले गुरांचे गोठेही आता दिसेनासे झाले आहेत. यामुळे अनेकांनी गुरे मोकाट सोडली आहेत. या गुरे शहरातील रस्त्यांवर बिनदिक्कतपणे ठिय्या मारत असतात. वाकण-खोपोली महामार्गावर अनेक ठिकाणी या मोकाट गुरांमुळे वाहनचालक व प्रवाशांना त्रास सहन करावा लागत आहे. रात्रीच्या वेळी तर रस्त्यात बसलेली गुरे चटकन नजरेत येत नसल्याने वाहनचालकांची तारांबळ उडत आहे.

# बेमुदत जेएनपीए चॅनेल बंद आंदोलन

| उरण | प्रतिनिधी |

रायगड जिल्हाधिकारी हे पुनर्वसन कायद्यानुसार शेवा कोळीवाडा संक्रमण शिबीर व्यवस्थापन करत नसल्याच्या निषेधार्थ विस्थापित महिला संघटना २ ऑक्टोबरपासून जेएनपीएचे बेमुदत चॅनेल बंद आंदोलन करणार आहेत. शेवा कोळीवाडा विस्थापित महिला संघटनेने प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकातुन ही बाब समोर आली आहे. या आंदोलनमुळे शेवा कोळीवाडा ग्रामस्थांचे अजूनही मागण्या मान्य न झाल्याची बाब समोर आली आहे. त्यामुळे वर्षानुवर्षे शेवा कोळीवाडा ग्रामस्थांचे पुनर्वसन न झाल्याने व विविध मागण्या पूर्ण न झाल्याने आता राज्य व केंद्र शासनाच्या भूमिकेवरच प्रश्नचिन्ह निर्माण होत आहेत.



जिल्हाधिकारी रायगड यांनी १५ ऑगस्टच्या जेएनपीएचे चॅनेल बेमुदत बंद आंदोलन मागे घेण्याबाबत ६ ऑगस्ट रोजी २१ मुद्यांवर बैठकीत निर्णय घेतले होते. त्याचे इतिवृत दीड महिना उलटून हि देत नाहीत. हनुमान कोळीवाडा गावाच्या पुनर्वसनाचे काम अद्याप सुरू असून पुनर्वसन पूर्ण झाल्याचे दिसून येत नाही. या गावातील रहिवाशांकरिता गावठाण घोषित नाही. तसेच, नमूना ८ वरील नोंदीत मालमत्ता धारकांडे घर /इमारतीचे शासकीय अभिलेख (सनद तथा ७/१२) उपलब्ध नाहीत. म्हणून हनुमान कोळीवाडा ग्रामपंचायत बरखास्त केली असताना ती जिवंत ठेवन्याच्या निषेधार्थ २ ऑक्टोबर पासून जेएनपीएचे चॅनेल बेमुदत बंद करणार असल्याचे शेवा कोळीवाडा विस्थापित महिला संघटनेने रविवारी (दि.१४ दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे.

# वंचित कृती समितीची स्थापना

| खांब | प्रतिनिधी |

रोहा तालुक्यामध्ये बहुतांश गावांमध्ये कुणबी समाजाची वस्ती आहे. जन्माने व कर्माने कुणबी असून देखील या समाजातील वंचित गोरगरीब कुटुंबातील विद्यार्थ्यांना कुणबी जात प्रमाणपत्र मिळत नसल्यामुळे तसेच त्याची पडताळणी होत नसल्यामुळे कितीतरी विद्यार्थ्यांचे उच्च शिक्षणाअभावी आयुष्य उद्ध्वस्त झालेले आहे. यासाठी शासन दरबारी निवेदने देऊन, मोर्चे काढून हाती यश आले नाही. शनिवारी (दि.१३) कुणबी समाजोन्नती संघ ग्रामीण शाखेची बैठक संपन्न झाली. यामध्ये जात प्रमाणपत्र वंचित कृती समितीची स्थापना करण्याचे सर्वानुमते ठरवण्यात आले.

# रिस येथील गुलमोहर सोसायटीत चोरी

| रसायनी | प्रतिनिधी |

रिस येथील गुलमोहर सोसायटीमध्ये बंद घराचे कुलूप तोडून चोरी केल्याची घटना घडली आहे. रिस गुलमोहर सोसायटीमध्ये पहिल्या मजल्यावरील खोली क्रमांक ३ मध्ये राहणारे नितिन रामनाथ घरत हे आपल्या पेण येथील गावी गेले होते. त्यावेळी चोरांनी बंद दरवाजाचे कुलूप तोडून घरातील सोन्याचे गळ्यातील सर, पान, कानातील रिंग, नथ आणि १ व २ ग्रॅम वजनाचे सोन्याचे कॉईन असे १२ ग्रॅम वजनाचे दागिने लंपास केले आहे. नितिन घरत यांनी दिलेल्या तक्रारीवरून रसायनी पालिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

# वेध नवरात्रीचे...



● पनवेलकरांना नवरात्रीचे वेध लागले असून पारंपारिक पोषाख खरेदीसाठी येथील बाजारपेठेत मोठ्या प्रमाणात गर्दी होत आहे. (छायाचित्रः राजेश डांगळे)

# फूस लावून कार लंपास

| रसायनी | प्रतिनिधी |

चांभार्ली येथे राहणारे भानुदास जांभळे हे आपल्या टाटा टीयागो (एमएच-४६-एयू-६९०६) गाडीने दांड फाट्यावरून चांभार्लीकडे जात होते. त्यावेळी रिस भटवाडीच्या स्टॉपजवळ त्यांच्या गाडी पुढे एका अज्ञात दुचाकीस्वाराने आपली दुचाकी थांबवली. यावेळी भानुदास जांभळे यांनी दुचाकी गाडीच्यामध्ये का थांबविली, अशी विचारणा केली. त्यावेळी त्याने तुम्ही आमच्या साहेबांच्या दुचाकीला तुमच्या कारने घासले. तुम्ही आमच्या साहेबांकडे चला, असे सांगितले. यावेळी भानुदास जांभळे दुसऱ्या व्यक्तीकडे गेले तेव्हा त्याने तुम्ही माझ्या दुचाकीला गाडी घासून नुकसान केले आणि तुम्ही पोलीस स्टेशनला चला. तसेच, माझा माणूस कार घेऊन पोलीस स्टेशनला येईल तुम्ही माझ्याबरोबर दुचाकीवर चला, असे सांगितले. दुसऱ्या व्यक्तीने जांभळे यांच्याकडून गाडीची चावी घेतली आणि तो गाडी घेऊन निघाला. तसेच, दुचाकीस्वारानेही भानुदास जांभळे हे बसण्याआधीच दुचाकविरून पळ काढला. भानुदास जांभळे यांना फूस लावून आपली गाडी चोरट्यांनी पळवून नेल्याचे लक्षात आले. त्यांनी ताबडतोब रसायनी पोलीस ठाण्यात जाऊन अज्ञात चोरट्यांच्या विरोधात तक्रार दाखल केली. रसायनी पोलिसांनी शोध लावला असता कार वडखळजवळ अपघात अवस्थेत सापडली. यावेळी कारचे भरपूर नुकसान झाल्याचे भानूदास जांभळे यांच्या लक्षात आले.

चौलमळा कृष्णादेवी प्रासादिक मंडळाचा स्तुत्य उपक्रम | बुवा चंद्रकांत नवगावकर यांच्या गायनाने श्रोते भारावले

# देवाच्या आळंदीत भजनरुपी सेवा

| चौल | प्रतिनिधी |

पुणे जिल्ह्यातील आळंदी येथील संत ज्ञानेश्वर माऊलींच्या संजीवन समाधीसमोर अलिबाग तालुक्यातील चौलमळा येथील कृष्णादेवी प्रासादिक भजन मंडळाने बुवा चंद्रकांत नवगावकर यांच्या माध्यमातून भजनरुपी सेवा सादर केली. भजन मंडळाचे अध्यक्ष अल्पेश म्हात्रे यांच्या नेतृत्वाखाली चौलमळा येथील भजन मंडळाने रविवारी (दि.१४) आळंदीत माऊलीचा भजनाच्या माध्यमातून जयघोष केला.

इंद्रायणी काठच्या अलंकापुरी आळंदीमध्ये राज्याच्या कानाकोपऱ्यातून लाखो भक्तांची मांदियाळी कायमच पाहायला मिळते. राज्यभरात अनेक



भजनप्रेमी, कीर्तनकार आपली सेवा ज्ञानेश्वर माऊलींच्या चरणी सादर करीत असतात. रविवारी अलिबाग तालुक्यातील चौलमळा येथील कृष्णादेवी प्रासादिक मंडळाने आपली भजनरुपी सेवा आळंदीमध्ये जाऊन सादर केली. चौलमळा गावचे माजी गावप्रमुख तथा माऊलीचे निस्सीम भक्त सुनील गणपत घरत यांच्या पुढाकारातून भजनी मंडळाला आळंदी येथे हजारो भक्तांच्या साक्षीने भजन सादर करण्याचा योग आला. यावेळी राज्यभरातून आळंदी येथे आलेल्या भक्तांनी भजनाचा आस्वाद घेत भजन मंडळाचे कौतुक केले.

दरम्यान, भजन मंडळाचे बुवा चंद्रकांत नवगावकर यांनी 'अलंकापुरी पुण्य भूमी पवित्र' या श्लोकाने भजनाची सुरुवात केली. त्यानंतर 'आळंदी हे गाव पुण्यभूमी ठाव', 'छंद जडला विठूरायाचा...', 'सखा माझा ज्ञानेश्वर..' असे एकाहून एक सरस अभंगांचे सादरीकरण करुन उपस्थितांची वाहवा मिळवली. त्यांना तबलावादनाची साथ अजय वाडकर आणि प्रथमेश पाथरे यांनी, तर तालबद्ध चकवावादनाची साथ श्री. केळकर यांनी दिली. यावेळी चौलमळाचे गावप्रमुख रवींद्र घरत, उपप्रमुख जितेंद्र पाटील, भजन मंडळाचे अध्यक्ष अल्पेश म्हात्रे, सचिव सचिन गोंधळी, चौलमळा युवक मंडळाचे अध्यक्ष महेंद्र नाईक यांच्यासह उपस्थित असलेले गावचे माजी प्रमुख विलास शिवलकर, शशिकांत म्हात्रे, रमाकांत घरत, शैलेश नाईक, राजेंद्र नाईक, विजय सातांबेकर, महेश पाटील, बाळकृष्ण पाटील, विशाल घरत यांनी कोरस म्हणून साथ दिली.

दरम्यान, चौलमळा कृष्णादेवी प्रासादिक भजन मंडळाचे आळंदी येथील व्यवस्थापनाने पुष्पमालिका देऊन स्वागत केले. तसेच चंद्रकांत नवगावकर बुवांनी सादर केलेल्या विविध अभंग, गवळीणी आणि भजनांनी मन तृप्त झाल्याचे सांगत कौतुक केले.

## निवडक



### नवघरच्या यशात मानाचा तुरा

**पाली/गोमाशी:** सुधागड तालुक्यातील नवघर शाळेने गेल्या अनेक वर्षांपासून विविध उपक्रमात सहभाग घेऊन उल्लेखनीय कार्य करत उत्तुंग यश मिळवले आहे. या शाळेच्या यशात शाळेतील शिक्षक वृंदाचे योगदान आहे. राजिप शाळांमध्ये काम करणाऱ्या शिक्षकांसाठी दरवर्षी जिल्हा परिषदेकडून ५ सप्टेंबर रोजी आदर्श शिक्षक पुरस्कार जाहीर केले जातात. यावर्षी या मानाच्या समजल्या जाणाऱ्या पुरस्कारासाठी शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या नवघर शाळेच्या शिक्षिका वृषाली गुरव यांची निवड करण्यात आली. तसेच, या शाळेतील शिक्षिका शीतल पाटील या नुकत्याच झालेल्या महाराष्ट्र परीक्षा परिषदेकडून घेण्यात आलेल्या सेट परीक्षेत उत्तम गुण मिळवून उत्तीर्ण झाल्या. त्याबद्दल शाळा व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष ज्ञानेश्वर सुतार, सुधागड तालुका माजी सभापती नंदू सुतार, गावातील प्रतिष्ठित नागरिक डी.सी. चव्हाण, नितीन सुतार तसेच पालक वर्गाच्यावतीने अभिनंदन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.



### डी.जी.टी. कॉलेज ठरले 'आदर्श'

**तळा** : द.ग. तटकरे महाविद्यालय तळा यांना मुंबई विद्यापीठातर्फे शैक्षणिक वर्ष २०२३-२४ साठी ग्रामीण भागातील 'सर्वोत्कृष्ट महाविद्यालय पुरस्कार' जाहीर झाला आहे. मुंबई विद्यापीठाने ग्रामीण भागातील उत्कृष्ट कार्य करणाऱ्या महाविद्यालयांचा गौरव करण्यासाठी हा पुरस्कार स्थापन केला आहे. शैक्षणिक गुणवत्ता, सामाजिक बांधिलकी, विद्यार्थी-केंद्री उपक्रम, क्रीडा आणि सांस्कृतिक स्पर्धांमधील सहभाग, तसेच राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी महाविद्यालयाने केलेल्या प्रयत्नांचा सर्वांगीण विचार करून हा सन्मान प्रदान करण्यात आला. द.ग. तटकरे महाविद्यालय हे 'ए ग्रेड' मानांकन प्राप्त संस्थांपैकी एक असून, ग्रामीण भागातील शैक्षणिक दर्जा उंचावणारे, उपक्रमशील महाविद्यालय म्हणून ओळखले जाते. प्राचार्य डॉ. यादव यांनी हा सन्मान संपूर्ण टीमच्या समर्पण आणि गुणवत्तापूर्ण कार्याचे फलित असल्याचे सांगून सर्वांचे अभिनंदन केले.

### 'शेकडोंच्या संख्येने सहभागी व्हा'



**आगरदांडा** : मराठा समाजाच्या आंदोलनाला बळी पडून सरकारने हैदराबाद गेझेटनुसार सरसकट मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र देऊन त्यांना ओबीसीमध्ये घ्यावे यासाठी तातडीने अध्यादेश काढला आहे. असे करणे म्हणजे मूळ कुणबी समाजाचा गळा घोटण्याचा हा प्रकार आहे. त्यामुळे कुणबीसह ओबीसी समाजाचे पिढ्यानपिढ्या अपार नुकसान होणार असून, सरकारने हा अध्यादेश ताबडतोब रद्द करावा. यासह विविध मागण्यांसाठी सोमवारी (दि.१५) सकाळी ११ वाजता मूरूड तहसिलदार कार्यालयाजवळ शेकोडच्या संख्येने ओबीसी आरक्षण बचाव आंदोलनात सहभागी व्हा, असे आवाहन मुरूड अध्यक्ष ॲड. रुपेश पाटील यांनी केले आहे.



### समीर होडबे पुरस्काराने सन्मानित

**अलिबाग** : रायगड जिल्हा प्राथमिक शिक्षक सह. पतपेढी लि. अलिबाग या संस्थेच्या शतकपूर्ती निमित्ताने मुमुर्शी शाळेचे प्रभारी मुख्याध्यापक समीर होडबे यांना आदर्श शिक्षक पुरस्काराने गौरविण्यात आले. शिक्षक समीर होडबे हे सर्वसामान्य कुटुंबातील व शैक्षणिक वाटचालीत शेतीवर त्यांनी प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक, पदवीचे शिक्षण पूर्ण करून प्राथमिक शिक्षक म्हणून पिपलकोंड येथील रायगड जिल्हा परिषद १९९५ साली शासकीय सेवेत रुजू झाले. होडबे यांना ३० वर्षाच्या सेवेनंतर प्रथमच आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त झाल्याने विविध स्तरातून त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. होडबेंच्या पुरस्कारांची दखल घेत शिक्षकवृंदसह पंचक्रोशीतील स्थानिक ग्रामस्थांसह हितचिंतकानी त्यांचे कौतुक केले. प्रामाणिक व निष्ठापूर्ण कार्याचा हा गौरव होत असल्याची भावना जन माणसात उमटताना पहायला मिळत आहे.

### चाईल्ड केअर संस्थेची वार्षिक सभा

**उरण** : चाईल्ड केअर सामाजिक संस्था रायगडची रविवारी (दि.१४) वार्षिक महत्वाची सभा संस्थेचे संस्थापक, अध्यक्ष विकास कडू यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. या सभेमध्ये विविध विषयांवर चर्चा झाली. यावेळी नवदुर्गा सम्मान रायगड व विशेष सम्मान रायगड हे पुरस्कार वितरण सोहळा श्री रत्नेश्वरी मंदिर येथे होणार आहे, संस्थेचा ९वा वर्धापन दिन मोठ्या उत्साहाने संपन्न करण्यात येणार आहे, ९व्या वर्धापन दिन निमित्य रायगडमध्ये उल्लेखनीय कार्य करणाऱ्यांना रायगड रत्न हा पुरस्कार देण्यात येणार आहेत. तसेच उरण, पनवेल, पेण, कर्जत, अलिबाग व महड या तालुक्यांत विशेष कार्य करणाऱ्यांना तालुका रत्न हा पुरस्कार देण्यात येणार आहे, इत्यादी निर्णय एकमताने घेण्यात आले. सभेमध्ये संस्थेची प्रामुख्याने फेर निवड करण्यात आली. यावेळ प्रकाश ठाकूर यांची मुख्य सचिवपदी नियुक्ती करण्यात आली. तर, सह सचिवपदी सचिन गावंड (पेण)यांची निवड करण्यात आली.

# अखेर मणिपूर आठवले

नरेंद्र मोदींना अखेर मणिपूर आठवले. मे २०२३ मध्ये मणिपुरात मोठा हिंसाचार उसळला. स्त्रियांची नग्न धिंड काढण्यात आली. कुकी व मैतेई या दोन समाजांमध्ये यादवी युध्द पेटले. आज हिंसाचार थांबला असला तरी आजही एका समाजाचे लोक दुसऱ्यांच्या हद्दीत जाण्याची हिंमत करू शकत नाहीत. स्वतंत्र भारतातील एका छोट्या राज्यांमधली ही स्थिती आहे. गेल्या सव्वादोन वर्षांमध्ये राज्यात ३०० लोक ठार झाले. दीड हजार जखमी झाले. पण सर्वात महत्वाचे म्हणजे ६७ हजार लोक विस्थापित झाले. आपापली घरे सोडून त्यांना दुसरीकडे जावे लागले. या लोकांना धीर देण्यासाठी व प्रशासन व पोलिसांना चार शब्द सुनावण्यासाठी पंतप्रधानांनी तेथे एकदा तरी जाणे अपेक्षित होते. या काळात पंतप्रधानांनी तब्बल ४६ परदेशी दौरे केले. भारताच्या इतर राज्यांमध्ये ते फिरले. निवडणुकांचा प्रचार केला किंवा टीव्हीवर फालतू मुलाखती दिल्या. पण मणिपूरमध्ये मात्र ते गेले नाहीत. मोदींच्या गर्विष्ठपणाचे, खोट्या अहंकाराचे व ढोंगबाजीचे हे नामी उदाहरण आहे. पंतप्रधानांनी मणिपूरमध्ये जावे अशी मागणी विरोधकांनी केली, ती मी मान्य करणार नाही असा हा बालिश पण खुनशी हट्ट आहे. आपण विरोधकांपुढे झुकलो असे दिसता कामा नये असे त्यांना कायम वाटते. स्वतःला देशभक्त आणि जनतेचा सेवक म्हणवणारा हा नेता संवेदनांच्या बाबतीत किती माणुसकीशून्य व निर्घृण आहे हे अशा प्रसंगांमधून दिसते. मणिपूर हा या देशाचाच भाग आहे. तिथे अगदी अलिकडपर्यंत भाजपचेच सरकार होते. आता मोदींच्याच सरकारने तेथे राष्ट्रपती राजवट लागू केली आहे. तेथे भरडून निघत होते ते सामान्य नागरिक होते. त्यांना दिलासा देण्याची गरज होती. मोदी गेले म्हणजे त्यांच्या स्थितीत एकाएकी बदल होणार नव्हता. पण देशाचा पालक म्हणवणारा नेता आपल्याकडे येऊन गेला असे त्यांचे सांत्वन त्यातून होणार होते. पोलिस व लष्कर नक्की कशा प्रकारे वागत आहे याचा प्रत्यक्ष जागेवर जाऊन आढावा घेण्याची ही मोदींना संधी होती व त्याची गरजही होती. त्यातून प्रशासनालाही थोडी जरब बसण्यास मदत होत असते.

### यादवी कायम

पण मोदी तेव्हा गेले नाहीत. आता त्यांना पुढच्या वर्षीच्या आसाम निवडणुकांची तयारी करण्यासाठी तिकडे जायचे होते. तिकडे गेले व जवळच्याच मणिपूरला गेले नाही तर टीका झाली असती. म्हणून मग ते मणिपूरलाही गेले. विरोधकांनी संसदेत मणिपूर प्रश्नावरून चर्चेचा खास प्रस्ताव आणला होता. त्याला उत्तर देताना मोदींनी पहिले दीड तास मणिपूरमधला म देखील उच्चारला नव्हता. ही यांची लोकांच्या दुःखांबद्दलची संवेदना. त्यामुळे मणिपुरात आता जाऊन त्यांनी कितीही शांतीच्या गप्पा केल्या तरी त्याला काहीही अर्थ नाही. मोदींच्या दौऱ्याच्या आधी तेथील कुकी व मैतेई गटांमध्ये समझोता करण्याचा प्रयत्न झाला. पण आजवर भाजपने आपल्या फायद्यासाठी मैतेई समुदायाची सर्व पापे झाकली आहेत. त्यामुळे मोदी सरकारबाबत इतर समुदायांना विश्वास वाटणे अशक्य होते. तसेच झाले. शेवटी एक नेहमीचे भाषण करून मोदी परत आले. मणिपूरमध्ये इम्फाळ या राजधानीच्या सखल भागात मैतेई बहुसंख्येने राहतात. सरकारी नोकऱ्या, पोलिस, व्यवसाय इत्यादींमध्ये त्यांचाच वरचष्मा आहे. आजूबाजूच्या डोंगरी भागात कुकी आदिवासींची वस्ती आहे. ते काहीसे मागास आहेत. कुकींना मिळणाऱ्या आरक्षणात मैतेईंनाही हिस्सा मिळावा असा एक निर्णय न्यायालयाने दिला. त्यावेळी वास्तव स्थिती लक्षात घेऊन कुकींच्या हिताचे रक्षण केले जाईल अशी भूमिका सरकारने घेणे अपेक्षित होते. महाराष्ट्रात ओबीसी हा आमचा डीएनए आहे असे सांगून भाजपवाले त्यांच्या आरक्षणाच्या बाजूने उभे राहिल्याचे दाखवतात. कारण, इथे ती त्यांची राजकीय गरज आहे. मणिपूरमध्ये मात्र बरोबर उलटा प्रकार आहे. तेथे मैतेई बहुसंख्य असल्याने कुकींची मते नाही मिळाली तरी चालतील असा भाजपचा क्रूर हिशेब आहे. त्यामुळे तत्कालीन बिरेंद्रसिंग यांच्या भाजप सरकारने कुकींच्या आरक्षणाबाबतच्या मागण्या अमान्य केल्या. त्यावरूनच हिंसाचाराचा आगडोंब उसळला. कुकी आणि मैतेई अशी फाळणी झाली. कुकींच्या डोंगराळ प्रदेशात पोलिस तर सोडाच, लष्करी जवानांनाही जाणे मुश्किल झाले.

### ढोंगी धोरणे

भाजपने आपल्या मतांच्या स्वार्थासाठी ही फाळणी व पेटवापेटवी होऊ दिली. अमित शाह यांनी तेव्हा दौरा केला. पण बिरेंद्रसिंगांची जुलुमी राजवट कायम राहिली. त्याचा परिणाम म्हणजे सीमेवरचे हे राज्य आजतागायत धगधगते आहे. अलिकडेच नेपाळ व बांगलादेशामध्ये संतप्त तरुणाईचा भडका उडून त्यात सरकार भस्मसात झाली. तीच स्थिती मणिपुरात आली. राज्याचे मंत्री, खासदार यांच्या घरांवर हल्ले झाले. जाळपोळ होत राहिली. तरीही मोदींना आपला स्वार्थ सुटला नाही. शेवटी बऱ्याच काळानंतर नाईलाजाने भाजपच्या सरकारला बरखास्त करण्यात आले. अशा राज्यांमध्ये जनतेत विश्वास निर्माण करणे व लवकरात लवकर निवडणुका घेऊन वातावरण सुरळीत करणे आवश्यक असते. पण मोदी आणि शाह यांच्या व्यापारी मतलबापुढे अशी आशा करणे व्यर्थ आहे. काश्मिरमध्ये हेच घडले. आज तिथे उमर अब्दुल्लांचे सरकार निवडून आले असले तरी त्याला कोणतेही अधिकार नाहीत. मध्यंतरी त्यांना शहीद स्मारकावर जाण्यासही मनाई करण्यात आली. त्यांच्या घरांना पोलिसांनी बाहेरून कुलुपे लावली. अशी दांडगाई व दडपादडपी करून काही काळ सत्ता गाजवता येईल. पण जनतेत असंतोषाचे जे बीज पेरले जाईल त्यातून देशाच्या ऐक्याला कायमचा सुरुंग लागण्याचा धोका आहे. काश्मीर, आसाम, त्रिपुरा, मणिपूर या सर्व राज्यांमध्ये हीच स्थिती आहे. त्रिपुरामध्ये मोथा आदिवासी जमातीची अशीच फसवणूक भाजपवाल्यांनी केली आहे. त्यामुळे तिथे असंतोष खदखदत आहे. आसाममध्ये हिंदू विरुध्द मुसलमान अशी दुही निर्माण केली गेली आहे. तिकडे लडाखमध्ये स्थानिकांच्या विरोधाला न जुमानता वाटेल तसा विकास चालू आहे. ही सर्व राज्ये सरहद्दीवर आहेत. या देशांच्या पलिकडच्या देशांसोबत म्हणजे पाकिस्तान व बांगलादेश यांच्याशी आपले संबंध बिघडलेले आहेत. तेथून या सीमावर्ती राज्यांमधील असंतोषाला दारुगोळा पुरवला जाऊ शकतो. पहलगामचा अनुभव घेऊन झालेला आहेच. तरीही मोदी सरकारची खुमखुमी व सत्तेची हवस कमी होत नाही. पोलिसी व लष्करी दांडगाई करून कितीही काळ आम्ही राज्य करू असा भ्रम मोदी सरकारला झाला आहे. एका झटक्यात ही धुंदी उतरायला वेळ लागणार नाही. पण यामध्ये देशाचे खूप मोठे नुकसान होईल. देशाच्या ऐक्यालाच धोका निर्माण होईल. एकीकडे बिहारमध्ये प्रचंड प्रमाणात घुसखोर आले असल्याचा खोटा प्रचार करायचा आणि दुसरीकडे मणिपूरसारख्या ठिकाणी फुटीरता वाढेल अशी धोरणे आखायची हे मोदी सरकारने आता बंद करायला हवे.

विचार

# भारतीय डेरी व्यवसायावर अमेरिकेची नजर का?

***शेती आणि शेतीपूरक व्यवसाय खुले करावेत म्हणून आयात शुल्काचा दबाव टाकण्याच्या ट्रम्प यांच्या धोरणामुळे, भारताला दूरदृष्टीने पूर्ण मुक्त अर्थव्यवस्था स्वीकारून आणि निर्यात वाढवून व्यापारातील तूट भरून काढता येईल. आजघडीला आयात थांबवली तर परकीय चलनाची बचत होऊन प्रगती साधता येऊ शकते. यासाठी दूध उत्पादन व्यवसाय मुक्त करण्यासाठी शरद जोशींप्रमाणे चळवळ उभी करायला हवी.***



**मुकुंद गायकवाड**

जागतिक व्यापार संस्था (डब्ल्यूटीओ) निर्माण झाल्यामुळे शेती व्यवसायात अमुलाग्र बदल झाला आहे. पूर्वी शेती व्यवसायाकडे फारसे गांभीर्याने पाहिले जात नव्हते. दुसऱ्या महायुद्धानंतर इंटरनॅशनल मॉनेटरी फंड (आयएमएफ), इंटरनॅशनल ट्रेड ऑर्गनायझेशन (आयटीओ) अशा संस्था निर्माण झाल्या होत्या. परंतु या संस्थांमध्ये शेतीचा समावेश केलेला नव्हता. डब्ल्यूटीओ निर्माण झाल्यानंतर व्यापार म्हणून शेतीचाही समावेश करण्यात आला आहे. त्यामुळेच अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांनी भारताने आपले कृषिक्षेत्र खुले करावे यासाठी दबाव टाकला. या दबावाला बळी न जाता भारताने त्याला मान्यता दिली नाही. त्यामुळे हा करार एक प्रकारे फिस्कटल्यात जमा आहे. मुळात ट्रम्प यांनी भारताच्या दुग्ध व्यवसायावर आपले लक्ष केंद्रित का केले, तो खुला व्हावा यासाठी त्याने धडपड का केली हे लक्षात घेणे आवश्यक आहे.

महाराष्ट्राचा विचार करता गुजरातनंतर इथे दुधाची क्रांती झाली. पूर्वी भारतामध्ये अन्नधान्याची कमतरता होती, तशी दुधाचीदेखील होती. ती लक्षात आल्यामुळे सरदार वल्लभभाई पटेल यांनी डॉ. कुंटेंच्या सहाय्याने नव्याने मुहूर्तमेढ रोवली, आणि हा व्यवसाय खूपच फोफावला, प्रगतीपथावर गेला. त्याचे अनुकरण करून महाराष्ट्राने गुजरातला मागे टाकले. महाराष्ट्रामध्ये दूध व्यवसायाची चळवळ कशी वाढली याचा आढावा घेतला असता सुरवातीला दूध सोसायट्या, जिल्हा दूध संघ आणि किडींग प्लांट अशा पद्धतीने दूध व्यवसाय वाढला. त्यानंतर खाजगी व्यावसायिक या व्यवसायात पडले आणि त्यांनी त्याला चांगली चालना दिली. उदाहरणादाखल सांगायचे तर चितळे उद्योगाने दूध आणि दुधापासून उत्पादित पदार्थांना केवळ पुणेच नव्हे, इतरही ठिकाणी चांगली बाजारपेठ निर्माण करून दिली.

आज महाराष्ट्रातला सहकारी स्तरावरचा दूध व्यवसाय साखर कारखान्यांप्रमाणेच मोडीत निघाल्यात जमा आहे. परंतु गोकुळ, राजहंससारख्या एखाद- दुसऱ्या संस्था अजूनही तग धरून कार्यरत आहेत. तरीसुद्धा सुदैवाने महाराष्ट्रात दूध व्यवसाय चांगला फोफावला आहे. दुष्काळी शेतीच्या पार्श्वभूमीवर तो वरदान ठरला आहे. दुष्काळी शेतीला तो एकमेव आधार नसता तर महाराष्ट्रातील पावसावर अवलंबून असलेली बहुतांश शेती मोडकळीला आली असती. भारतातील दूध व्यवसाय संघटित आहे आणि त्याला बाजारपेठ आहे, हे चलाख ट्रम्प याने ओळखले, आणि त्याच्या अभ्यासकांनी त्याला हे दाखवूनही दिले. त्यामुळेच या व्यवसायाकडे त्याचे विशेष लक्ष गेले. भारतातील शेतीबरोबरच दूध व्यवसायही खुला करावा असा त्याचा आग्रह होता. परंतु भारताने त्याला मान्यता दिली नाही. त्यामुळे इतर देशांच्या मानाने अमेरिकेशी आपल्या चाललेल्या वाटाघाटी बराच काळ रेंगाळल्या आणि शेवटी रशियन तेलखरेदीच्या मुद्द्यावर येऊन थांबल्या. या पार्श्वभूमीवर जगातील अनेक देशात भारतीय दूध व्यवसायावर लेखन प्रसिद्ध झाले.

वास्तविक पाहता जगामध्ये नेदरलँड, न्यूझीलंड आणि काही युरोपियन देश दूध व्यवसायात आघाडीवर आहेत. त्यांच्याकडे पहिल्यापासून जास्तीत जास्त गायींच्या प्रजाती उपलब्ध आहेत. तसा विचार करता, आपल्याकडील दूध व्यवसाय सुरवातीला देशी (गावठी) गायींवर अवलंबून होता. परंतु मणीभाई देसाई यांनी या क्षेत्रामध्ये कृत्रिम उत्पत्ती रूढ करून जास्तीत जास्त दूध देणाऱ्या परकीय गायींच्या जातीचा स्थानिक गायींशी संकर घडवून आणून भारतीय दूध व्यवसायात आमूलाग्र बदल घडवून आणला. आज मणीभाई देसाईंच्या योगदानापासून भारतीय शेतकरी अभिक्त आहे. परंतु बायफ डेव्हलपमेंट रिसर्च फाऊंडेशन या संघटनेने महाराष्ट्र आणि भारतीय दूध व्यवसायात फार मोठे योगदान दिले आहे. आपल्याकडे असलेल्या गायींच्या प्रजाती आणि दुग्धव्यवसाय पाहता त्यात अनेक उणिवा दिसत होत्या. इथल्या गायी कधीच परकीय गायींप्रमाणे बंदिस्त ठेवल्या जात नव्हत्या. त्याची शक्ती रानोमाळ चारा धुंडाळण्यामध्ये खर्च होत होती. हे ओळखून भारतीय शेतकऱ्यांना बंदिस्त गोठ्यात दुग्धव्यवसाय करण्याची पद्धत पटली आहे. त्यामुळे संकरित गायीसुद्धा आता रानोमाळ भटकायला सोडण्याऐवजी बंदिस्त ठेवून त्यांची पूर्ण शक्ती वापरून भारताला दुग्धव्यवसायात पहिल्या क्रमांकावर पोहोचवले जात आहे.

स्वातंत्र्यापूर्वी भारतामध्ये नेदरलँडकडून दूध पावडर आणि लोण्याची आयात होत होती. ते 'आणंद' चळवळीने बंद केले आणि आता महाराष्ट्रामध्येही हे पदार्थ तयार होऊ लागल्याने आपली गरज भागवूनही भारत या व्यवसायात निर्यातक्षम अवस्थेत पोहोचला आहे. चीज, बटर आणि दुध पावडर या उत्पादनांमध्ये आपला देश आघाडी घेण्याच्या स्थितीत आला आहे. त्यामुळे अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांची या व्यवसायात शिरकाव करण्याची प्रबळ इच्छा झाली. दुग्धोत्पादनाची भारताची बाजारपेठ मोठी आहे. सरकारने वेळीच धोका ओळखून धोरण आखल्याने आज आपले दोन्ही व्यवसाय सुरक्षित राहिले आहेत. भारतीय दुग्धव्यवसायावर आलेले हे संकट ही एक चांगली संधी मानून भारताला दूध आणि दुग्धजन्य पदार्थ निर्यात करण्याची आवश्यकता आहे. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी सरकारने शेती आणि शेतीपूरक व्यवसायाकडे लक्ष दिल्यास भारताची अर्थव्यवस्था चौथ्या क्रमांकावरून तिसऱ्या क्रमांकावर येऊ शकते; पण सरकार या क्षेत्राकडे गांभीर्याने लक्ष देईल की नाही ही शंका आहे, असे विधान केले होते. कारण केंद्र किंवा महाराष्ट्र सरकारमध्ये शेतीक्षेत्रातील एकही जाणकार मंत्री नाही. त्यामुळे अशा प्रकारचे धोरण सरकार अवलंबेल, अशी शक्यता नाही. सरकारने शेती आणि शेतीपूरक क्षेत्र खुले केल्यास गोकुळ, चितळे आणि अमूलसारख्या संस्था परदेशातील दुग्धजन्य पदार्थांचे मार्केट काबीज करू शकतात, अशी क्षमता निर्माण झाली आहे. परंतु भारत सरकार दोन्ही क्षेत्रं खुले करण्यास तयार नाही.

१९९१ मध्ये आपण उद्योग धंद्यांच्या बाबतीत मुक्त अर्थव्यवस्था स्वीकारली, पण शेतीला जास्तीत जास्त बंदिस्त केले, ही मोठी शोकांतिका आहे. याबाबत ज्येष्ठ शेतकरी नेते शरद जोशींनी आवाज उठवला होता. मी सुद्धा 'जागतिकीकरण: शाप नव्हे, वरदान' हे पुस्तक अमेरिकेत जाऊन लिहिले आणि या प्रश्नाला तोंड फोडण्याचा प्रयत्न केला. परंतु कोणत्याही जाणकाराचा दुग्ध व्यवसाय आणि शेती खुली करण्याच्या बाबतीत अद्याप आग्रह नसल्याने किंवा अभ्यास नसल्याने ही क्षेत्रे स्वातंत्र्यापासूनच्या प्रत्येक सरकारांनी जास्तीत जास्त बंदिस्त केली. चीननेही १९७८ मध्ये कम्युनिस्ट राजवट असूनही मुक्त अर्थव्यवस्था स्वीकारली. परंतु आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने जबरदस्ती केल्यावर आणि भारताला सोने गहाण ठेवावे लागल्यावरही हे व्यवसाय खुले करायचे मनमोहन सिंग यांचे धाडस झाले नाही.

आता ट्रम्प यांच्या ताज्या टेरीफ धोरणामुळे भारताला आपली तूट भरून काढायची असेल तर रशिया आणि चीन यांच्याबरोबर वाटाघाटी करण्यापेक्षा पूर्ण मुक्त अर्थव्यवस्था स्वीकारून येत असलेली तूट भरून काढता येईल. आजही भारत १,४५,००० कोटी रुपयांचे खाद्यतेल आयात करतो. शेती मुक्त झाली तर शेतकरी निश्चितपणे तूट भरून आयात थांबवू शकेल. आणि परकीय चलनाची बचत करू शकेल. शेतकऱ्यांवर विश्वास ठेवल्यास आपण हे निश्चित करू शकतो, पण त्यांना विश्वासात घेण्याऐवजी अद्याप आपले सरकार चीन, जपान आणि रशियाच्या मागे लागून अमेरिकेचा डाव उलटवण्याचा प्रयत्न करत आहे. हा प्रश्न गांभीर्याने लोकांसमोर चर्चिला जायला हवा, सरकारचे धोरण बदलण्यासाठी लोकांनी पुढाकार घ्यायला हवा.

आज भारत निर्यात करून जगाच्या गरजा भागवू शकत असताना म्यानमार, मलेशिया आणि इंडोनेशिया यांच्याकडून खाद्यतेल आयात करतो. ही आयात थांबवली तर परकीय चलनाची बचत होऊन प्रगती साधता येऊ शकते. प्रगतशीलही नसलेले हे देश आपल्याला निर्यात करू शकतात तर आपली अडचण काय आहे? यासाठी भारतीय शेती आणि पूरक व्यवसाय म्हणून दूध उत्पादन व्यवसायाला मुक्त करण्यासाठी शरद जोशींप्रमाणे चळवळ उभी करण्याची आवश्यकता आहे.

चर्चा आजची

# अराजकता नेपाळला आणि इशारा भारताला

**सुयोग आंग्रे**

राजशाहीच्या समाप्तीनंतर नेपाळला या वेळी अनागोंदीने वेढले गेले आहे. ही चिंता आहे की ही अनागोंदी संपत नाही. सोशल मीडियाच्या डिजिटल प्लॅटफॉर्मवरील बंदीविरूद्ध नेपाळच्या तरुणांनी सुरू केलेले निषेध चालूच राहिले की ही बंदी काढून टाकल्यानंतरही हे स्पष्ट झाले आहे की नवीन पिढीचा राग केवळ डिजिटल माध्यमांवरील बंदीबद्दल नव्हता. तर तरुणांनाही उचललेले आंदोलनाचे अस्त्र हे नेपाळमधील राजकीय नेतृत्व बदलासाठीचे होते. नेपाळच्या राजकीय सत्तेमध्ये अपेक्षित बदल तरुणाच्या नजरेने पहिला आणि सोशलमिडीयावरील बंदी हे निमित्त ठरले. अखेर अराजकता मजल्यावर संघर्ष करावा लागतो. मग तो लढा अहिंसेचा असो अथवा हिंसेचा. आंदोलनकर्त्यांनी केवळ राजेशाहीला आणि सत्ताधाऱ्यांना धडा शिकवण्याचा यशस्वी प्रयत्न नेपाळमधील तरुणांनी केला आहे. आता भारताच्या शेजारील राष्ट्र नेपाळ आहे. जसे भारत हिंदू राष्ट्र तसे नेपाळदेखील हिंदू राष्ट्र आहे. नेपाळमध्ये पुकारलेल्या लढ्याची पुष्टी केली गेली आहे की रस्त्यावर उतरलेल्या तरुणांनी आपल्या नेत्यांच्या भ्रष्टाचाराचा उल्लेख करून राजीनामा मागितला. पंतप्रधान के. पी. शर्मा ओली यांना राजीनामा देण्यास भाग पाडले जाईल अशी त्यांची तीव्र इच्छा इतकी तीव्र फॉर्म घेईल अशी अपेक्षा नव्हती, परंतु हे त्यांच्या दडपशाही वृत्तीने घडले. सत्तेतून बाहेर पडल्यानंतर, हा प्रश्न उद्भवला आहे की या शेजारच्या देशाचे राजकीय भविष्य काय असेल? नेपाळमधील परिस्थिती बांगलादेशच्या घडामोडींची आठवण करून देणारी आहे. तेथेही विद्यार्थ्यांनी आरक्षणाच्या धोरणामुळे रागावलेल्या शेख हसीना सरकारविरूद्ध लढा दिला, त्यांना सत्तेतून काढून टाकण्याचे एक साधन बनले. पंतप्रधान केपी शर्मा ओली नेपाळमधील परिस्थितीबद्दल स्वत: व्यतिरिक्त इतर कोणालाही दोष देऊ शकत नाहीत. त्याच्या अनियंत्रित धोरणांनी त्याला बुडविले. नेपाळसाठी चिंतेची बाब म्हणजे तेथे भविष्यातील अंतरिम सरकार कसे तयार केले जाईल? हा प्रश्न गंभीर असलातरी तरुणांच्या लढ्यामध्ये चीनच्या हुकूमशाही विचारांचा पगडा दिसला. कारण तरुणांनी पंतप्रधानपदासाठी ज्या व्यक्तीचे नाव समोर आणले आहे. त्या व्यक्तीवर चीनच्या विचारांचा ठसा आहे, अशा चर्चांना नेपाळमध्ये उधाण आले आहे. तरुणांच्या या आंदोलनामुळे जर नेपाळमध्ये राजकीय बदलाचे वारे वाहिले तर अनपेक्षित कारवायांना ऊत येण्याची शक्यता नाकारता येत नाही. अनागोंदीच्या मार्गावरून कृत्येविरोधी चळवळ कशी परत करावी ही त्याच्यासाठी चिंताजनक बाब आहे? नेपाळच्या तरुणांचा राग समजला आहे, परंतु जर ते हिंसाचाराने व्यक्त केले गेले तर ते संकट आणखी वाढवेल. संतप्त तरुणसुद्धा सैन्याला ऐकत नाहीत हे शुभ संकेत नाही. त्यांना हे पहावे लागेल की नेपाळमधील परिस्थिती बांगलादेशात बांधली जाऊ नये आणि बांगलादेशात परिणामी एक वर्षानंतरही अनिश्चितता आहे. अराजकता मजेने हि गोष्ट कोणत्याचराष्ट्राला एकत्रित आणि एकसंघ ठेवणारी नाही. यामुळे नेपाळ विकासाच्या दृष्टीने किमान दहा वर्षे मागे गेला यात कोणतीच शंका नाही. नेपाळ म्हटले कि, स्वयंभू राष्ट्र म्हणून गणले जात आहे. राष्ट्र लहान असलेतरी एकाग्रता आणि चिकाटीने आपले वेगळे विश्व या जगात नेपाळने तयार केले आहे. निसर्ग संपन्नतेने नटलेल्या आणि सांस्कृतिक दृष्ट्या एकसंघ असलेल्या नेपाळला नजर लागल्या सारखेच झाले आहे. सोशल मीडिया सारख्या प्रभावी माध्यमाच्या वापराने जनजागृती केली जाऊ शकते. हे सहजपणे उमगू नये इतकी बाल बुद्धी नेपाळमधील राज्यकर्त्यांची आणि राजेशाही उपभोगणाऱ्यांची असावी हे फारच नवल आहे. सोशल मीडियाच्या वापरावर बंदी आणली म्हणून तरुणांनी थेट सार्वजनिक मालमत्तेवर आणि राज्यकर्त्यांना लसख्य केले. त्यापेक्षा हे माध्यम प्रभावी आहे हे माहित असल्याने त्याचा वापर तरुणाईला करता येऊ नये हे त्याहून नवल आहे. परंतू या सर्व आंदोलनाचा विचार केला तर यामागे वेगळेच राजकारण शिजत असल्याचे आता हळूहळू समोर येईल असे जाणकारांचे मत आहे. कोविड सारख्या साथीच्या रोगापासून नेपाळ आर्थिक संकटांनी वेढला गेला. राजकीय अस्थिरतेमुळे हे संकट आणखी वाढले. नेपाळच्या नेत्यांनी कोणत्याही गोष्टीचा दावा करावा, सत्तेच्या लोभात त्यांनी लोकशाहीशी अनियंत्रित प्रयोग केले, लोकांना निराश वाटले. नेत्यांच्या नवीन पिढ्यांसाठी पुढे येण्याची आणि त्यांच्या जुन्या नेत्यांच्या चुकांमधून धडा शिकण्यासाठी ही योग्य वेळ आहे. नेपाळच्या चिंताजनक परिस्थितीबद्दल भारताला सावधगिरी बाळगणे आवश्यक आहे. त्याला हे देखील पहावे लागेल की नेपाळमधील परदेशी सैन्याने अस्थिरतेसह अराजकाने वेढलेले आहे. या घटनांमागे चिनचा हस्तक्षेप वाढत नाहीना. याकडे आता बारकाईने पाहण्याची गरज निर्माण झाली आहे. हि नाण्याची एक बाजू असलीतरी भारतातील राजकीय परिस्थिती देखील एकाधिकारशाहीकडे झुकण्यास सुरुवात झाली आहे. यामुळे ज्या राष्ट्राचे बल स्थान तरुण आहे. यामध्ये भारत जगात अग्रेसर आहे. यामुळे आपल्या देशातील राजकारण्यांनी देखील नेपाळमधील तरुणाईच्या प्रक्षोभापासून शिकवण घ्यायला हवी. शेजारच्या राष्ट्रात पडलेली ठिणगी भारताच्या पूर्वेकडून झपाट्याने पसरेल आणि परिस्थिती हाताबाहेर जाईल. हे आता कोण्या ज्योतिषाने सांगण्याची गरज नाही.

लोकसंसद

## अभियंता दिन

आज १५ सप्टेंबर, आजचा दिवस संपूर्ण देशात अभियंता दिन म्हणून साजरा केला जातो. कारण भारतातील पहिले अभियंता भारतरत्न सर मोक्षगुडम विश्वेश्वरय्या यांचा हा जन्मदिवस. मोक्षगुडम विश्वेश्वरय्या हे केवळ अभियंता नव्हते तर ते थोर देशभक्तही होते. आजच्या दिवशी म्हणजे १५ सप्टेंबर १८६१ रोजी कर्नाटकातील कोलार जिल्ह्यातील मदनहल्ली या छोट्याश्या गावात त्यांचा जन्म झाला. मोक्षगुडम विश्वेश्वरय्या यांचे वडील विद्वान संस्कृत पंडित होते. घरची परिस्थिती हलाखीची होती तरीही त्यांनी विश्वेश्वरय्या यांच्या शिक्षणात खंड पडू दिला नाही. विश्वेश्वरय्या यांनीही गरिबीशी झुंज देत तालुक्याला एकटे राहून आपले शिक्षण अव्वल गुणांनी पूर्ण केले. शालेय शिक्षण पूर्ण झाल्यावर ते उच्च शिक्षणासाठी बंगळुरुला आले. तिथेही त्यांनी विशेष गुणवत्ता मिळवत बी ए केले. पदवीधर झाल्यावर त्यांना तांत्रिक शिक्षणाची आवड निर्माण झाली. पण तांत्रिक शिक्षण घेण्यासाठी पैसे नसल्याने त्यांनी म्हैसूरच्या राजाला विनंती केली. म्हैसूरच्या राजाने त्यांच्यातील गुणवत्ता हेरून त्यांना अभियांत्रिकी शिक्षणासाठी शिष्यवृत्ती देऊन पुण्याला पाठवले. विश्वेश्वरय्या यांनीही त्यांच्यावरील विश्वास सार्थ ठरवत अभियांत्रिकी परीक्षेत मुंबई प्रांतात प्रथम क्रमांक पटकावला. या त्यांच्या यशाची दखल घेऊन १८८४ साली सरकारने त्यांना सहाय्यक अभियंता या पदावर नेमणूक दिली. तिथेही त्यांनी आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवला. या काळात त्यांनी खडकवासला धरणासाठी एक अभिनव अशा स्वयंचलित गेटची निर्मिती केली. यामुळे विशिष्ट पातळी वरील अतिरिक्त पाणीच वाहून जाई. अशाप्रकारच्या गेटची निर्मिती भारतात पहिल्यांदाच झाली होती. या डिझाइनचे नाव पुढे विश्वेश्वरय्या गेट असे झाले. १९०७ साली त्यांनी सरकारी नोकरीतून निवृत्ती पत्करली. निवृत्तीनंतर निजाम सरकारने त्यांची विशेष सल्लागारपदी नियुक्ती केली. तिथे त्यांनी हैदराबाद परिसरातील दोन नद्यांवर धरणे बांधून हैदराबाद शहर पुरमुक्त केलेच शिवाय शहराचा कायापालट देखील केला. म्हैसूरच्या राजाने त्यांना मुख्य अभियंता पदाची ऑफर दिली त्यांनी ती स्वीकारली. म्हैसूरचे मुख्य अभियंता असताना त्यांनी तिथे कृष्णराज सागर धरण, वृंदावन गार्डन बांधले तसेच विकासाची अनेक कामे केली. या व्यतिरिक्त त्यांनी उद्योग व शेती सिंचनाची अनेक कामे केली. पाण्याचा अपव्यय टाळून पुरेपूर वापर करणारी ब्लॉक सिस्टीम ही त्यांचीच देणगी आहे. म्हैसूरी पद्धतीचा फेटा आणि साधी वेशभूषा त्यांनी शेवटपर्यंत जपली. त्यांचे व्यक्तिमत्त्वही आकर्षित करणारे होते. ते जितके साधे होते तितकेच ते परखडही होते. अंधश्रद्धा त्यांना मान्य नव्हती. मानवात देव आहे. वयाच्या ९४ व्या वर्षी भारत सरकारने त्यांना भारतरत्न या सर्वोच्च पुरस्काराने गौरविले.

**– श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे**

दिनविशेष

# आंतरराष्ट्रीय लोकशाही दिन

आंतरराष्ट्रीय लोकशाही दिन दरवर्षी १५ सप्टेंबर रोजी साजरा केला जातो, जो लोकशाहीचे महत्त्व मूलभूत मानवी हक्क आणि सुशासन आणि शांतीचा आधारस्तंभ म्हणून मांडतो. २००७ मध्ये संयुक्त राष्ट्रांच्या महासभेच्या ठरावाद्वारे स्थापित केलेला हा दिवस जगभरातील समाजांना आकार देण्यात आणि मजबूत करण्यात लोकशाहीच्या महत्त्वपूर्ण भूमिकेवर भर देतो. लोकशाही ही सरकारची एक अशी पद्धत आहे ज्यामध्ये सत्ता थेट किंवा निवडून आलेल्या प्रतिनिधींद्वारे लोकांकडून मिळवली जाते. ती राजकीय समानता, वैयक्तिक स्वातंत्र्य आणि प्रशासनात सक्रिय सहभाग यासारख्या तत्त्वांनी वैशिष्ट्यीकृत आहे. लोकशाही व्यवस्थेत, नागरिकांना मतदान करण्याचा, त्यांचे मत व्यक्त करण्याचा आणि समाज आणि राज्याच्या कामकाजावर परिणाम करणाऱ्या निर्णय प्रक्रियेत सहभागी होण्याचा अधिकार आहे. लोकशाही देश बनण्यासाठी, देशाला कायद्याचे राज्य, मानवी हक्कांचा आदर, मुक्त आणि निष्पक्ष निवडणुका आणि सरकारी अधिकाऱ्यांची जनतेप्रती जबाबदारी यांचा समावेश करावा लागतो. ते अल्पसंख्याकांच्या हक्कांचे रक्षण करताना बहुसंख्य लोकांच्या इच्छेचा आदर केला जातो याची खात्री करते, ज्यामुळे ते न्याय, समानता आणि सामाजिक स्थिरता वाढवण्यासाठी एक महत्त्वाचा पाया बनते. २००७ मध्ये संयुक्त राष्ट्रांच्या महासभेच्या ठरावाद्वारे आंतरराष्ट्रीय लोकशाही दिनाची स्थापना करण्यात आली. त्याची उत्पत्ती संयुक्त राष्ट्रांचे मुख्य मूल्य म्हणून लोकशाहीच्या तत्त्वांना प्रोत्साहन देणे आणि त्यांचे समर्थन करणे ही होती. या दिवसामागील कल्पना लोकशाही शासन, मानवी हक्क आणि कायद्याचे राज्य यांना प्रोत्साहन देण्यासाठी आंतरराष्ट्रीय सहकार्य पसरवणे आहे. पहिला आंतरराष्ट्रीय लोकशाही दिन १५ सप्टेंबर २००८ रोजी साजरा करण्यात आला. १९९७ मध्ये आंतर-संसदीय संघ ने स्वीकारलेल्या लोकशाहीवरील सार्वत्रिक घोषणापत्राशी सुसंगत राहण्यासाठी ही तारीख निवडण्यात आली होती, ज्यामध्ये सार्वजनिक जीवनात सहभागी होण्याचा अधिकार, अभिव्यक्ती स्वातंत्र्य आणि कायद्याचे राज्य यासारख्या लोकशाहीच्या तत्त्वांची रूपरेषा देण्यात आली होती. सुरुवातीपासूनच, हा दिवस जगभर राष्ट्रांना लोकशाही मजबूत करण्यासाठी आणि त्यांचे रक्षण करण्यासाठी, मानवी हक्क सुनिश्चित करण्यात तिची भूमिका ओळखण्यासाठी आणि लोकशाही संस्था आणि प्रक्रियांना धोका निर्माण करणाऱ्या आव्हानांना तोंड देण्यासाठी प्रोत्साहित करण्यासाठी पाळला जातो. आंतरराष्ट्रीय लोकशाही दिन हा एक महत्त्वाचा दिवस आहे कारण तो मानवी हक्क, स्वातंत्र्य आणि सुशासनाला चालना देण्यासाठी लोकशाहीच्या महत्त्वाच्या भूमिकेबद्दल बोलतो. हा दिवस जगभरातील लोकशाही व्यवस्थांसमोरील प्रगती आणि आव्हानांवर चिंतन करण्यासाठी एक व्यासपीठ म्हणून काम करतो, तसेच राजकीय प्रक्रियांमध्ये नागरिकांच्या सहभागाचे महत्त्व देखील अधोरेखित करतो. हा दिवस पारदर्शक, जबाबदार प्रशासन आणि नागरी स्वातंत्र्यांचे संरक्षण करण्याची आवश्यकता दर्शवितो, जे शाश्वत शांतता आणि विकासाचा पाया आहेत. हा दिवस साजरा करून, जगभरातील लोक लोकशाही रमूल्यांचे रक्षण करण्याच्या आपल्या वचनबद्धतेची पुष्टी करतात, सरकारे त्यांच्या लोकांच्या गरजा पूर्ण करत आहेत याची खात्री करतात. हे राजकीय शिक्षणाला प्रोत्साहन देण्याची, मतदारांच्या सहभागाला प्रोत्साहन देण्याची आणि भ्रष्टाचार, असमानता आणि हुकूमशाही यासारख्या लोकशाही प्रक्रियांमध्ये अडथळा आणणाऱ्या अडथळ्यांना व्यवस्थापित करण्याची संधी देखील देते.

हा दिवस लोकशाही संस्थांना बळकटी देण्याच्या मार्गांवर संवाद साधण्यास प्रोत्साहन देतो आणि सर्व नागरिकांसाठी अधिक समावेशक, समतापूर्ण राजकीय परिदृश्याचा पुरस्कार करतो.

## अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

१५ सप्टेंबर

१) श्री.जयवंत कृष्णा म्हात्रे
ता.अलिबाग, रायगड
१५-०९-१९४६

२) श्री. अशोक जयराम भेडकर
अलिबाग, रायगड
१५-०९-१९४४

३) श्रीम. संगीता सुमंत म्हात्रे
थळ-आगार, रायगड
१५-०९-१९४८

४) श्री. श्रीकांत गोविंद वैद्य
चोंढी, अलिबाग, रायगड
१५-०९-१९५४

५) श्री. अनिल मारुती गोळे
पिंपळभाट, ता.अलिबाग
१५-०९-५६

६) श्री. मसणाजी नारायण पाटील
वाघेश्वर मंदिराजवळ, कुरुळ
१५-०९-१९५५

## सुवर्णकण



**अध्यात्मातील एक अधिकारी म्हणतात
देहाला शत्रू समजून वागलात तर
देह मित्रासारखा उपयोगी पडतो
प्रपंचाचे दुःख रूप आणि विनाशी
असलेले रूप ओळखून
प्रत्येक साधकांनी हरी भजनाला लागणे
हेच आपले हिताचे आहे
हे ओळखणे हाच सर्व संप्रदायाचा हेतू आहे.**

**श्रीज्ञानेश्वर भावहृदय
आबामहाराज परांजपे
साधना आश्रम,
दातार आळी, पेण**


## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)
९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**


## तिबोटी खंड्याचा वाचवला जीव

**डोंबिवली :** शहरातील पूर्वेकडील भागत शनिवारी (दि.१३) पी.पी. चेंबर येथे दुर्मिळ तिबोटी खंड्या पक्षी आढळून आला. जागरूक नागरिकांनी हा दुर्मिळ पक्षी येथे असल्याची माहिती पॉज संस्थेला दिली. संस्थेच्या ऋषिकेश सुरसे आणि ओंकार साळुंखे यांनी त्याला जीवदान दिले. तिबोटी खंड्या हा पावसाच्या सुरुवातीला महाराष्ट्राच्या कोकण किनारपट्टीत आढळणारा पक्षी आहे. भूतान व श्रीलंका या देशांतून तो दोन ते तीन महिन्यांसाठी स्थलांतरित होऊन येथे येत असतो. पावसाच्या सुरुवातीला आलेले हे पक्षी ऑगस्टमध्ये परतीच्या प्रवासाला निघतात. २०२० मध्ये तिबोटी खंड्याला रायगडचा जिल्हा पक्षी म्हणून घोषित करण्यात आले आहे. पर्यावरणाचा संबंध, चक्रीवादळे आणि मानवी हस्तक्षेपामुळे त्याच्या अस्तित्वाला धोका निर्माण होऊ शकतो. हा परतीच्या प्रवासाला असलेला तिबोटी खंड्या शहरातील कावळ्यांच्या नजरेत पडला असेल आणि त्यांनी हल्ला केला असावा, असे पक्षिमित्र आणि पॉज संस्था यांचे मत आहे.

## तहसील कार्यालयावर ओबीसी धडकणार

**गुहागर :** ओबीसीतून सरसकट कुणबी मराठा म्हणून दाखले देण्याच्या शासन अध्यादेशाच्या निषेधार्थ ओबीसी बांधव सोमवारी (दि.१५) गुहागर तहसीलदार कार्यालयावर धडकणार आहेत. गुहागर तालुका ओबीसी संघर्ष समन्वय समितीच्यावतीने हे आंदोलन करण्यात येणार आहे. या सर्व आंदोलनाच्या पूर्वतयारीची बैठक शृंगारतळी येथील गुहागर बाजार हॉल येथे ओबीसी संघर्ष समन्वय समितीचे अध्यक्ष पांडुरंग पाते यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाली.

# पादचारी पुलामुळे संसार रस्त्यावर

## ● दहा कुटुंबियांचे अद्याप पुनर्वसन नाही

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

**मुंबईतील एल्फिन्स्टन पूल पाडकामाच्या पार्श्वभूमीवर चर्चगेटच्या दिशेला पादचारी पूल बांधण्यात येत आहे. त्यासाठी येथील सेंट्रल रेल्वे कॉलनीजवळील सुंदर नगरमधील एकूण १८ झोपडपट्ट्या हटविण्यात आल्या असून पादचारी पूलाचे काम अंतिम टप्प्यात आहे. मात्र, रहिवाशांचे पुनर्वसन रखडल्याने रहिवाशांनी संसार रस्त्यावर मांडला आहे.**



१९८५ पासून आम्ही येथे राहत आहोत. रेल्वेने घरे तोडल्याने आम्ही ताडपत्रीत राहत आहोत. झोपड्या तोडल्या, तरी पर्यायी व्यवस्था करण्यात आली नाही. त्यामुळे पावसाळ्यात हाल होत आहेत. मुले शाळेत आहेत, त्यांनाही अभ्यास करण्यास अडचण येत आहे. त्याची प्रशासनाने दखल घ्यायला हवी, अशी विनंती स्थानिक रहिवाशांनी केली आहे.

परळ येथील सेंट्रल रेल्वे कॉलनीजवळच्या सुंदर नगर चाळीतील रहिवासी सुमारे ५० ते ६० वर्षांपासून राहात आहेत. या ठिकाणी १८ झोपड्या होत्या. गतवर्षी २५ जून रोजी परळ रेल्वे प्रशासनामार्फत या झोपड्या हटवण्यात आल्या. त्यातील केवळ आठ रहिवाशांना अन्य ठिकाणी स्थलांतरीत करण्यात आले आहे; परंतु, १० कुटुंबीयांचे अद्याप पुनर्वसन झाले नसल्याने ते रस्त्यालगत ताडपत्री बांधून राहत आहेत. त्यांनाही रेल्वे प्रशासनामार्फत वारंवार हटविण्यात येत आहे. मुलांच्या ऐन परीक्षेच्या काळात त्यांच्यावर कारवाई केली जाणार होती; परंतु, विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांना निवेदन दिले. त्यांनी रहिवाशांचे पुर्नवसन होईपर्यंत कारवाई करू नका, अशा सूचना रेल्वे अधिकाऱ्यांना दिल्याचे रहिवाशांनी सांगितले.

### पाण्यासाठी पायपीट

परळ रेल्वेप्रशासनाकडून गतवर्षी येथील झोपड्या तोडण्यात आल्या आहेत. त्यामुळे रहिवशांना रस्त्यावर रहावे लागत आहे. त्यांना पिण्यासाठी दोन हंडे पाणी जवळपासच्या इमारती किंवा चाळीतून आणावे लागत आहे. तसेच, आठवड्यातून एकदा सर्व मिळून पैसे काढतात आणि पाण्याच्या टँकरची सोय करतात.

### बेरोजगारीची कुऱ्हाड

वरळी-शिवडी उन्नत मार्गाच्या कामासाठी एल्फिन्स्टन रेल्वे पूल पाडण्यात येत आहे. त्यामुळे त्याखाली व्यवसाय करणाऱ्या १००हून अधिक विक्रेत्यांवर बेरोजगारीची कुऱ्हाड कोसळणार आहे. या पार्श्वभूमीवर आम्ही जगायचे कसे, असा सवाल या विक्रेत्यांकडून विचारला जात आहे.

तसेच, अनेकांचे परळ सिग्नलजवळ लहान मोठे व्यवसाय आहेत. त्यावर त्यांचा उदरनिर्वाह चालतो. एकीकडे बेघर झाले असताना आम्हाला व्यवसायही करू दिला जात नसल्याची उद्विग्नता येथील रहिवाशांनी व्यक्त केली आहे.

## म्हाडाला मिळणार कोट्यवधींचा महसूल

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

मुंबईतील बीडीडी चाळ पुनर्विकासांतर्गत म्हाडाकडून वरळी, नायगाव आणि ना. म. जोशी मार्ग येथील बीडीडी चाळींचा पुनर्विकास केला जात आहे. त्यानुसार येथील मूळ रहिवाशांना घरे देण्यासाठी उभारल्या जाणाऱ्या इमारतींशिवाय शिल्लक जागांचा व्यावसायिक वापर केला जाणार आहे. त्यानुसार म्हाडाकडून नायगाव आणि ना.म. जोशी मार्ग येथील सुमारे ३,९०० चौरस मीटरचे भूखंड लिलावाद्वारे भाडेपट्ट्याने दिले जाणार आहेत. त्यातून म्हाडाला किमान ८०९ कोटी रुपये उपलब्ध होणार आहेत.



म्हाडाकडून बीडीडीवासीयांना गगनचुंबी इमारतीत ५०० चौरस फुटांची सुसज्ज घरे दिली जात आहेत. त्यानुसार इमारती उभारून शिल्लक राहणाऱ्या भूखंडावर व्यावसायिक इमारती उभारण्याचे नियोजन आहे. दरम्यान, म्हाडाने नायगाव येथील १,७०० चौरस मीटर, तर ना.म. जोशी मार्ग येथील २,२०० मीटरचा भूखंड चटई क्षेत्रफळासह ई-लिलावाद्वारे भाडेतत्त्वावर देण्यासाठी निविदा प्रसिद्ध केली होती. नायगावसाठी ३७१ कोटी, तर ना.म. जोशी मार्ग येथील भूखंडाचा ४३८ कोटींचा किमान भाडेपट्टा निश्चित केला आहे.

## सत्ताधाऱ्यांच्या परस्परविरोधी भूमिकेमुळे गोंधळ

### ● आमदार शशिकांत शिंदे यांची टीका

**। नाशिक । प्रतिनिधी ।**

मराठा आरक्षणासंदर्भातील शासन निर्णय (जीआर) रद्द करावा, अशी मागणी सरकारमधील अन्न व नागरी पुरवठामंत्री छगन भुजबळ यांनी केली आहे. तर दुसरीकडे, तो रद्द करण्याची गरज नाही, असे जलसंपदामंत्री व मराठा आरक्षण उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे पाटील यांनी स्पष्ट केले आहे. या परस्परविरोधी भूमिकेमुळे गोंधळ निर्माण झाला असून, सरकारनेच आरक्षणाविषयीची भूमिका स्पष्ट करावी, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे प्रदेशाध्यक्ष आमदार शशिकांत शिंदे यांनी केली आहे.



तसेच, भुजबळांना सरकारची भूमिका पटत नसेल, तर त्यांनी मंत्रिपदाचा राजीनामा देऊन बाहेर पडावे, असे आव्हान देखील शिंदे यांनी दिले आहे.

नाशिकमध्ये रविवारी (दि.१४) होणाऱ्या पक्षाच्या राज्यस्तरीय शिबिरापूर्वी माध्यमांशी संवाद साधताना ते बोलत होते. यावेळी शशिकांत शिंदे म्हणाले की, आरक्षणाच्या मुद्यावरून महायुती सरकारमध्ये श्रेयवादाची लढाई सुरू झाली आहे. एकनाथ शिंदे यांना बाजूला सारून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आरक्षणाचा जीआर जारी करून श्रेय घेतले आहे. मात्र, सरकारमधील मंत्रीच आता त्यावर विरोधाची भूमिका घेत आहेत.

## अत्याधुनिक रोबोटिक्स प्रयोगशाळेची स्थापना

**। खेड । प्रतिनिधी ।**

घरडा इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी येथे अत्याधुनिक रोबोटिक्स प्रयोगशाळा उभारण्याची घोषणा करण्यात आली आहे. हा उपक्रम संस्थेच्या संशोधन, नवोन्मेष आणि कौशल्यविकासाच्या प्रवासातील एक महत्त्वाचाटप्पा ठरणार आहे. उद्योग क्षेत्रातील सहयोगी प्रायोजकांच्या मदतीने उभारण्यात येणारी ही प्रयोगशाळा विद्यार्थ्यांना अत्याधुनिक तंत्रज्ञान व उद्योगसंबंधित अनुप्रयोगांचा प्रत्यक्ष अनुभव मिळवून देणार आहे.

# विनापरवाना पिस्तूलची स्टंटबाजी भोवली

**। तळेगाव । प्रतिनिधी ।**

तळेगाव एमआयडीसीतील मिंडेवाडी शिवारात शनिवारी (दि.१३) एक धक्कादायक घटना घडली आहे. रात्री साडेसातच्या सुमारास विनापरवाना पिस्तूलाने स्टंटबाजी करत असताना सुटलेली गोळी लागून एक परप्रांतीय कामगार गंभीर जखमी घटना समोर आली आहे. याप्रकरणी तळेगाव एमआयडीसी पोलिसांनी दोन परप्रांतीय इसमांवर गुन्हा दाखल केला आहे. दोघांपैकी एकाची पोलीस कोठडीत रवानगी झाली असून गोळी लागून एक



गंभीर जखमी झालेला त्याचा मित्र रुग्णालयात उपचार घेत आहे.

तळेगाव एमआयडीसी टप्पा क्रमांक-२ मधील मिंडेवाडी शिवारातील एका खाजगी कंपनीतून कामावरुन घराकडे जात असताना एकाने आपल्या मित्राने रस्त्याकडे झुडपांत लपून ठेवलेली विनापरवाना पिस्तूल हातात घेऊन स्टंटबाजी सुरु केली. दरम्यान, ट्रिगर दाबला गेल्याने पिस्तुलातून सुटलेली गोळी मोबाईलवर बोलत चाललेल्या त्याच्या मित्राच्या पोटात लागून तो गंभीर जखमी झाला. घटनेची वाच्यता होऊन नये म्हणून सोबतच्या मित्रांसह त्यांनी राहत्या खोलीवर जाऊन नंतर जखमी मित्राला तळेगावला उपचारासाठी नेले. मात्र, गोळीबाराच्या आवाजाने परिसरात चर्चांना उधाण आल्याने एमआयडीसी पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. त्यानंतर परिसरात सखोल माहिती घेऊन पोलिसांनी संशयित आरोपी मंजरिन रजिफ मिया याला ताब्यात घेतले. दुचाकीवरुन आलेल्या दोघांनी पिस्तूलातून गोळीबार करुन आमची लूटमार केल्याचा बनाव करीत चुकीची माहिती देऊन पोलिसांची दिशाभूल करण्याचा प्रयत्न सुरुवातीला आरोपी मंजरिनने केला. मात्र, पोलिसांना संशय आल्याने त्यांनी खाक्या दाखविताच आरोपीने रस्त्याकडेला गवतात लपवलेली पिस्तूल दाखवत घडलेल्या खऱ्या प्रकाराची कबुली दिली.

## प्रस्तावित मेट्रो मार्गाला मंजुरी

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

मुंबईतील मेट्रो ४चा विस्तारित भाग असलेल्या आणिक डेपो-वडाळा-गेटवे ऑफ इंडियापर्यंतच्या (मेट्रो ११) तब्बल १७ किलोमीटर लांबीच्या प्रस्तावित मेट्रो मार्गाला राज्य सरकारने मंजुरी दिली आहे. त्यानुसार या मार्गावर १३ भुयारी आणि एक उन्नत अशी एकूण १४ स्थानके असणार आहेत.

मुंबई मेट्रो-११ ही मूलतः मुंबई मेट्रो-४चा (वडाळा-ठाणे-कासारवडवली) विस्तार म्हणून वडाळा ते छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस अशी नियोजित होती. त्यावेळी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने दिल्ली मेट्रो रेल कॉर्पोरेशनमार्फेत (डीएमआरसी) प्रकल्प अहवाल तयार केला होता; मात्र, हा प्रकल्प वेळेत पूर्ण व्हावा, म्हणून भुयारी मेट्रो उभारण्याचा अनुभव असलेल्या मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनकडे दिला होता. दरम्यान, या प्रकल्पाच्या मार्गिकेचे पुनर्निरीक्षण करून मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनमार्फत मार्गिकेचे आणिक डेपो, वडाळा ते गेटवे ऑफ इंडिया असे सुधारित सरेखन करून सुधारित सविस्तर प्रकल्प अहवाल 'डीएमआरसी'कडून तयार करून घेतला आहे. त्यामध्ये १३ भूमिगत आणि भू-समतल स्थानकाचा समावेश असलेल्या एकूण १७.५१ किमी लांबीच्या आणि २३ हजार ४८७ कोटी रुपयांच्या या प्रकल्पाला राज्य सरकारने मंजुरी दिली आहे.

## अधिकाऱ्यांच्या त्रासाला कंटाळून आत्महत्या

### ● वडार कुटुंबियांचा आरोप

**। जत । प्रतिनिधी ।**

जत पंचायत समितीतील शाखा अभियंत्याचा मृतदेह रविवारी (दि.१४) कृष्णा नदीवरील नव्या पुलाजवळ आढळल्याने खळबळ उडाली आहे. अवधूत अशोक वडार (२७) असे त्याचे नाव आहे. त्याचा बुडून मृत्यू झाल्याचे उत्तरीय तपासणीत समोर आले. दरम्यान, वडार यांच्या नातेवाइकांनी एका राजकीय पदाधिकाऱ्याच्या स्वीय सहायक व पंचायत समितीतील अधिकाऱ्यावर गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आहे.

पोलीस व रेस्क्यू फोर्सकडून मिळालेल्या माहितीनुसार, इस्लामपूर येथील अवधूत वडार जत पंचायत समितीमध्ये शाखा अभियंता म्हणून कार्यरत होते. ते शनिवारी (दि.१३) जत येथून निघाले होते. सायंकाळी उशिरा घराकडे न परतल्यामुळे नातेवाईक त्यांचा शोध घेत होते. दरम्यान, रविवारी सकाळी बायपास रस्त्यावरील पुलाखाली मृतदेह तरंगत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. प्राथमिक तपासात वडार यांचा बुडून मृत्यू झाल्याचे स्पष्ट झाले आहे.

दरम्यान, वडार यांच्या नातेवाईकांनी काही आरोप केले आहेत. जत पंचायत समितीमधील वरिष्ठ अधिकारी, कर्मचारी यांचा अवधूत यांच्यावर दबाव होता. राजकीय पदाधिकाऱ्याचा स्वीय सहायक तसेच काही राजकीय मंडळींच्या त्रासामुळे, दबावामुळे अवधूत यांचे मानसिक संतुलन बिघडले होते. त्यातूनच त्याने आत्महत्या केल्याचा आरोप व्यक्त केला आहे. त्यांच्या मृत्यूस कारणीभूत असलेल्या लोकांवर गुन्हा दाखल करा, अन्यथा मृतदेह ताब्यात घेणार नाही असा पवित्रा घेतला. अखेर सायंकाळी उशिरा त्यांचा मृतदेह इस्लामपूरकडे रवाना झाले.

### संख्या वाढवण्यासाठी सरकारच मोठा निर्णय | वाघांना स्थलांतर करण्याची परवानगी

# वाघांची डरकाळी 'सह्याद्री'त घुमणार

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

सह्याद्री व्याघ्र प्रकल्पात वाघांची संख्या वाढवण्यासाठी मोठा निर्णय केंद्र व राज्य सरकारने घेतला आहे. पर्यावरण, वन व जलवायू परिवर्तन मंत्रालयाने महाराष्ट्र सरकारच्या मागणीला मान्यता देत ताडोबा-अंधारी व पेंच व्याघ्र प्रकल्प क्षेत्रातून ८ वाघ (३ नर, ५ मादी) पकडून सह्याद्रीत स्थलांतर करण्याची परवानगी दिली आहे. याबाबतचा प्रस्ताव सह्याद्री व्याघ्र प्रकल्पाच्या चांदोली विभागाने तयार केला होता. त्यामुळे या ठिकाणी वाघिणी आल्यानंतर सह्याद्री व्याघ्र प्रकल्प हा नर वाघांचा प्रवास नैसर्गिकरित्या होणार आहे. आता वाघांची डरकाळी सह्याद्री व्याघ्र प्रकल्पात घुमणार असल्याचे प्रतिपादन आमदार सत्यजित देशमुख यांनी केले आहे.



महाराष्ट्र वन्यजीव विभागाचे अतिरिक्त प्रधान मुख्य वन संरक्षक बेन क्लेमेंट यांनी याबाबत आदेश काढले आहेत. यासाठी केंद्रीय वनमंत्री भूपेंद्र यादव, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, वनमंत्री गणेश नाईक, केंद्रीय डी.जी. फॉरेस्ट अवस्ते, वन सचिव मिलिंद म्हैसकर यांनी प्रयत्न केले. यामध्ये या वाघांना पकडणे आणि त्यांच्या स्थलांतर प्रक्रियेदरम्यान वाघांना कमीत कमी त्रास होईल याची काळजी घ्यावी, योग्य पशुवैद्यकीय सेवा उपलब्ध करून देत ही मोहीम राज्य वन विभागाच्या देखरेखीखाली पार पाडावी, असे या मंत्रालयाच्या आदेशात स्पष्ट करण्यात आले आहे.

वन्यजीवप्रेमी व संवर्धन क्षेत्रातील तज्ज्ञांनी या निर्णयाचे स्वागत केले आहे. आता पेंच आणि ताडोबा येथील ८ वाघांचे सह्याद्रीत अस्तित्व निर्माण होणार आहे. कोल्हापूर, सातारा आणि सांगली जिल्ह्यांच्या डोंगररांगांमध्ये पसरलेला सह्याद्री व्याघ्र प्रकल्प हा राज्यातील तुलनेने नवीन व्याघ्र प्रकल्प मानला जात आहे. शिकार प्रजातींची उपलब्धता व योग्य अधिवास असतानाही वाघांची हालचाल मर्यादित राहिली आहे.

### जैवविविधतेला चालना

ताडोबा व पेंच हे महाराष्ट्रातील सर्वांत मोठे वाघांचे अधिवास असून येथे तुलनेने संख्या जास्त आहे. येथून स्थलांतरित होणारे वाघ सह्याद्रीत नवीन जीवनक्षेत्र निर्माण करतील. यामुळे कोल्हापूर, रत्नागिरीसह पश्चिम महाराष्ट्रातील जैवविविधतेला चालना मिळेल. सह्याद्रीत वाघ वाढले तर संपूर्ण सह्याद्री घाटमाळेला पर्यावरणीय व पर्यटनदृष्ट्या नवे महत्त्व प्राप्त होईल. निसर्गप्रेमी, वन पर्यटक, आकर्षण वाढेल.

## निवडक



### बावशेवाडी येथे गतिरोधकाची मागणी

**चिपळूण :** चिपळूण-गुहागर बाह्यवळणावरील वळण धोकादायक बनले असून अपघातांची शक्यता वाढली आहे. या ठिकाणी गतीरोधक बसवून अपघातांना आळा घालावा, अशी मागणी महालक्ष्मीनगरच्या महालक्ष्मी मित्र मंडळाने केली आहे. या संदर्भात मंडळाच्यावतीने सार्वजनिक बांधकाम उपविभाग (रोह्यो) चिपळूणचे उपअभियंता यांना लेखी निवेदन देण्यात आले. मंडळाचे अध्यक्ष यांनी निवेदनात म्हटले आहे की, या मागणीवर आम्ही गेल्या वर्षभरापासून पाठपुरावा करीत आहोत. सहा महिन्यांपूर्वी संबंधित अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष पाहणी करूनही अद्याप गतीरोधक बसविण्याची कारवाई झालेली नाही. मंडळाने यापूर्वीही उपअभियंता आणि शाखा अभियंता यांना समस्येविषयी माहिती देऊन वारंवार भेटी दिल्या होत्या. त्यावेळी तांत्रिक कारणास्तव जिल्हाधिकारी व पोलीस विभागाकडून परवानगी आवश्यक असल्याचे सांगण्यात आले होते. मात्र, या परवानगी घेण्याची जबाबदारी सार्वजनिक बांधकाम विभागाची असून तातडीने कारवाई होणे आवश्यक आहे.



### महालक्ष्मी मंडळाच्या विविध मागण्या

**चिपळूण :** खेंड गणपती मंदिर ते खंड बायपास मार्गावरील गतीरोधकावर पांढरे पट्टे मारावेत, भटक्या कुत्र्यांचा बंदोबस्त करावा तसेच बावशेवाडी येथील नादुरुस्त गटाराची पुनर्बांधणी करावी, अशा विविध मागण्या महालक्ष्मी मित्र मंडळ महालक्ष्मीनगर यांच्यावतीने नगरपरिषदेकडे करण्यात आल्या आहेत. मंडळाच्या अध्यक्षांनी मुख्याधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, खेंड गणपती मंदिर ते वाह्यवळण मार्गावर गतीरोधक आहेत; मात्र, रात्रीच्यावेळी ते दिसत नसल्याने अपघाताची शक्यता वाढली आहे. त्यामुळे या गतीरोधकावर पांढरे पट्टे मारणे आवश्यक आहे. तसेच, खेंड बाह्यवळण परिसरात १० ते १५ भटक्या कुत्र्यांचा त्रास होत असून पादचारी, प्रवासी व वयोवृद्ध नागरिकांना धोका निर्माण होत असल्याने तातडीने बंदोबस्त करावा. याशिवाय, खेड बावशेवाडी येथे रमेश जानवलकर यांच्या घरासमोरील गटार पूर्णपणे नादुरुस्त झाले आहे. त्यामुळे पाण्याचा निचरा होत नाही व गटारे तुंबतात. त्यामुळे गटाराची पुनर्बांधणी करून नागरिकांची गैरसोय दूर करावी.



### ग्रामपंचायतीत लाखोंचा गैरव्यवहार

**गुहागर :** तालुक्यातील झोंबडी ग्रामपंचायतीमध्ये अनेक शासकीय योजना राबवताना लाखोंचा आर्थिक गैरव्यवहार केल्याचा आरोप येथील ग्रामस्थांनी केला आहे. त्यांनी सरपंच अतुल लांजेकर आणि ग्रामसेवक यांच्यावर आरोपाचा ठपका ठेवला आहे. याबाबत पंचायत समिती गटविकास अधिकाऱ्यांकडे तक्रारही करण्यात आली आहे. ग्रामस्थ अक्षय सकपाळ यांनी सांगितले की, २५ सप्टेंबर २०२४ रोजी डिप फ्रिजची मागणी केलेली होती. त्याच दिवशी त्याची रक्कम रुपये ४० हजार देण्यात आली. मात्र, ८ सप्टेंबरपर्यंत डिप फ्रीजर ग्रामपंचायतीमध्ये उपलब्धच नसल्याचे आढळून आले. एकूणच ग्रामपंचायतीतर्फे गावात विकासकामे करताना किंवा वस्तू खरेदी करताना त्यावर खर्च प्रमाणापेक्षा जास्त करून कमी किंमतीची, कमी दर्जाची वस्तू जास्त किंमतीत विकत घेणे, पेपर निविदा प्रसिद्ध न करता कामे करणे, न झालेली कामे कागदोपत्री दाखवून पैसे लाटणे, असे अनेक आरोप पुराव्यानिशी करण्यात आले आहेत.



### विचारे कुटुंबाला लायन्स क्लबची मदत

**खेड :** शहरातील कातर आळी परिसरात १२ सप्टेंबर रोजी पहाटे लागलेल्या आगीत एका कुटुंबाचे मोठे नुकसान झाले. किशोर चंद्रकांत विचारे यांच्या घरातील फ्रीजला अचानक आग लागली आणि ती झपाट्याने पसरत किचनमधील सर्व साहित्य जळून खाक झाले. सुदैवाने या दुर्घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही. या घटनेनंतर समाजातील कार्यकर्त्यांनी तत्परतेने मदतीचा हात पुढे केला. अपघातग्रस्त व निराधारांना तातडीने आधार देण्याच्या परंपरेनुसार लायन्स क्लब खेड सिटीच्यावतीने रविवारी (दि.१४) या कुटुंबाला मदत करण्यात आली. मोरे फर्निचरचे मालक संदीप मोरे यांच्यावतीने गरजेचे जिन्नस भेट म्हणून देण्यात आले. यावेळी लायन्स क्लब खेड सिटीचे माजी अध्यक्ष रोहन विचारे, डॉ. मरकड, संदीप मोरे, राजेश जोयसर, शरद शिर्के, आबा निकम, सागर चिखले, डॉ. वेद तलाठी, शंकर पार्टे, शैलेश धारिया यांसह क्लबचे अनेक सदस्य उपस्थित होते.

### चंद्रकांत घाग यांची फेरनिवड

**चिपळूण :** नांदगाव येथील सामाजिक कार्यकर्ते चंद्रकात किसन घाग यांची नांदगावच्या तंटामुक्त अध्यक्षपदी दुसऱ्यांदा निवड झाली आहे. गावात शांतता सलोखा राहण्यासाठी सतत प्रयत्नशिल असणाऱ्या चंद्रकात घाग यांनी अनेक सामाजिक उपक्रम राबिवले आहेत. त्याचबरोबर गावातील अंतर्गत असणारे वाद मिटवण्याचा प्रयत्न त्यांनी केला आहे. सर्वांना बरोबर घेऊन काम करण्याच्या वृत्तीने गावात एकसंघता निर्माण केली आहे. नवनिर्वाचित अध्यक्ष चंद्रकसंत घाग यांचे अनेकांनी अभिनंदन केले असून आमदार शेखर निकम यांनी देखील शुभेच्छा दिल्या.

# लोक अदालतीत हजारो प्रकरणे निकाली

## ६० कोटी ४२ लाख ८३ हजार ६३७ रुपयाची तडजोड रक्कम वसूल



**। रायगड । प्रतिनिधी ।**

**दाखलपूर्व आणि प्रलंबित खटल्यांचा जलद निपटारा व्हावा आणि प्रलंबित खटले सामोपचाराने मिटावेत या हेतूने (दि.१३ सप्टेंबर) रोजी जिल्ह्यात आयोजित करण्यात आले होते. लोकन्यायालयाचे उदघाटन उच्च न्यायालयाचे न्यायामूर्ती रियाज छागला यांच्याहस्ते उच्च न्यायालयाचे न्यायमुर्ती मिलींद साठे यांच्या उपस्थितीत दुकश्राव्य माध्यमाद्वारे करण्यात आले.**

लोकन्यायालयात अनेक प्रकरणे निकाली काढण्यात आली असून वादपूर्व व दाखल अशी एकूण ९ हजार ६५० प्रकरणे सामंजस्याने मिटविण्यात यश आले आहे, अशी माहिती जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव तथा न्यायाधीश तेजस्विनी निराळे यांनी दिली आहे.

राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, सर्वोच्च न्यायालय, दिल्ली यांच्या निर्देशाप्रमाणे संपूर्ण भारतभर राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये न्यायालयातील प्रलंबित प्रकरणे तसेच वादपूर्व प्रकराणे ठेवण्यात आली होती. रायगड जिल्ह्याचे प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश राजेंद्र सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यामध्ये आयोजित केलेल्या राष्ट्रीय लोक अदालतीमध्ये रायगड जिल्ह्यातील ४४ हजार १८७ वादपूर्व प्रकरणे व १३ हजार ६७८ प्रलंबित अशी एकूण ५७ हजार ८६५ प्रकरणे लोक अदालतीमध्ये ठेवण्यात आली होती. त्यापैकी ५ हजार ५८२ वादपूर्व प्रकरणे व ४ हजार ६८ प्रलंबित प्रकरणे अशी एकूण ९ हजार ६५० प्रकरणे सामंजस्याने मिटवून लोक अदालतीमध्ये निकाली निघाली असून त्याद्वारे पक्षकारांना एकूण ६० कोटी ४२ लाख ८३ हजार ६३७ रुपयांची तडजोड रक्कम मिळवून देण्यात आली आहे.

**५ जोडप्यांचा संसार जुळला**

जिल्ह्यातील लोकन्यायालयात ५ जोडप्यांचा (रोहा-१, पाली-१, श्रीवर्धन-१, पनवेल-१, अलिबाग-१) सामंजस्याने वाद मिटल्यामुळे संसार सुरळीत झाला आहे. प्रमुख जिल्हा न्यायाधीश राजेंद्र सावंत यांनी मनोमिलन झालेल्या जोडप्यांचे अभिनंदन केले. मोटार अपघात प्रकरणांमध्ये ४ कोटी ४३ लाख ४९ हजार १०० रूपये इतकी नुकसान भरपाई मंजूर जिल्ह्यामध्ये एकूण ४७ मोटार अपघात प्रकरणांमध्ये तडजोड झाली असून पक्षकारांना ४ कोटी ४३ लाख ४९ हजार १०० इतकी नुकसान भरपाईची रक्कम मंजूर करण्यात आली आहे.

जिल्ह्यातील विविध न्यायालयात २६ लोक अदालतीचे कक्ष स्थापन करण्यात आले होते. लोक अदालतीमध्ये पक्षकारांना न्यायालयात येण्याची सक्ती न करता व्हिडीओ कॉलचा वापर करुनसुध्दा प्रकरणे मिटविण्यात आली. या लोक न्यायालयाला यशस्वी करण्यासाठी सर्व न्यायिक अधिकारी, वकील, जिल्हा परिषद, पोलीस अधिक्षक, सर्व पक्षकार यांनी भरघोस प्रतिसाद दिल्याबद्दल जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष तथा प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश राजेंद्र सावंत व दिवाणी न्यायाधीश तथा सचिव तेजस्विनी निराळे यांनी आभार मानले.

# विद्यार्थ्यांनी अनुभवले फणसाड अभयारण्य



**। मुरुड-जंजिरा । वार्ताहर ।**

फणसाड अभयारण्य पावसात सुंदर रूप धारण करते. सर्वत्र हिरवाईने नटलेला परिसर, झाडावर बसलेली रंगीबेरंगी फुलपाखरे, विविध पक्षांचे सुमधुर आवाज, रस्त्यावरून चालताना प्राण्याचे हंबरणे अशा विविध रंगाने नटलेले फणसाडच्या परिसर पाऊसात पाहण्यासाठी ठाणे येथून किशोर शिरकांडे यांचा ३०० मुलांचा ग्रुप आला होता. त्यांना पक्षी प्राणी फुलपाखरे यांची अचूक माहिती देण्यात आली.

फणसाडमध्ये नदीकाठची वने अशा या वैविध्यपूर्ण जंगलात सुमारे ७१८ प्रकारचे वृक्ष, १७ प्रकारचे सस्तन प्राणी, १६४ प्रकारचे रंगीबेरंगी पक्षी, २७ प्रकारचे साप व अनेक वन्य श्वापदे आढळतात. सरासरी २८०० मिलीमीटर पावसाची नोंद येथे घेण्यात आली आहे. फणसाड अभयारण्यात साग व निलगिरीची रोपवने यासह प्रामुख्याने ऐन, किंजळ, जांभूळ, द्वेद, कुडा, गेळा, अंजनी, कांचन, सावर, अर्जुन हे वृक्ष व कर्करोगावर गुणकारक नरक्या याबरोबरच सीताअशोक, सर्पगंधा, कुरडु, रानतुळस, कढीपत्ता उक्षी या औषधी वनस्पती आढळून येतात.

**■ पर्यटकांनी घेतला वनभोजनाचा आनंद**

वाकेरी, वाघाटी, पळसवेल, पेंटगुळ इत्यादी प्रकारच्या वेली व जगातील सर्वात लांब वेलींपैकी एक असलेली गारंबीच फणसाड वन्यजीव अभयारण्यात १७ प्रकारचे वन्यप्राणी आहेत. यामध्ये रानससा, सांबर, भेकर, पिसोरी, सांळींदर, तरस, रानडुक्कर, मुंगूस, कोल्हा, वानर, माकड, रानमांजर व बिबट्या आणि पर्यटकांच्या व अभ्यासकांचे आकर्षण असलेले शेकरू येथे हमखास पाहायला मिळते. विद्यार्थ्यांनी वनविहार करण्याचा आनंद घेतला.

# अटकेची धमकी देत केली २५ लाखांची फसवणूक

**। पनवेल । वार्ताहर ।**

सीबीआय ऑफिसर असल्याचे सांगून कुलाबा पोलिस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल आहे त्यात अरेस्ट करत आहोत असे सांगून २६ लाख सहा हजार आठशे रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी राजेश मिश्रा आणि विक्रांत सिंग राजपूत यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

शशांक दासरॉय यांना फसवणुकीच्या गुन्ह्यात हाऊस अरेस्ट करण्यात येत आहे असे सांगितले. यानंतर विक्रांत सिंग असे नाव सांगून मी प्रोफाईल फोटो बदलत आहे असे सांगितले.

सेंट्रल ब्युरो ऑफ इन्व्हेस्टिगेशनचे १ चिन्ह असलेले दोन लेटर हेड असलेले लेटर पाठवून तुम्हालासुद्धा अटक होऊ शकते, असे बोलून त्यांनी पोलिसांसोबत आरोपीचे फोटो असलेले तीन फोटो व्हॉट्सॲपवर पाठवले. माझे नाव या प्रकरणातून कसे काढता येईल, अशी विनंती शशांक यांनी केली असता त्यांनी बँक खात्याची माहिती देण्यासाठी विचारणा केली.

# खोपोली येथे विशेष वित्तीय समावेशन शिबीर संपन्न

**। रायगड । प्रतिनिधी ।**

खोपोली येथे विशेष वित्तीय समावेशन शिबिर कार्यक्रम संपन्न झाले. या शिबिरांना रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे कार्यकारी निर्देशक नीरज निगम, सुमन रे, दिनकर संकपाळ, बँक ऑफ इंडियाचे मुख्य महाप्रबंधक सुनील शर्मा, युनियन बँक ऑफ इंडियाचे महाप्रबंधक दिलीप मिश्रा, बँक ऑफ बडोदा बँकेचे महाप्रबंधक सुनील कुमार शर्मा, सेंट्रल बँक ऑफ इंडियाचे रिजनल मॅनेजर विभोर अग्रवाल, बँक ऑफ इंडियाच्या रायगड विभाग प्रमुख दीपन्विता सहानी, स्टेट बँक ऑफ इंडियाचे उप महाप्रबंधक दया शंकर यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

या शिबिरामध्ये सर्वसामान्य नागरिक, शेतकरी, महिला बचतगट, लघुउद्योग प्रतिनिधी आदींना खाते उघडणी, पुनः केवायसी प्रक्रिया, पीएम जनधन योजना, सामाजिक सुरक्षा विमा योजना, मुद्रा कर्ज योजना, डिजिटल व्यवहार, तसेच डिजिटल फ्रॉड विषयी मार्गदर्शन तसेच विविध बँकिंग सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या.

# पिकअप गाडीसह घेतले ताब्यात

**पनवेल :** तडीपार असलेल्या सराईत गुन्हेगारास पोलिसांच्या पथकाने चोरीच्या महेंद्रा बोलेरो पिकअप गाडीसह ताब्यात घेतले आहे. तालुक्यातील अजिवली येथे राहणारे कृष्णा चव्हाण यांच्या ट्रान्सपोर्टची महेंद्रा बोलेरो पिकअप १० लाख रुपये किंमतीची गाडी चोरीस गेल्याप्रकरणी तक्रार पनवेल तालुका पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली होती. या गुन्ह्यातील गाडी पोलिसांनी हस्तगत केली आहे तर त्याचा सहकारी हरी चव्हाण याचा शोध पोलीस करीत आहेत.

# जेएनपीएने शंभर टक्के हरित ऊर्जा केली साध्य




**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

जेएनपीएने शाश्वततेकडे मोठी पावले टाकत घोषणा केली आहे की जेएनपीए-विशेष आर्थिक क्षेत्राने आपल्या सर्व कामकाजासाठी शंभर टक्के हरित ऊर्जेकडे यशस्वी संक्रमण केले आहे. या एसईझेडने १ सप्टेंबर २०२५ पासून प्रभावी ठरणाऱ्या ६.० मेगावॅट ग्रिड-कनेक्टेड पवनऊर्जेच्या खरेदीसाठी नव्या अल्पकालीन ओपन ॲक्सेस करारावर स्वाक्षरी केली आहे. या करारान्वये वीज खरेदीचा दर केवळ रु. ३.१२ प्रति युनिट इतका कमी होणार आहे.

एसईझेडमध्ये कार्यरत उद्योगांसाठी स्पर्धात्मक फायदेही निर्माण होतात. या हरित बदलाचे नेतृत्व करून जेएनपीए भारतातील शाश्वत, बंदर केंद्रित औद्योगिक विकासाला गती देणारा आघाडीचा घटक असल्याची पुन्हा एकदा पुष्टी करत असल्याचे जेएनपीएचे अध्यक्ष उन्मेष वाघ यांनी या यशाबद्दल म्हटले म्हटले आहे.जेएनपीए एसईझेड आमच्या नोड-टू-नेटवर्क धोरणातील महत्त्वाचा दुवा आहे, ज्यामुळे आम्हाला टर्मिनल सेवांच्या पलीकडे जाऊन सर्वसमावेशक पोर्ट परिसंस्थेतील आमची भूमिका बळकट करता येते असेही वाघ यांनी म्हटले आहे.

# तळवली येथे व्यवस्थापन शिबीर संपन्न



**। खांब । प्रतिनिधी ।**

रोहा तालुक्यातील तळवली तर्फे अष्टमी या गावामध्ये साखरचौथ गणेशोत्सवाचे औचित्य साधून व्यवस्थापन शिबीर मोठ्या उत्साहात संपन्न करण्यात आले.

येथील गावठाण युवक व ग्रामस्थ तसेच तरूण मंडळाचे वतीने गेली १० वर्षांची यशस्वी परंपरा राखत साखरचौथ गणेशोत्सव विविध प्रकारच्या कार्यक्रमांनी साजरा करण्यात आला. याच कार्यक्रमात सह्याद्री वन्यजीव रक्षणार्थ सामाजिक संस्था कोलाड या संस्थेच्या वतीने आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करून ग्रामस्थ व महिला वर्ग यांच्यामध्ये व्यवस्थापनाबाबत जनजागृती करण्यात आली. प्रशिक्षण शिबिरात किचन फायर (स्वयंपाकघरातील आग प्रतिबंध व नियंत्रण), सीपीआर (हृदय-श्वसन पुनर्जीवन), बेसिक फर्स्ट एड (प्राथमिक उपचार) व आपत्कालीन परिस्थितीत ग्रामस्थ व सरपंच यांची भूमिका तसेच युवकांची जबाबदारी व भूमिका विषयांवर मार्गदर्शन व प्रात्यक्षिके दाखविण्यात आली.

# अग्निशस्त्र बाळगणारे दोघे अटक

**पनवेल :** शस्त्र परवाना देताना तो कुठल्या भागासाठी आहे हे स्पष्ट केले जाते. तसेच या बाबत परवाना घेणाऱ्या व्यक्तीला सांगितलेही जाते. तरीही राज्या बाहेर परवानगी नसताना अग्निशस्त्र बाळगल्या प्रकरणी दोन संशयित व्यक्तींना अटक करण्यात आली आहे. या शस्त्रा सोबत असणारी ११ जीवंत काडतुसे हि जप्त करण्यात आली आहेत. प्रवीणकुमार लालताप्रसाद पांडे (वय ३२ मूळ जोनपूर उत्तरप्रदेश) आणि विकास त्रिपाठी (४५) राहणार मूळ प्रतापगढ उत्तरप्रदेश. असे अटक करण्यात आलेल्या संशयित आरोपींची नावे आहेत.

# विद्यार्थ्यांना सौर दिवे, मोबाईल व्हाऊचर कार्डचे वाटप

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

आरिन फाउंडेशन, मिलेनियम रोटरी क्लब नवी मुंबई आणि आर्यन फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने पनवेल तालुक्यातील रायगड जिल्हा परिषद शाळा तसेच वनवासी आश्रम शाळांमधील विद्यार्थ्यांसाठी विशेष उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना सौर ऊर्जेवर चालणारे दिवे तसेच दहावीच्या विद्यार्थ्यांना परीक्षेपूर्व तयारीसाठी मोबाईल अप्लिकेशन वाउचर कार्डचे मोफत वाटप करण्यात आले.

पनवेल तालुक्यातील गावांमध्ये अद्यापही विजेची समस्या गंभीर स्वरूपात आहे. अनेक ठिकाणी विजेचा पुरवठा अत्यंत अनियमित असल्याने विद्यार्थ्यांना अभ्यास करण्यास मोठा अडथळा निर्माण होतो. रात्रीच्या वेळेस उजेडाअभावी मुलांना अभ्यास करणे कठीण जाते आणि त्याचा थेट परिणाम त्यांच्या शैक्षणिक प्रगतीवर होतो. या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी सक्षम वातावरण उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने सौर दिव्यांचे वाटप करण्यात आले. हे दिवे संपूर्णपणे मोफत देण्यात आले असून त्यांचा लाभ शालेय विद्यार्थ्यांना होणार आहे.

दिवाळीपूर्वी फेऱ्यांमध्ये वाढ करण्याची मागणी | माथेरानकरांना लागली प्रतीक्षा

# माथेरान मिनीट्रेन पूर्ण क्षमतेने कधी धावणार



**। माथेरान । वार्ताहर ।**

**पर्यटकांचे आकर्षण व माथेरानची खऱ्या अर्थाने जीवनवाहिनी समजली जाणारी नेरळ माथेरान मिनीट्रेन यावर्षी १५ ऑक्टोबरचा मुहूर्त साधणार का? याची चर्चा सर्वत्र होत असून मागील काही वर्षांमध्ये नेरळ माथेरान मिनीट्रेन सुरू होण्याकरिता दिरंगाई होत असल्याच्या कारणांनी यावर्षी तरी ही ट्रेन वेळेवर सुरू होईल का? अशा शंका माथेरानमधील स्थानिक नागरिक उपस्थित करीत आहे.**

माथेरान पर्यटन नगरीचे मुख्य आकर्षण असलेले मिनी ट्रेन सफारी पर्यटकांकरिता एक मेजवानी असते या ट्रेनने नागमोडी वळणे व डोंगर रांगांमधून प्रवास करण्याकरता देश-विदेशातून अनेक पर्यटक माथेरानमध्ये दाखल होत असतात परंतु पावसाळ्यामध्ये सुरक्षिततेच्या कारणावरून नेरळ माथेरान मिनी ट्रेन बंद ठेवण्यात येते; परंतु यावेळी अमन लॉज ते माथेरान शटल सेवा मात्र नियमित सुरू असते.

पर्यटकांना खरे आकर्षण हे नेरळ माथेरान या सफारी मध्येच वाटत असल्याने यांच्या फेऱ्यांमध्ये वाढ व्हावी, अशी सातत्याने मागणी होत असते परंतु रेल्वे प्रशासन मागील काही वर्षापासून त्याकडे दुर्लक्षच करीत असल्याचे निदर्शनास आले आहे. पावसाळ्यात सुरक्षेच्या कारणास्तव १५ जूनला मिनीट्रेन बंद होत असते परंतु मागील दोन-तीन वर्षांमध्ये रेल्वे प्रशासन या अगोदरच मिनीट्रेन बंद करण्याची घाई करत आल्याचे चित्र आहे.

> **नेरळ-माथेरान सेवा दसऱ्याच्या शुभ मुहूर्तावर रेल्वे प्रशासनाने सुरू करून नेरळ माथेरान सेवेमध्ये वाढ करावी व पूर्वीप्रमाणे येथे वस्तीला येणारी मिनीट्रेन व मालवाहू गाडी पुन्हा सुरू करावी.**
>
> **- प्रदीप घावरे, माजी नगरसेवक**

परंतु मिनिट्रेन सुरू करण्यासाठी मात्र नेहमीच उशीर होत असतो हे लक्षात घेता यावर्षी तरी मिनीट्रेन वेळेवर सुरू होणार का असा प्रश्न येथील स्थानिक विचारत आहे.

काही वर्षांपूर्वी माथेरानमध्ये नेरळहुन मिनीट्रेनच्या पाच फेऱ्या सुरू होत्या. पण यावेळेस फक्त दोनच फेऱ्या सुरू करण्यात आल्या होत्या. लवकरच त्या वाढविण्यात येतील असे सांगितले होते; परंतु नेहमीप्रमाणे ही पोकळ आश्वासन ठरली होती. त्यामुळे यावर्षी तरी मिनी ट्रेनला गत वैभव प्राप्त होताना नेरळ माथेरान फेऱ्यांमध्ये वाढ होणार का अशी मागणी माथेरानकरांकडून होत आहे तर नेरळ माथेरान मार्गावरती मिनीट्रेनच्या फेऱ्या वाढवण्यास रेल्वे प्रशासन अनुत्सुक असल्याचे काही कर्मचाऱ्यांचे म्हणणे आहे.

## निवडक



### बोरसेंची अमेरिकेत कार्यशाळा

**कर्जत :** कर्जत शहरातील रहिवासी पराग बोरसे यांनी अमेरिकेतील डकोटा आर्ट पेस्टल्स येथे तीन दिवसांची पेस्टल पोर्ट्रेट कार्यशाळा नुकतीच यशस्वीरीत्या पूर्ण केली. ही कार्यशाळा १०, ११ आणि १२ सप्टेंबर रोजी पार पडली. आठ विद्यार्थ्यांनी या कार्यशाळेत सहभाग घेतला. विशेष म्हणजे हे सर्व विद्यार्थी अमेरिकन असून, विविध राज्यांतून प्रवास करून त्यांनी या कार्यशाळेत हजेरी लावली.या कार्यशाळेत रंग, आकार आणि पोर्ट्रेट तंत्र यांवर सखोल चर्चा झाली. पराग बोरसे यांनी प्रात्यक्षिक म्हणून महाराष्ट्रातील एका पगडीधारी मेंढपाळ गावकऱ्याचे चित्र काढले. भारतीय संस्कृतीचे दर्शन घडविण्याच्या उद्देशाने त्यांनी हा विषय निवडला होता. सर्व विद्यार्थी अमेरिकन असूनही भारतीय ग्रामीण जीवनातील सौंदर्य व संस्कृतीचे दर्शन त्यांना घडवण्याचा प्रयत्न या कार्यशाळेतून झाला. डकोटा आर्ट पेस्टल्स हे अमेरिकेतील नामांकित आर्ट स्टोअर असून, कलाकारांच्या कार्यशाळा येथे आयोजित केल्या जातात. भारतीय कलाकारास येथे कार्यशाळा घेण्याचे आमंत्रण मिळणे ही अभिमानाची गोष्ट असल्याचे पराग बोरसे यांनी सांगितले.

### गेल कंपनीत कॉपर केबलची चोरी

**रेवदंडा :** अलिबाग तालुक्यातील उसर, गेल इंडिया कंपनीत कॉपर केबल चोरीची घटना घडल्याने कंपनी परिसरात चोरीच्या घटनेने घबराट निर्माण झाली असून रेवदंडा पोलीस ठाणे येथे अज्ञात चोरट्याचे विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कोणीतरी अज्ञात चोरट्यांनी १८ जुन २०२५ सकाळी दहा वाजता ते १२ सप्टेबर २०२५ च्या दुपारी सव्वा तीनच्या दरम्यानच्या काळात उसर गेल कंपनी मधील मोकळया जागेतील पाईपयार्ड या ठिकाणी ठेवलेली ९५ मीटर लांबीची कॉपर केबल संमतीशिवाय लबाडीच्या इरादयाने चोरी करून नेली. या अज्ञाताकडून चोरीस नेलेल्या कॉपर केबलची किमंत एकूण १ लाख २५ हजार असल्याचे कार्तिकेय महेशचंद्र चतुवैदी वय ३८ वर्षे सध्या रा.अलिबाग, मुळ राहणार उत्तरप्रदेश गेरटर नोएडा यांनी तक्रारीत म्हटले आहे. याबाबत रेवदंडा पोलीस ठाणे येथे ११५/२०२५ ने भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३०३(२) प्रमाणे अज्ञात चोरट्यांचे विरोधात गुन्हा नोंदविण्यात आला आहे. अधिक तपास पोसई एन.आर.अंगज रेवदंडा पोलीस ठाणे हे करत आहेत.

### सेवानिवृत्तांच्या संघटनेची सभा

**श्रीवर्धन शहर :** रायगड जिल्हा सेवानिवृत्तांच्या संघटनेची वार्षिक सर्वसाधारण सभा शनिवारी (दि.१३) पोलादपूर येथील कॅ.विक्रमराव मोरे सभागृह येथे मोठ्या संख्येने व उत्साही वातावरणात संपन्न झाली. प्रारंभी दीप प्रज्वलन होऊन छत्रपती शिवाजी महाराज व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले.दिवंगत सदस्यांना श्रद्धांजली वाहिल्यानंतर ईशस्तवन व स्वागतगीताने सभेच्या कामकाजाला सुरुवात झाली. कार्यक्रम पत्रिकेनुसार सभेत मागील सभेचे इतिवृत्तास मंजुरी,अहवाल वाचन, सन २४-२५ च्या जमाखर्चास व २५-२६ च्या अंदाजपत्रकास मंजुरीलेखापरीक्षणात काढण्यात आलेल्या त्रुटींच्या पूर्ततेसमंजुरी, कार्यकारिणीत केलेल्या महत्वाच्या ठरावांना मंजुरी व निवृतांच्या विविध समस्यांवर चर्चा इ.महत्वाचे कामकाज पार पडले. सभेमध्ये संघटनेचे कार्याध्यक्ष वसंतराव वाबळे, असोसिएशनचे अध्यक्ष एन.डी.मारणे यांनी अतिशय मोलाचे व सेवानिवृत्तांच्या दृष्टीने अतिशय जिव्हाळ्याच्या विषयांवर मार्गदर्शन केले.रायगड जिल्हाध्यक्ष धुरंधर मढवी व अन्य पदाधिकाऱ्यांनी सभेस संबोधित केले.संघटनेच्या पोलादपूर शाखेने सभेचे उत्तम नियोजन केले होते. सुग्रास भोजनानंतर कामकाज समाप्त झाले.



### शेतकऱ्यांना बांबू वृक्षाचे वाटप

**मुरुड :** बांबू वृक्षाचे लागवड मोठ्या प्रमाणात व्हावी व शेतकऱ्यांना रोजगार उपलब्ध व्हावा यासाठी अटल बांबू समृद्धी योजनेचा ज्या शेतकऱ्यांनी गेल्यावर्षी कंपनी तर्फे फॉर्म भरलेला अशा शेतकऱ्यांना नुकतेच मुरूड जंजिरा शेतकरी उत्पादक कंपनीतर्फे कंपनी कार्यालयात सचिव दिनेश मिनमिने यांच्या हस्ते रोपांचे वाटप करण्यात आले. यावेळी कंपनीचे इतर संचालक निखिल मानजी, पुष्कर भोईर, गणेश गाणार, मुशरीफ खतीब, अनिल नाकती यांनी देखील उपस्थित राहून शेतकरी सभासदांना बांबूच्या रोपांचे वाटप केले. या कार्यक्रमात शेतकरी लाभार्थी मोहन पाटील, शाबाज उलडे, दिलावर सौदागर, समित दळवी, महेश जोशी, मनोज रणदिवे, दामोदर थळे, दाऊद हसवारे, दामोदर रिकामे हे देखील उपस्थित होते. यावेळी उपस्थित शेतकऱ्यांना मार्गदर्शन करताना सचिव दिनेश मिणमिणे यांनी सांगितले की, शेतकरी उत्पादक कंपनीतर्फे कंपनी तर्फे शेतकऱ्यांच्या हितासाठी काम केले जाते. बांबू वृक्ष लागवड मोठ्या प्रमाणात होणे ही काळाची गरज आहे. यासाठी शासनातर्फे विविध योजना राबवल्या जातात त्याचा शेतकरी वर्गाने उचित फायदा घेतला पाहिजे.

क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

● नागावमधील हॉटेलमध्ये काम करण्यासाठी स्टाफची आवश्यकता आहे. वेटर, मोरी सहाय्यक (Helper) १ ते ३ वर्षे अनुभव असणाऱ्यांनी सकाळी १० ते ५ या वेळेत संपर्क साधावा अथवा व्हॉटसअॅप वर मेसेज करावा. मोबाईल : ७५५९१८४६१२

● नागावमधील होम स्टे/वाडी सांभाळण्यासाठी पर्मनंट जोडपे हवे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क- ९८२०६०९४५०.

● ''जन्नावर हॉस्पीटल'' अलिबाग-मध्ये कामसाठी मावशी व नर्सची जागा आहे. (Vacancy) Contact No 7798034509

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

## दहावीच्या विद्यार्थ्यांना सुवर्णसंधी

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

पीएम श्री स्कूल जवाहर नवोदय विद्यालय, निजामपूर, तालुका माणगाव, जिल्हा रायगडच्या सत्र २०२६-२७ करिता इयत्ता अकरावी (विज्ञानशाखा) निवडपरीक्षेचे ऑनलाईन अर्ज : https://cbseitms.nic.in/2025/nvsxi_11 या संकेतस्थळावर सादर करण्याची प्रक्रिया सुरू आहे. ऑनलाइन अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख २३ सप्टेंबरपर्यंत आहे. परीक्षा दि. ७ फेब्रुवारी २०२६ रोजी जवाहर नवोदय विद्यालय निजामपूर येथे होणार आहे. रायगड जिल्ह्यातील सर्व परीक्षार्थी, पालक, सर्व शिक्षक व मुख्याध्यापक यांनी याची नोंद घ्यावी, असे आवाहन डॉ. प्रशांत राघमवार प्राचार्य ,जवाहर नवोदय विद्यालय, रायगड यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी शारदा अहिरे-७०२०६१४०६९, रश्मी मिश्रा -९०११७३८०४०, संतोष चिंचकर ९८८१३५१६०१ या मोबाईल क्रमांकावर संपर्क साधावा.

# खुरावले-वाघोशी रस्ता दुरुस्त करा

**। पाली । वाघोशी । प्रतिनिधी।**

खुरावले फाटा ते वाघोशी हा रस्ता मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतून बांधण्यात आला असला तरी सुरुवातीपासूनच या रस्त्याची अवस्था खड्डेमय व दयनीय आहे. दररोज शेकडो नागरिक, शालेय विद्यार्थी, महिला, शेतकरी या रस्त्यावरून प्रवास करतात; मात्र खड्डेमय रस्त्यामुळे अपघातांचा धोका वाढला असून, ग्रामस्थांचे हाल होत आहेत. शासनाकडून लाखो रुपये खर्च झाल्याचा दावा केला जात असला तरी प्रत्यक्षात कामाचा दर्जा शून्य आहे. या रस्त्याच्या दुरवस्थेविरोधात बहुजन विद्यार्थी संघटनेने तीव्र संताप व्यक्त केला असून, २२ सप्टेंबर रोजी ठाम उपोषण छेडण्याचा इशारा दिला आहे.

नागरिकांच्या सोयीसाठी करण्यात आलेले काम भ्रष्टाचार व निष्काळजीपणामुळे निष्फळ ठरले आहे. पावसाळ्यात रस्त्यावरील खड्डे एवढे गंभीर झाले आहेत की वाहनचालकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागतो. शासनाचे कोट्यवधी रुपये खर्च होऊनही या रस्त्याचे आयुष्य काही महिनेच टिकते, हे प्रशासनाच्या निष्काळजीपणाचे स्पष्ट उदाहरण आहे.बहुजन विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष अमित गायकवाड यांनी अधिकाऱ्यांना निवेदन देऊन स्पष्ट मागण्या मांडल्या आहेत. त्यामध्ये दोषी कंत्राटदाराला काळ्या यादीत टाकावे, कंत्राटदाराचे डिपॉझिट रद्द करून परत करू नये, खड्डे भरण्याच्या नावाखाली मागील पाच वर्षांत लावलेली बिले थांबवावीत, शासनाचे सर्व पैसे थेट दर्जेदार रस्ता दुरुस्तीसाठी वापरावेत, या मागण्यांचा समावेश आहे.

या मागण्या तातडीने मान्य न झाल्यास २२ सप्टेंबर रोजी सोमवारी सकाळी ११ वाजता खुरावले फाटा येथे उपोषणास बसणार असल्याचे अमित गायकवाड यांनी ठामपणे सांगितले. यामुळे रस्त्याच्या प्रश्नाकडे दुर्लक्ष करणाऱ्या प्रशासनावर दबाव निर्माण होणार आहे.निवेदन देतेवेळी जिल्हा कार्याध्यक्ष निशांत पवार, महाराष्ट्र कमिटी सदस्य रमेश जाधव, तालुका कार्याध्यक्ष विवेक रोकडे, माजी तालुका अध्यक्ष राहुल कांबळे, तालुका संपर्क प्रमुख चेतन भालेराव आदी पदाधिकारी उपस्थित होते. रस्त्याच्या दुरवस्थेमुळे नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. शालेय मुलांचे जीव धोक्यात आले आहेत, शेतमाल ने-आण करणाऱ्या शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होत आहे तर रुग्णवाहिकांना देखील या मार्गावरून प्रवास करणे धोक्याचे ठरत आहे. त्यामुळे ही समस्या केवळ विकासकामाची नसून ग्रामस्थांच्या जीविताशी थेट संबंधित आहे, असे नागरिकांचे म्हणणे आहे.



अन्यथा २२ सप्टेंबरला बहुजन विद्यार्थी संघटनेचा उपोषणाचा इशारा

## 'त्या' चार पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या रद्द

**। खोपोली । प्रतिनिधी ।**

**आरपीआयचे जिल्हाध्यक्ष नरेंद्र गायकवाड यांची माहिती**

पक्षाचे अधिकृत सदस्य नसतानाही खालापूर तालुका अध्यक्ष (पूर्व) महेंद्र धनगावकर यांच्या पत्रानुसार नियुक्तीपत्रे देण्यात आली आहेत. सदर पदांवर नियुक्ती करताना वरिष्ठ पदाधिकाऱ्यांना विश्वासात घेतले नसल्यामुळे पक्षाच्या शिस्तीचे उल्लंघन झाल्यामुळे चार पदाधिकाऱ्यांच्या बेकायदेशीर नियुक्त्या रद्द करीत आहोत. जर पदांचा गैरवापर करून पक्षाची बदनामी करण्याचा प्रयत्न केल्यास पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली जाईल, अशी माहिती आरपीआय आठवले पक्षाचे जिल्हाध्यक्ष नरेंद्र गायकवाड दिली आहे.

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) पक्षाच्या रायगड जिल्ह्यात रविवार ९ सप्टेंबर रोजी कर्जत तालुक्याचे माजी तालुका अध्यक्ष हिरामण गायकवाड यांच्या उपस्थितीत कार्यक्रम झाला. खालापूर तालुका अध्यक्ष (पूर्व) महेंद्र धनगांवकर यांच्या लेटरहेडवरून नितीन मोरे (खालापूर तालुका उपाध्यक्ष), मनोहर कांबळे (सचिव, खालापूर तालुका), विजय वाघमारे (कामगार आघाडी खालापूर तालुका), दिनेश मोरे (छत्तीशी विभाग अध्यक्ष), मोहन साळुंके (डोणवत ग्रामशाखा अध्यक्ष) आदी पदाधिकाऱ्यांनी नियुक्ति पत्रे देण्यात आली आहेत.नियुक्त्या करण्यात आलेले हे आरपीआय (आठवले) पक्षाचे अधिकृत सदस्य नसतानाही नियुक्तिपत्रांची खैरात वाटप करताना स्थानिक प्रमुख पदाधिकाऱ्यांशी चर्चा केली नसल्यामुळे प्रचंड नाराजीचा सूर निघत असल्यामुळे पदाची नियुक्त जिल्हा सरचिटणीस सुनील सोनावणे, युवक जिल्हाध्यक्ष प्रमोद महाडीक यांच्या सहीने मी जाहीर केलेली नियुक्ती रद्द करीत असून, जर या पदांचा गैरवापर होऊन पक्षाची बदनामी केली गेली, तर संबंधितांवर कायदेशीर कारवाई करणार, असा इशारादेखील गायकवाड यांनी दिला.

## कर्जदारांनी कर्जमुक्त व्हावे

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

शामराव पेजे कोकण इतर मागासवर्ग आर्थिक विकास महामंडळ यांचे जिल्हा कार्यालय रायगडमार्फत विविध कर्ज योजनेंतर्गत जिल्ह्यातील इतर मागास प्रवर्गातील लाभार्थींना स्वयंरोजगाराकरिता अल्प व्याजदराने कर्ज वितरीत करण्यात आलेले आहे. त्या लाभार्थींना कर्ज परतफेडीसाठी विहित मुदत देण्यात आली होती. परंतु, विहित मुदत संपून गेली असतानादेखील बऱ्याच लाभार्थींनी महामंडळाकडे शिल्लक रकमेची परतफेड अद्याप केलेली नाही, त्या सर्व थकीत लाभार्थींनी थकीत मुद्दल व थकीत व्याज रकमेचा एकरकमी भरणा करुन कर्ज खाते बंद करावे आणि कर्जमुक्त व्हावे, जेणेकरुन भविष्यात होणारी संभावित कायदेशीर कार्यवाही टाळावी, असे आवाहन जिल्हा व्यवस्थापक शामराव पेजे कोकण इतर मागासवर्ग आर्थिक विकास महामंडळ रायगड-अलिबाग गंगाधर डोईफोडे यांनी केले आहे.

थकीत लाभार्थींनी कर्ज खाते बंद केल्यास महामंडळाच्या सध्या सुरु असलेल्या नवीन आकर्षक बिनव्याजी रु.१५ लक्ष पर्यंत कर्जाच्या योजनेमध्ये लाभ घेता येईल.

# सेवा पंधरवडा कार्यक्रमाचे आयोजन

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

सामान्य जनतेला दिलासा देण्यासाठी महसूल प्रशासन अधिक गतिमान, लोकाभिमुख व कार्यक्षम होण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आगामी जन्मदिनी दि.१७ सप्टेंबर ते राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची जयंती दि. २ ऑक्टोबर या कालावधीत छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानांतर्गत 'सेवा पंधरवडा' साजरा करण्यात येणार आहे.

'सेवा पंधरवडा'च्या पहिल्या टप्प्यात दि. १७ ते दि.२२ सप्टेंबर या कालावधीत पाणंद रस्ते मोहीम हाती घेण्यात आली आहे. या मोहिमेत अतिक्रमित शिव व पाणंद रस्त्याचे सीमांकन व मोजणी करणे, शेतावर जाण्यासाठी रस्ता उपलब्ध करुन देणे, अतिक्रमित रस्ता असल्यास अतिक्रमणे दूर करणे, रस्त्याच्या नोंदी महसूल अभिलेखात घेणे इत्यादी उपक्रम राबविण्यात येणार आहेत. सद्य:स्थितीत गाव नकाशावर असलेले रस्ते व वहिवाटीचे रस्ते ग्राम महसूल अधिकारी, मंडळ अधिकारी व स्थानिक पदाधिकारी यांच्यामार्फत शिवार फेरीद्वारे रस्त्याची पाहणी करण्याबाबत कार्यवाही करण्यात येत आहे. यानिमित्ताने सर्व शेतकरी बांधवांनी शेतावर पाहाणी करतेवेळी ग्राम महसूल अधिकारी (तलाठी) यांच्यासोबत सहभाग नोंदवावा. तसेच शेतरस्त्याच्या वादाबाबत काही समस्या असल्यास दि.१९ सप्टेंबर रोजी आयोजित केलेल्या रस्ता अदालतीमध्ये सहभाग घ्यावा.

महाराष्ट्र राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली शेत रस्त्यासंदर्भात अत्यंत महत्त्वाकांक्षी असे अभियान दि. १७ ते दि.२२ सप्टेंबर या कालावधीत आयोजित करण्यात आले आहे. शेत रस्ता हा शेतकऱ्याच्या दृष्टीने शेती विकासाच्या बाबतीत अत्यंत महत्त्वाचा घटक असल्याने या अभियानात सर्व शेतकरी बांधवांनी सहभाग नोंदवावा, असे आवाहन तालुका प्रशासनामार्फत करण्यात आले आहे.

## अनिकेत निकम यांच्याकडून शाळेला बेंच

**रसायनी :** आसरे शाळेतील विद्यार्थी यांना शाळेत बसण्यासाठी २० बेंच माजी उप सरपंच अनिकेत निकम यांनी दिल्याने त्यांचे कौतुक होत आहे.रायगड जिल्हा परिषद शाळा आसरे येथील विद्यार्थी यांना शाळेत बसण्यासाठी बेंच अपुरे पडत होते, याबाबत माजी उपसरपंच अनिकेत उल्हास निकम यांना शाळा व्यवस्थापन समिती, शिक्षक यांनी अवगत केले, माजी उपसरपंच अनिकेत निकम यांनी शाळेला प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी केली० शिक्षक दिनाचे औचित्य साधून त्यांनी २० नवीन बेंच आसरे शाळेतील विद्यार्थ्यांना भेट म्हणून दिले. अनिकेत निकम हे गरीब गरजू विद्यार्थी यांना जमेल तशी मदत करतात, सामाजिक क्षेत्रात काम करताना त्यांनी अनेक सामाजिक उपक्रम राबवले आहेत. आपल्या दुर्गम भागातील विद्यार्थी यांना शैक्षणिक संधी उपलब्ध व्हावी त्यासाठी ते प्रयत्न करीत असतात. आसरे सरपंच बळीराम जांभळे, ग्राम पंचायत अधिकारी गोकुळदा राठोड, ग्राम पंचायत सदस्य, शिक्षक व पालकांनी त्यांचे आभार व्यक्त केले.

# काळाप्रमाणे बदलणारी गणेश मंडळे

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**



श्रीराम सांस्कृतिक कला क्रीडा मंडळ चिरनेर, श्री महागणपती मित्र मंडळ चिरनेर, अंकुश परदेशी मित्र मंडळ चिरनेर, गावदेवी गणेश मित्र मंडळ चिरनेर, श्री गणेश सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ चिरनेर, विघ्नहर्ता सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ चिरनेर या मंडळांनी काळाप्रमाणे साखरचौथ गणेशोत्सवात बदल करून आपली गणेशोत्सव साजरा करण्याची कित्येक वर्षांची परंपरा कायम टिकवून ठेवली आहे.

पूर्वीपेक्षा या मंडळांच्या सभासद संख्येत आता मोठ्या संख्येने वाढ झाली असून, या मंडळांकडून सांस्कृतिक तसेच सामाजिक उपक्रमावर मोठा भर देण्यात आला आहे. चिरनेर गावात निर्मिती करण्यात आलेल्या गणेश मंडळात तरुण वर्ग संघटित झाला असून, या संघटितपणामुळे गावात साजऱ्या होणाऱ्या अनेक सार्वजनिक कार्यक्रमात ही तरुणाई सरसावून सक्रिय भाग घेत असते. त्यामुळे गावात एकीचे दर्शन घडत आहे. या मंडळाचे कार्यकर्ते अलंकार परदेशी, सचिन घबाडी, विजय पाटील, पद्माकर फोफेरकर, अमर ठाकूर,राकेश ठाकूर, संतोष ठाकूर, अमित मुंबईकर, नितीन ठाकूर, सुजित पाटील, निलेश ठाकूर, किरण कुंभार, सुयोग पाटील, मंदार म्हात्रे, अरविंद रेवसकर, प्रमोद फुंडेकर, पद्माकर ठाकूर, प्रफुल्ल म्हात्रे, समीर डुंगीकर, प्रमोद मोकल, नितीन म्हात्रे, राजेश केणी, नितीन नारंगीकर, बळीराम फोफेरकर, आशीर्वाद ठाकूर, गणेश वशेणीकर, मयूर वशेणीकर, रत्नाकर वशेणीकर तसेच अन्य कार्यकर्त्यांच्या नेतृत्वाखाली हा साखरचौथ गणेशोत्सव सुरू आहे.

# शाहीर रामचंद्र घाणेकर यांची सदिच्छा भेट

**। सुतारवाडी । प्रतिनिधी ।**



रायगड जिल्ह्यातील पढवण गावचे सुपुत्र नामवंत गायक शाहीर रामचंद्र घाणेकर बुवा हे सावरवाडी येथील गणपती दर्शनासाठी आले असताना सावरवाडी ग्रामस्थांनी त्यांचे स्वागत केले. यावेळी त्यांच्यासमवेत त्यांचे बंधू विठोबा घाणेकर तसेच किरण लहाने, पप्पू जाधव हे मित्र उपस्थित होते.

शाहीर रामचंद्र घाणेकर बुवा यांनी आपल्या मधुर आवाजाने रायगड जिल्ह्यातील अनेकांची मने जिंकली आहेत. त्यांचे हजारो चाहते असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

## प्रल्हाद इंगवले यांचे निधन

**। कोर्लई । प्रतिनिधी ।**

मुरुडच्या जंजिरा विद्या मंडळ संचलित सर एस.ए. हायस्कूलचे सेवानिवृत्त पी.टी. शिक्षक प्रल्हाद खाशाबा इंगवले यांचे बुधवार, दि.१० सप्टेंबर रोजी सातारा-कऱ्हाड येथील उंब्रज गावी राहत्या घरी निधन झाले.



इंगवले सर हे केवळ पी.टी. शिक्षक नव्हते, तर उत्तम वाचक, वक्ते आणि शिस्तप्रिय अध्यापक म्हणून विद्यार्थ्यांच्या आणि सहकाऱ्यांच्या मनावर त्यांनी कायमस्वरूपी छाप पाडली होती. शाळेच्या स्नेहसंमेलनातील त्यांचा उस्फूर्त सहभाग, करमणुकीच्या कार्यक्रमात घेतलेला पुढाकार आणि नवीन शिक्षकांना दिलेली प्रेरणा यामुळे ते शिक्षकवर्गात लोकप्रिय होते. त्यांच्या मार्गदर्शनामुळे अनेक विद्यार्थी आणि सहकारी शिक्षकांना प्रोत्साहन मिळाले.त्यांनी होमगार्डमध्येही काही काळ कार्य केले होते. वाचनाचा दांडगा व्यासंग असल्यामुळे ते सार्वजनिक वाचनालयाच्या कार्यकारिणीवर अनेक वर्षे कार्यरत राहिले.


### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकारांनी मौजे कोल्हारे, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची बिनशेती मिळकत त्या मिळकतीचे मालक सन्नी मनजीत सबरवाल यांचेकडून विकत घेणेचे ठरविले आहे.

| सर्व्हे नं. | हिस्सा नं./ प्लॉट नं. | क्षेत्रफळ चौ.मी. | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| ७६ | ३ | २२८-०० | २२-८० |

सबब सदरबाबत कोणाचीही दान, गहाण, फरोक्त, लिज, लिन, बक्षीस, करार, ताबेकब्जा, वहिवाट अथवा अन्य कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिध्द झाले पासून १४ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पूराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतेही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून वरील मिळकतीचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दि. १५/०९/२०२५.

**ॲड.सतीश धर्मा डायरे,**
पत्ता-००२, शिवतीर्थ, सहयोग को. ऑ. हौ.सो. ब्राह्मण आळी, नेरळ, ता. कर्जत, जि. रायगड.
मो.९८५०४०२६५७.

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकारांनी मौजे कोल्हारे, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची बिनशेती मिळकत त्या मिळकतीचे मालक १) शबीब शफीक बुबेरे, २) समीर निसार अहमद ढोले, ३) उम्मेअमारा मुजफ्फर बुबेरे व ४) मुदस्सर शफीक बुबेरे यांचेकडून विकत घेणेचे ठरविले आहे.

| सर्व्हे नं. | हिस्सा नं./ प्लॉट नं. | क्षेत्रफळ चौ.मी. | आकार रू. पै. |
|---|---|---|---|
| ७६ | २ | २९२-०० | २९-२० |

सबब सदरबाबत कोणाचीही दान, गहाण, फरोक्त, लिज, लिन, बक्षीस, करार, ताबेकब्जा, वहिवाट अथवा अन्य कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिध्द झाले पासून १४ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पूराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतेही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून वरील मिळकतीचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दि. १५/०९/२०२५.

**ॲड. सतीश धर्मा डायरे,**
पत्ता -००२, शिवतीर्थ, सहयोग को.ऑ.हौ.सो.ब्राह्मण आळी, नेरळ, ता. कर्जत, जि. रायगड. मो.९८५०४०२६५७.

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी मौजे वेश्वी, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड येथील खालील वर्णनाची बिनशेती मिळकत व घर मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक (१) श्री. संघर्ष मधुसुदन सप्रे व (२) श्रीमती पुष्पा मधुसुदन सप्रे, यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या मिळकतीचे सविस्तर वर्णन खालीलप्रमाणे,

:: मिळकतीचे वर्णन ::

| मौजे | भुमापन क्र | क्षेत्र (आर.चौ.मी) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| चेंढरे | ५२/६/४ | ३-००-०० | ३०.००/- |

ग्रामपंचायत चेंढरे मालमत्ता क्रमांक ५१७, क्षेत्रफळ १५७२ चौरस फुट, घरपट्टी रू. ५२८०/- ही आर.सी.सी. बांधकामाची घर मिळकत.

सदरहू वर्णन केलेली बिनशेती व घर मिळकत निर्वेध व बोजारहीत असल्याची व त्या मिळकती आमचे अशिलांस कायमस्वरूपी विकण्याचा पुर्ण हक्क व अधिकार असल्याची हमी सदर मिळकतीचे विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस दिलेली आहे. तथापी सदर मिळकतींत अन्य कुणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, मृत्युपत्र, अन्नवस्त्र, जप्ती, लिज, कर्जाचा बोजा, जामिनकी, कुळहक्क, कबजा, वारसाहक्क, मालकी, एम. ओ. यु. करार, ताबे कब्जा वहीवाटी, रस्ता वहीवाट, कोर्टकचेरी वगैरे संबंधी कसल्याही प्रकारचे हक्क अगर हितसंबंध अगर तक्रार/हरकती असल्यास त्यांनी त्यांची हरकत ही नोटीस प्रसिध्द झालेपासून १४ दिवसांचे मुदतीत लेखी स्वरूपात, प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे सादर कराव्यात. तशी लेखी हरकत वा तक्रार दिलेल्या मुदतीत आली नाही, तर सदर मिळकतीवर विद्यमान मालकाशिवाय अन्य कोणाचाही कसलाही हक्क, हितसंबंध अधिकार नाही. वा असल्यास तो त्यांनी स्वेच्छेने सोडुन दिला आहे असे समजुन, गुहीत धरून सदरचा विक्री व्यवहार खरेदीखत करून पूर्ण केला जाईल व या मुदतीनंतर आलेल्या हरकती व तक्रारी आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

अलिबाग
दिनांक : १५/०९/२०२५

सही/-
**ॲड. अनिकेत एच. गुरव**
पत्ता : श्रीबाग नं. २, अलिबाग, जि. रायगड
ऑफीस : डॉ. केळकर क्लिनीक शेजारी,
शिवाजी चौक, ता. अलिबाग, जि. रायगड
मोबाईल नं. : ९८५०४०२०५०

### PUBLIC NOTICE

Notice is hereby given to the Public that, the sale deed dated 28/02/1995, executed before Sub Registrar Alibag at Sr.No. ALB/372/1995 between Anant Ramchandra Kadam (as Vendor), and Sangharsh Madhusudan Sapre & Pushpa Madhusudan Sapre (as Purchaser) in respect of the property bearing Survey No.52/6, Plot No.4, area 300 sq. meter, of village Chendhare, Taluka Alibag, District Raigad has been lost/ misplaced. All persons are hereby informed not to deal or carry out any transaction with anyone on the basis of the said missing document. If anyone has already carried out or being carried out kindly inform the undersigned in writing on the below mentioned address within 7 days from this present.

Date: 15/09/2025

Sd/-
**Mr. Sangharsh Madhusudan Sapre**
301, Acacia, Hiranandani Estate,
Ghodbunder Road, Thane (W)
Mobile No. 9820809524


# महिला बचतगटांना कर्ज, अनुदान धनादेशाचे वाटप




**। पोलादपूर । प्रतिनिधी ।**

शासनाकडून पोलादपूर तालुक्यातील देवळे आणि लोहारे जिल्हा परिषद प्रभागांतर्गतराज्य ग्रामीण जीवनन्नोती अभियानांतर्गत यंदा प्रथमच महिला बचत गटांना विविध उद्योग व्यवसायांसाठी अनुदान दिले जात आहे. या अनुदानाचा व्याजदर केवळ १ टक्का असून, पहिले कर्ज फेडल्यानंतर दुसऱ्या कर्जाची दुप्पट रक्कम मिळविता येते. या कर्जातून व्यवसाय उद्योग उभे करून महिलांना नवरा अथवा मुलगा यांना शहरात नोकरीला पाठविण्याऐवजी गावातच राहण्यास प्रवृत्त करता येणार आहे. या उत्पादनांसाठी रोहे व महाड येथे बाजारपेठ मिळण्यासाठी विक्री केंद्र उभारण्याची ग्वाही राज्याचे रोजगार हमी योजना, खारजमीन आणि फलोत्पादन मंत्री भरत गोगावले यांनी येथे दिली.

पोलादपूर शहरातील श्रीदेवी गंगामाता सभागृहामध्ये आयोजित एकता महिला प्रभाग संघ देवळे अंतर्गत महिला बचत गटांच्या मेळाव्यामध्ये कर्ज व अनुदानाचे धनादेश वाटप करण्यासंदर्भात आयोजित कार्यक्रमप्रसंगी मंत्री गोगावले बोलत होते.

यावेळी व्यासपीठावर गटविकास अधिकारी दिप्ती गाट, तालुका कृषी अधिकारी वैशाली फडतरे, माजी राजिप उपाध्यक्ष चंद्रकांत कळंबे, माजी सभापती अनिता कुंभार, तालुका प्रमुख निलेश अहिरे, कृउबासंचालक लक्ष्मण मोरे, महिला तालुका संघटिका सुवर्णा कदम, नगराध्यक्षा शिल्पा दरेकर, नगरसेविका अस्मिता पवार,भाजप मंडळ अध्यक्ष वैभव चांदे, उद्योजक रामदास कळंबे तसेच अन्य मान्यवर उपस्थित होते. यावेळी महाराष्ट्र शासनाच्या उमेद अंतर्गत विविध महिला बचत गटांसाठी अनुदान कर्ज वाटप करण्यात आले.


## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक


# १७०० कामगार कुटुंबांना होणार भांड्यांचे वाटप

**। पोलादपूर । प्रतिनिधी ।**



(छायाचित्र : शैलेश पालकर)

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या ओळखपत्र नोंदणी झालेल्या १७०० कामगार कुटुंबांना प्रत्येकी २० हजारांची मोफत भांडी दरवेळी पाचशे कुटुंबे प्रमाणे देण्यात येणार आहोत आणि कामगार कार्ड व आयुष्यमान कार्ड तसेच अनेक योजनांच्या पात्र लाभार्थ्यांची नोंदणी केल्यानंतर अधिकाधिक लाभ देणार, अशी ग्वाही राज्याचे रोजगार हमी योजना, फलोत्पादन आणि खारजमीन खात्याचे कॅबिनेट मंत्री भरतगोगावले यांनी दिली.

पोलादपूर येथील कॅप्टन विक्रमराव मोरे सभागृहामध्ये महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या ओळखपत्र नोंदणी झालेल्या ५०० कामगारांना प्रत्येकी २० हजार रूपयांची ५० प्रकारच्या भांडी वाटप करण्याच्या कार्यक्रमप्रसंगी मंत्री गोगावले बोलत होते.

याप्रसंगी व्यासपीठावर माजी राजिप उपाध्यक्ष चंद्रकांत कळंबे, तालुका प्रमुख निलेश अहिरे, कृउबासंचालक लक्ष्मण मोरे, संजय मोदी, कृष्णा नरे, महिला तालुका संघटिका सुवर्णा कदम, नगराध्यक्षा शिल्पा दरेकर, नगरसेविका अस्मिता पवार, स्नेहल मेहता, भाजप मंडळ अध्यक्ष वैभव चांदे, सतीश शिंदे, राजेश डांगे, अनिल भिलारे, दत्ता मोरे, तळेकर, उद्योजक रामदास कळंबे, राजू रिंगे तसेच अनेक महिला पुरूष शिवसेना पदाधिकारी उपस्थित होते.


## ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५

## निवडक

### भारताच्या लेकीचा 'गोल्डन पंच'

**लिव्हरपूल :** लिव्हरपूल येथे सुरू असलेल्या जागतिक महिला बॉक्सिंग चॅम्पियनशिपमध्ये भारताच्या जास्मिन लांबोरिया हिने जबरदस्त कामगिरी करत ५७ किलो वजनी गटात सुवर्णपदक पटकावले. हा विजय केवळ तिच्यासाठीच नव्हे, तर भारतासाठीदेखील ऐतिहासिक ठरला. या हंगामात भारताने पहिलेच सुवर्णपदक जिंकले. अंतिम फेरीत जास्मिनचा सामना पोलंडच्या ज्युलिया सेमेटाशी झाला, जी पॅरिस २०२४ ऑलिंपिकची रौप्यपदक विजेती आहे. हा सामना खूपच चुरशीचा ठरला. पहिल्या फेरीत जास्मिन थोडी संघर्ष करताना दिसली. मात्र, दुसऱ्या फेरीत तिने जबरदस्त पुनरागमन केले आणि सामना जिंकला. जास्मिनने ज्युलिया सेमेटाचा ४-१ अशा फरकाने पराभव केला. २०२४ च्या पॅरिस ऑलिंपिकमध्ये जास्मिनची कामगिरी अपेक्षेप्रमाणे झाली नव्हती, आणि तिला सुरुवातीलाच स्पर्धेबाहेर पडावे लागले. मात्र, त्या अपयशातून शिकून तिने तिच्या तंत्रात सुधारणा करत जागतिक पातळीवर आपली छाप पाडली. जास्मिनचा हा विजय भारतीय महिला बॉक्सिंगसाठी मैलाचा दगड ठरला आहे. जागतिक स्तरावर भारताचे नाव उंचावण्यात तिचा मोठा वाटा असून, हा विजय आगामी ऑलिंपिकसाठी भारताच्या तयारीसाठी महत्त्वाचा ठरेल. मी ही भावना शब्दांत मांडू शकत नाही. विश्वविजेतेपद मिळवणे माझ्यासाठी खूप मोठे आहे. पॅरिस ऑलिंपिकमध्ये लवकर बाहेर पडल्यावर मी माझ्या खेळात शारीरिक आणि मानसिकदृष्ट्या खूप सुधारणा केली. या सुवर्णपदकामागे गेल्या वर्षभरातील कठोर मेहनत आहे.

### पवन सेहरावतची हकालपट्टी!

**नवी दिल्ली :** तमिळ थलायवाजचा कर्णधार पवन सेहरावत शिस्तभंगामुळे प्रो कबड्डीच्या १२ व्या हंगामातून बाहेर झाला आहे. संघाने सोशल मीडियावर याबाबत माहिती दिली आहे. पवनने यंदाच्या हंगामात तीन सामने खेळले होते.प्रो कबड्डीचा १२ व्या हंगामातील जयपूर लेगला सुरुवात झाली आहे. अशातच एक खळबळजनक माहिती समोर आली आहे.



तमिळ थलायवाज संघाचा कर्णधार पवन सेहरावत यंदाच्या हंगामातून बाहेर झाला आहे. तमिळ थलायवाजयने याबाबत शनिवारी (१३ सप्टेंबर) स्पष्टीकरण दिले आहे. तमिळ थलायवाजने सोशल मीडियावर याबाबत पोस्ट शेअर केली आहे.थलायवाजने दिलेल्या माहितीनुसार पवन सेहरावतवर शिस्तभंगाची कारवाई करण्यात आली असून त्याला घरी परत पाठवण्यात आले आहे. त्यामुळे यापुढे तो उर्वरित हंगामात सहभाग घेऊ शकणार नाही. ही प्रो कबड्डीमधील मोठी कारवाई आहे. पवनने गेले काही हंगाम गाजवले आहेत. अशात त्याला अशाप्रकारे हंगामातून बाहेर जावे लागल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे. दरम्यान, तमिळ थलायवाजने त्याला संघातून बाहेर करण्याचे स्पष्ट कारण दिलेलं नाही, मात्र त्याच्यावर शिस्तभंगामुळे कारवाई झाली असल्याचे सांगितले आहे.तमिळ थलायवाजने शेअर केलेल्या पोस्टमध्ये लिहिले आहे की मशिस्तभंगाच्या कारणाने पवन सेहरावतला घरी पाठवण्यात आले असून तो आता उर्वरित हंगामात संघाचा भाग नसेल. हा निर्णय सखोल विचार करून आणि संघाच्या आचारसंहितेच्या नुसार घेण्यात आला आहे.

### भारताने स्वित्झर्लंडला हरवले

**नवी दिल्ली :** भारतीय टेनिस संघाने शनिवारी स्वित्झर्लंडमधील बिएल येथे इतिहास रचला. डेव्हिस कप २०२५ वर्ल्ड ग्रुप-१ मध्ये भारताने स्वित्झर्लंडचा ३-१ असा पराभव केला. ३२ वर्षांत युरोपियन संघाविरुद्ध भारताचा हा पहिलाच विजय आहे. शेवटचा हा पराक्रम १९९३ मध्ये फ्रान्सविरुद्ध झाला होता. या विजयासह, भारतीय संघाने डेव्हिस कप २०२६ च्या पात्रता फेरीत आपले स्थान निश्चित केले आहे. शनिवारी झालेल्या दुहेरी सामन्यात भारतीय संघाला पराभवाचा सामना करावा लागला. जेकब पॉल आणि डोमिनिक स्ट्रिकर या स्विस जोडीने एन श्रीराम बालाजी आणि रित्विक बोलिप्पल्ली यांचा ६-७, ६-४, ७-५ असा पराभव केला. त्यानंतर सुमित नागलने हेन्री बर्नेटचा ६-१, ६-३ असा पराभव केला. यासह भारताने स्वित्झर्लंडचा ३-१ असा पराभव केला.भारताने स्वित्झर्लंडचा ३-१ असा पराभव केला. पहिल्या दिवशी भारताने दोन्ही एकेरी जिंकल्या. यापूर्वी, शुक्रवारी पहिल्या दिवशी भारताने त्यांचे दोन्ही एकेरी सामने जिंकले होते. राखीव खेळाडू दक्षिणेश्वर सुरेशने जेरोम कैमला ७-६, ६-३ असे सरळ सेटमध्ये हरवून भारताला पहिला विजय मिळवून दिला. तर सुमित नागलने मार्क-आंद्रिया ह्यूस्लरला ६-३, ७-६ असे हरवले. भारताने शेवटचा फ्रान्सला पराभूत केले होते. भारताने शेवटचा युरोपियन संघाला १९९३ मध्ये कान्समध्ये पराभूत केले होते, जेव्हा लिएंडर पेस आणि रमेश कृष्णन यांच्या नेतृत्वाखालील संघाने उपांत्यपूर्व फेरीत फ्रान्सचा ३-२ असा पराभव केला होता.

## आशिया करंडक महिला हॉकी स्पर्धा

# भारत-चीन अंतिम सामना

**| हांगझाऊ (चीन) | वृत्तसंस्था |**



आशिया करंडक महिला हॉकी स्पर्धेत आज रविवारी भारत-चीन यांच्यात अंतिम सामना होणार आहे. भारतीयांनी आज जपानविरुद्ध सुरुवातीला मिळवलेली आघाडी त्यामुळे १-१ अशा बरोबरीवर समाधान मानावे लागले. परिणामी, अंतिम फेरी गाठण्याच्या आशा कमी झाल्या होत्या, परंतु चीनने कोरियाचा १-० असा पराभव केला आणि भारतीयांना अंतिम फेरीत खेळण्याची संधी मिळाली.

सुपर-४ मधील ही लढत भारताला जिंकण्याची संधी होती; परंतु सुरुवातीला मिळवलेले वर्चस्व भारतीयांना कायम राखता आले नाही. डुंग डुंग हिने सातव्याच मिनिटाला मैदानी गोल केला. त्यानंतर सामना संपायला दोन मिनिटे शिल्लक असताना कोबोयांकावा शिहो हिने केलेल्या गोलाच्या जोरावर जपानने बरोबरी साधली. भारत आणि जपान यांच्यातला या स्पर्धेतील हा दुसरा सामना बरोबरीत सुटला. साखळी सामन्यातील लढत २-२ अशा बरोबरीत राहिली होती.

सुपर ४मध्ये भारताला एक विजय एक पराभव आणि एक बरोबरी यामुळे चार गुण मिळाले आहे; पण गोल सरासरी १ अशी आहे. नऊ गुणांसह चीन सुपर ४ गटात पहिल्या क्रमांकावर आहे. चीनने कोरियाचा पराभव केल्यामुळे कोरियाचे आव्हान संपुष्टात आले आणि भारताला अंतिम फेरीत स्थान मिळाले.

कोरियाने चीनचा दोन गोलांच्या फरकाने पराभव केला तर भारताला मागे टाकून त्यांना अंतिम फेरीत स्थान मिळवता आले असते. भारताने सामन्याच्या सुरुवातीला जोरदार खेळ करत आघाडी घेतली. काही मिनिटांतच ईशिका चौधरीने गोलपोस्टच्या दिशेने चेंडू मारून गोलसाठी जोरदार प्रयत्न केले होते. यानंतर जपानने काही हल्ले चढवण्याचा प्रयत्न केला; पण लगेचच भारताने डुंग डुंगच्या गोलच्या जोरावर आघाडी मिळवली. दुसऱ्या सत्रात जपानने बरोबरी साधण्याचा प्रयत्न करत आक्रमक खेळ दाखवला. त्यांनी एक पेनल्टी कॉर्नरही मिळवला; पण भारतीय बचावफळीने तो सहज रोखला.

### तालुकास्तरीय बुद्धीबळ स्पर्धेत आराध्या बामणे ठरली अंतिम विजेती

**| खांब | प्रतिनिधी |**



रोहा तालुक्यातील तळवली तर्फे अष्टमी या गावची सुकन्या असणारी आराध्या अमिता गजानन बामणे हिने तालुकास्तरीय बुद्धीबळ स्पर्धेत अंतिम टप्प्यात यशस्वी कामगिरी करून विजेतेपद पटकावले आहे.

जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय रायगड व जिल्हा क्रीडा परिषद रायगड यांच्या वतीने रोह्यातील धाटाव येथील क्रीडा संकुल येथे आयोजित करण्यात आलेल्या बुद्धीबळ स्पर्धेतील शालेय गटात आराध्या बामणे हिने अंतिम टप्प्यात यशस्वी कामगिरी करून सुयश संपादित करून जिल्हास्तरीय बुद्धीबळ स्पर्धेत तिची निवड करण्यात आली आहे. आराध्या गजानन बामणे हि तालुक्यातील ग्रिगोरिअन पब्लिक स्कूल किल्ला येथील गुणवंत व हुशार विद्यार्थीनी असून अभ्यासाबरोबरच सर्व बाबतीत ती नेहमीच आघाडीवर असते.तिचे वडील धाटाव औद्योगिक वसाहतीत एका कंपनीत मॅनेजर पदावर कार्यरत आहेत तर आई ही प्राथमिक शिक्षिका आहे.

आराध्याच्या या सुयशाबद्दल तळवली तर्फे अष्टमी ग्रामस्थ व महिला मंडळ तसेच तरूण मंडळ यांच्या वतीने तसेच समाजातील सर्वच क्षेत्रातील मान्यवर मंडळींकडून अभिनंदन व्यक्त होताना दिसत आहे.

### भारताच्या ईशाने वर्ल्ड कपमध्ये जिंकलं सुवर्णपदक

**| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |**

ईशासिंहने अखेर वर्ल्ड कप नेमबाजी मालिकेतील चौथ्या स्पर्धेत भारताचा पदकाचा दुष्काळ संपवला. तिने या स्पर्धेतील भारताचे पहिले पदकच नव्हे तर सुवर्णपदक मिळवताना शनिवारी दहा मीटर एअर पिस्तूल प्रकारात बाजी मारली. तिने अंतिम फेरीत संभाव्य विजेत्या मानल्या जात असलेल्या याओ क्विआनझुन हिला ०.१ गुणाने मागे टाकले.

मी नेमबाजी सुरू केली, त्या वेळी एअर पिस्तूलमध्येच सुरुवात केली होती. त्यातच मी पहिले वर्ल्ड कप सुवर्णपदक जिंकले होते. आताच्या यशामुळे एक महत्त्वाचे लक्ष्य साध्य झाले आहे. जागतिक स्पर्धेतील यश हेच सध्याचे लक्ष्य आहे,असे ईशाने सांगितले. एकाही भारतीयाने एअर पिस्तूलमध्ये जागतिक स्पर्धा जिंकली नसली, तरी ते यश मिळवण्याची आमची नक्कीच क्षमता आहे. आमच्यातील स्पर्धाच आम्हाला तयार करणार आहे, असेही तिने सांगितले.

ईशा तसेच रिधम सांगवानने प्राथमिक फेरीत ५७८ गुण मिळवून पदक निश्चित करणाऱ्या अंतिम टप्प्यात स्थान मिळवले. त्यात ईशा सातवी, तर रिधम आठवी होती. मानांकन गुण वाढवण्यासाठी या स्पर्धेत खेळत असलेल्या आशियाई क्रीडा विजेत्या पलक गुलियानेही ५८६ गुण मिळवले होते.

अंतिम टप्प्यात ईशा तसेच रिधमने कामगिरी उंचावली. पहिल्या पाच शॉटनंतर रिधम पहिली, तर ईशा दुसरी होती. दुसऱ्या पाच शॉटनंतर ईशाने आघाडी घेतली, तर रिधम पाचवी झाली होती. केवळ दोन शॉटनंतर स्पर्धक बाद झाल्याचे दडपण प्रत्येकीवर आले; मात्र दोघी भारतीयांनी अचुकता कायम राखली. पाचवी असल्यामुळे रिधम बाद झाली. अखेरचे सहा शॉट्स शिल्लक असताना ईशाने अन्य स्पर्धकांना १.१ गुणाने मागे टाकले होते; मात्र याओ बहरली आणि ईशाची आघाडी ०.६ गुणावर आली. ईशाने १०.७ गुणांचा वेध सलग दोन प्रयत्नांत घेतला आणि एकूण २४२.६ गुणांसह पहिला क्रमांक मिळवला.

### फिल सॉल्टचे सर्वात जलद टी-२० शतक

**नवी दिल्ली :** मँचेस्टरमधील ओल्ड ट्रॅफर्ड क्रिकेट ग्राउंडवर झालेल्या दुसऱ्या टी-२० सामन्यात इंग्लंडने दक्षिण आफ्रिकेचा १४६ धावांनी पराभव करून मालिका १-१ अशी बरोबरीत आणली. इंग्लंडने २० षटकांत ३०४ धावा केल्या, जो टी २० आंतरराष्ट्रीय सामन्यात त्यांचा सर्वोच्च आणि जगातील तिसरी सर्वोच्च धावसंख्या आहे. कसोटी खेळणाऱ्या देशाने टी २० मध्ये ३०० पेक्षा जास्त धावा केल्याची ही पहिलीच वेळ आहे. इंग्लंडकडून फिल सॉल्टने नाबाद १४१ धावांची खेळी केली, जी संघासाठी सर्वाधिक वैयक्तिक धावसंख्या आहे. फक्त ३९ चेंडूत शतक ठोकून इंग्लंडसाठी सर्वात जलद शतकाचा विक्रमही त्याच्या नावावर आहे.३०५ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना दक्षिण आफ्रिकेचा संघ १६.१ षटकात १५८ धावांवर आटोपला. नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेणाऱ्या इंग्लंडने सुरुवातीपासूनच आक्रमक दृष्टिकोन स्वीकारला.

### श्रीलंकेचा बांगलादेशवर एकतर्फी विजय!

#### सुपर ४ चं गणित बिघडलं



**| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |**

आशिया चषक २०२५ स्पर्धेतील ५ वा सामना बांगलादेश आणि श्रीलंका या दोन्ही संघांमध्ये पार पडला. या सामन्यात प्रथम फलंदाजीसाठी आलेल्या बांगलादेशला २० षटकांअखेर ५ गडी बाद १३९ धावा करता आल्या. या धावांचा पाठलाग करताना श्रीलंकेने ६ गडी राखून विजयाची नोंद केली आहे.

आशिया चषकातील सुरुवातीच्या ४ सामन्यांमध्ये एकतर्फी लढत पाहायला मिळाली आहे. या सामन्यातही असच काहीसं चित्र पाहायला मिळालं. श्रीलंकेने या सामन्यात एकतर्फी विजयाची नोंद केली. श्रीलंकेला हा सामना जिंकण्यासाठी अवघ्या १४० धावा करायच्या होत्या. श्रीलंकेचा फलंदाजीक्रम पाहता हे आव्हान फार मोठं नव्हतं.

या धावांचा पाठलाग करताना श्रीलंकेकडून सलामीला आलेल्या पथुम निसंकाने ३४ चेंडूत ६ चौकार आणि १ षटकाराचा साहाय्याने ५० धावांची खेळी केली. पण कुसल मेंडीसला हवी तशी सुरुवात करून देता आली नाही. तो अवघ्या ३ धावांवर माघारी परतला. तर कुसल परेराने ९ धावांची खेळी केली. दासून शनाका १ धाव करून माघारी परतला. पण कामिल मिशारा शेवटपर्यंत टिकून राहिला. त्याने नाबाद ४६ धावांची खेळी करून श्रीलंकेच्या विजयात मोलाची भूमिका बजावली. या विजयासह श्रीलंकेने २ गुणांची कमाई केली आहे. बांगलादेशचा हा २ सामन्यातील पहिला पराभव आहे. जर बांगलादेशने आणखी १ सामना गमावला तर, त्यांच्या सुपर ४ मध्ये प्रवेश करण्याच्या अडचणी वाढू शकतात.

#### बांगलादेशने दिलं १४० धावांचं आव्हान

**या सामन्यात प्रथम फलंदाजी करण्यासाठी आलेल्या बांगलादेशला हवी तशी सुरुवात करता आली नाही. सलामीला आलेले तांझिद हसन आणि परवेज हुसेन शून्यावर माघारी परतले. गेल्या सामन्यातील अर्धशतकवीर कर्णधार लिटन दासने या डावातही हातभार लावत २८ धावांची खेळी केली. शेवटी जाकेर अलीने नाबाद ४१ आणि शमीम हुसेनने नाबाद ४२ धावा करत संघाची धावसंख्या ५ गडी बाद १३९ धावांवर पोहोचवली.**

## हाँगकाँग बॅडमिंटन स्पर्धा

# लक्ष्य, सात्विक-चिराग जोडी अंतिम फेरीत

**| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |**



भारताचा बॅडमिंटनपटू लक्ष्य सेनने दोन वर्षांत प्रथमच अंतिम फेरीत धडक मारली. तर, सात्विकसाईराज रंकीरेड्डी आणि चिराग शेट्टी जोडीने पुरुष दुहेरीत सरळ गेममध्ये विजय नोंदवत हाँगकाँग बॅडमिंटन स्पर्धेच्या (सुपर ५०० दर्जा) अंतिम फेरीतील आपले स्थान निश्चित केले.

२३ वर्षीय लक्ष्यने २०२१ च्या जागतिक अजिंक्यपद स्पर्धेत कांस्यपदक मिळवले होते. हाँगकाँग स्पर्धेच्या उपांत्य सामन्यात त्याने जागतिक क्रमवारीत नवव्या स्थानी असणाऱ्या चायनीज तैपेइच्या चोऊ तियेन चेनला २३-२१, २२-२० असे पराभूत केले. राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेतील विजेत्या लक्ष्यने जुलै २०२३ मध्ये कॅनडा खुल्या स्पर्धेची अंतिम फेरी गाठली होती. त्याने गेल्या वर्षी डिसेंबरमध्ये लखनऊमध्ये सय्यद मोदी आंतरराष्ट्रीय स्पर्धेचे जेतेपद मिळवले होते. जागतिक क्रमवारीत २०व्या स्थानी असणाऱ्या लक्ष्यसमोर आता अंतिम फेरीत चीनच्या दुसऱ्या मानांकित लि शि फेंगचे आव्हान असेल. उपांत्य सामन्याच्या पहिल्याच गेमपासून लक्ष्याला चेनकडून आव्हान मिळाले. दोन्ही खेळाडूंमध्ये सुरुवातीपासूनच चुरस पहायला मिळाली. लक्ष्यने खेळ उंचावत पहिला गेम जिंकला. दुसऱ्या गेममध्ये चेनने आपली लय राखत लक्ष्यवर दबाव निर्माण केला. एकवेळ सामना निर्णायक गेममध्ये जाईल, असे दिसत असताना लक्ष्यने गुणांची कमाई करीत गमसह सामन्यात विजय मिळवला.

त्यापूर्वी, सात्विक-चिराग जोडीने जागतिक क्रमवारीत नवव्या स्थानी असणाऱ्या चायनीज तैपेइच्या बिंग-वेई लिन व चेन चेंग कुआन जोडीला २१-१७, २१-१५ असे नमवित अंतिम फेरीतील आपले स्थान निश्चित केले. भारतीय जोडीसमोर अंतिम फेरीत चीनच्या लियांग वेई केंग आणि वांग चांग यांचे आव्हान असेल.

पहिल्या गेमच्या मध्यंतरापर्यंत भारतीय जोडीकडे ११-८ अशी आघाडी होती. भारतीय जोडीने आपली आघाडी वाढवत गेम जिंकला. दुसऱ्या गेममध्ये चायनिज तैपेइच्या जोडीने ४-२ अशी सुरुवात केली. मात्र, भारतीय जोडीने ६-६ अशी बरोबरी साधली. चिरागच्या काही चुकांमुळे चायनीज तैपेइची जोडी १०-८ अशी पुन्हा पुढे गेली.

### रविचंद्रन स्मरणचे अर्धशतक

**नवी दिल्ली :** दुलीप ट्रॉफीचा अंतिम सामना मध्य विभाग आणि दक्षिण विभाग यांच्यात खेळला जात आहे. दक्षिण विभागाने १२९/२ या धावसंख्येपासून खेळण्यास सुरुवात केली. रविचंद्रन स्मरण अर्धशतक झळकावल्यानंतर नाबाद आहे. शनिवारी तिसऱ्या दिवसाचा खेळ संपेपर्यंत दक्षिण विभागाने दुसऱ्या डावात २ गडी गमावून १२९ धावा केल्या होत्या. सामन्याच्या तिसऱ्या दिवशी मध्य विभागाने ५/३८४ धावांच्या पुढे खेळण्यास सुरुवात केली. पहिल्या डावात ५११ धावांवर सर्वबाद झाला.




## सागरी सुरक्षा चषक २०२५ कबड्डी साखळी स्पर्धेचे आयोजन

# मुरूड संघाने मारली बाजी

**| आगरदांडा | प्रतिनिधी |**



आंचल दलाल यांच्या मार्गदर्शनाखाली सागरी सुरक्षा दल व मच्छिमार बांधवांसाठी कबड्डी साखळी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत जिल्हातील १५ संघानी भाग घेतला आहे.

यांच अंनुषगाने आज सकाळी मुरूड समुद्रकिनारी मुरूड पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक परशुराम कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली सागरी सुरक्षा दल व मच्छिमार बांधवाचे कबड्डी साखळी स्पर्धा घेण्यात आल्या. याचे उद्घाटन मुरूड नायब तहसीलदार संजय तवर यांनी व मान्यवरांच्या शुभहस्ते दिप प्रज्वलित व श्रीफळ वाढवून करण्यात आले. आजच्या साखळी स्पर्धेत तळा व रोहा संघ सहभागी झाले होते. यामध्ये प्रथम मुरूड व तळा संघाबरोबर लढत झाली. यामध्ये मुरूड संघाने बाजी मारली. दुसऱ्या फेरीमध्ये मुरूड सघांने रोहा संघाबरोबर खेळताना १ गुणांनी मुरूड संघ विजयी झाला.

यावेळी पोलीस निरीक्षक परशुराम कांबळे, नायब तहसिलदार संजय तवर, महाराष्ट्र मच्छिमार कृती समिती उपाध्यक्ष तथा रायगड जिल्हा मच्छिमार सहकारी सोसायटीचे उपाध्यक्ष मनोहर बैले, मुरूड सागर कन्या मच्छिमार सोसायटीचे व्हाईस चेअरमन मनोहर मकू, राष्ट्रवादी कॉंग्रेस जिल्हा उपाध्यक्ष मंगेश दांडेकर, शिवसेना तालुका संघटक यशवंत पाटील, पोलीस उपनिरीक्षक शपीक शेख, मनिष नादगांकर, अजित कासार, पोलीस नाईक किशोर बठारे, पोलीस हवालदार चद्रकांत जैतू, पोलीस मकरंद पाटील, विश्वास चव्हाण,बाबू सूर्वे, दिनेश मिनमिने, भरत बेलोसे, माजी नगरसेवक विजय पाटील, नयन कर्णिक, प्रमोद भायदे, मनोज कमाने, आदेश दांडेकर आदींसह मान्यवर उपस्थित होते .

रायगड पोलीस दलातर्फे मच्छिमार बांधव, सागरी सुरक्षा दल व पोलीस यांच्यातील एकोपा आणि खेळाडूवृत्ती तसेच समन्वय वृध्दींगत करण्यासाठी आयोजित सागरी सुरक्षा चषक २०२५ साखळी कबड्डी स्पर्धा आयोजन मुरूड समुद्रकिनारी करण्यात आले होते. या स्पर्धेत रोहा संघा बरोबर खेळताना मुरूड संघ विजयी झाला असून हा संघ पुढील सामान्यात अलिबाग येथे खेळणार आहे, अशी प्रतिक्रिया पोलिस निरीक्षक परशुराम कांबळे यांनी दिली.

### अमन सेहरावत कुस्ती जागतिक स्पर्धेतून डिस्कालिफाय

**| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |**

पॅरिस ऑलिंपिकमध्ये कांस्यपदक जिंकणारा भारतीय कुस्तीपटू अमन सेहरावत याला झाग्रेब येथे होणाऱ्या जागतिक कुस्ती स्पर्धेतून अपात्र ठरवण्यात आले आहे. रविवारी झालेल्या सामन्यापूर्वी त्याचे वजन जास्त असल्याचे आढळून आले. अमन पुरुषांच्या फ्रीस्टाइल ५७ किलो वजनी गटात सहभागी होणार होता, परंतु त्याचे वजन १.७ किलो जास्त होते.

या स्पर्धेत अमन पदक जिंकेल अशी अपेक्षा होती. त्याच्याकडे वजन कमी करण्यासाठी पुरेसा वेळ होता. तो २५ ऑगस्ट रोजी भारतीय कुस्तीगीरांसोबत तयारीसाठी क्रोएशियातील झाग्रेबला पोहोचला होता.

एका अधिकाऱ्याने नाव न छापण्याच्या अटीवर पीटीआयला सांगितले की, हे दुर्दैवी आणि आश्चर्यकारक आहे की अमनला त्याचे वजन नियंत्रित करता आले नाही. जेव्हा तो वजन करण्यासाठी उभा राहिला तेव्हा त्याचे वजन १७०० ग्रॅम जास्त झाले. हे स्वीकारार्ह नाही. त्याचे वजन इतके कसे वाढले हे आमच्या समजण्यापलीकडे आहे.

एक वर्षापूर्वी, विनेश फोगटला पॅरिस ऑलिंपिकमध्ये १०० ग्रॅम जास्त वजनामुळे अपात्र ठरवण्यात आले होते. तिने भारतासाठी सुवर्ण जिंकण्याची संधी गमावली.पॅरिस ऑलिंपिकमध्ये अमनने कुस्तीमध्ये कांस्यपदक जिंकले.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
**■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)